

IRBK-0103118
IRBK-0103118

# रेशमाचे डोळे

—चिं. वि. जोशी

# संशयाचें जाळें

ठाणें.

चि. वि. जोशी

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

किंमत अडीच रुपये

प्रकाशक
अ. अं. कुलकर्णी,
कॉंटिनेंटल प्रकाशन,
१९६/१९ सदाशिव,
पुणें २.

दुसरी आवृत्ति १९४९.
सर्व हक्क सौ. नीला बोडस यांच्या स्वाधीन.
मुखपृष्ठावरील चित्र : श्री. दलाल, मुंबई.

मुद्रक
विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५/१ शिवाजीनगर,
पुणें ४.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,

श्रीधर

आणि

भालचंद्र

यांच्या

पुण्यस्मरणार्थ

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम
विभाग
म. ग्रं. सं. ठाणे
क्र. 3998
५।९।
IRBK-0103118

# ते हि नो दिवसाः।



दक्षिण महाराष्ट्रांत जवळ जवळ असलेल्या दोन जुन्या किल्ल्यांचे अवशेष अजूनही पडक्याधडक्या अवस्थेंत दृष्टीस पडतात. ठिकठिकाणीं खिंडारें पडलेले त्यांचे तट जरी अजून उभे आहेत, तरी त्यांच्या आंतील इमारती नाहींशा झालेल्या आहेत. वर असलेल्या गडकऱ्यांचे हशींचे वंशज लाकडें व गवत विकून उदरनिर्वाहाचें सोंग करीत किल्ल्यांच्या उतरणीवर खोपटें बांधून रहात असतात. यांपैकीं पूर्वेस हा जो किल्ला आहे याचें नांव वजीरगड व तो अर्ध्या पाऊण कोसावर पश्चिमेस आहे त्याचें नांव गोपाळगड. दोन्ही सह्याद्रीच्या एकाच फांट्यावर उभे असून मध्यें एक सुपीक दरी आहे.

या दोन किल्ल्यांच्या दरम्यान अंतर थोडें असल्यानें एकावर इशाऱ्यांकरितां केलेल्या होळीचा उजेड दुसऱ्याच्या भिंतीवर परावर्तन पावे व एकावर वाजविलेल्या नौबतीचा, शिंगाचा, किंवा पहारेकऱ्याच्या आरोळीचा आवाज दुसऱ्यावर आपटून द्विगुणित होत असे. अन्यायानें कोंडलेल्या हतभागी कैद्यांच्या आरोळ्या एकांतही ऐकूं येत नसत; कारण तेथील किल्लेदार आपल्या सत्तेचा दुरुपयोग करीत

नव्हते. त्यामुळें त्यांच्या हाताखालचे लोक त्यांच्यावर लोभ करीत. बादशाही अमलांत असे सज्जन अधिकारी फारच थोडे होते.

सोळाव्या शतकांत हे किल्ले विजापूरच्या राज्यांत मोडत असून चांगले पहिल्या प्रतीचे समजले जात. वजीरगडावर भीमराव व दुसऱ्यावर गुणवंतराव हे किल्लेदार होते. दोघे एकमेकांचे जीवश्च कंठश्च मित्र व सहयोद्धे होते. महाराष्ट्राची परंपरा लक्षांत घेऊन पाहिलें तर या दोघांत शेजारीपणामुळेंच चुरस लागून भांडणें उपस्थित व्हावयाचीं; परंतु यांच्या शेजारीपणाचें पर्यवसान मैत्रींत झालें होतें व त्या मैत्रीस आणखी दृढ बंधनें उत्पन्न झालीं होतीं. दोघेही खानदानीच्या मराठे कुळांत जन्मलेले, दोघांच्या बायका साधारण सारख्याच काळीं वारलेल्या व दोघांनाही एकेकच अपत्य होतें. आपापल्या मुलांच्या संगोपनांतच शेष आयुष्य घालवावें असा उद्देश धरून दोघेही विधुर अवस्थेंत काळ कंठीत होते. पूर्वी रणांगणावर चांगला पराक्रम दाखवून बादशहाकडून त्यांनीं पुष्कळ दरबारी मान, सनदा व पैसा मिळविला होता. त्यामुळें ऐहिक सुखांचा आतां त्यांस वीट आलेला होता. आतां त्या जोडीचा बहुतेक काळ देवाचें भजन, पंढरीच्या वाऱ्या, आल्यागेल्या हरदास-पुराणिकांचा परामर्ष व मुलांचें कौतुक यांत जाऊं लागला.

भीमरावास मुलगी होती, तिचें नांव त्यानें 'काशी' ठेविलें होतें व गुणवंतरावास यशवंत नांवाचा काशीपेक्षां तीन वर्षांनीं मोठा मुलगा होता. दोघां वृद्ध किल्लेदारांना त्या वाढत्या मुलांचें परस्परांवरील प्रेम पाहून आनंद वाटत असे. यशवंताच्या अंगांत बापाची वीरश्री पूर्णपणें खिळलेली होती. लाकडी तलवार व छोटी ढाल घेऊन आपल्या खेळगड्यांवर फरीगदग्यांत जय मिळवून तो

काशीच्या घरकुलाकडे अभिमानानें जाई. ती व तिच्या मैत्रिणी छोटी पंचारती ओवाळून त्याचें स्वागत करीत. कधीं कधीं दोन्ही गडांवरील मुलें एकत्र जमत व सीता किंवा द्रौपदीस्वयंवराच्या वेळेच्यासारखा कांहीं तरी 'पण' लावून काशीचें स्वयंवर करीत. अशा वेळीं यशवंत आपल्या तीरकमठयाच्या योगानें 'पण' जिंकून काशीचें 'हरण' करी व मग इतर मुलें त्यांचें लुटपुटीचें लग्न लावून फुटके नगारे, कुडमुडीं, डफ, पिपाण्या यांचा मारे गोंधळ उडवून देत.

यशवंत दहा वर्षांचा झाला. त्यास लिहिणें, वाचणे व शस्त्रकला, यांचें शिक्षण मिळण्यास सुरुवात झाली. त्या काळच्या रिवाजा-प्रमाणें तो लग्नाच्या वयांत आला. यशवंत व काशी यांच्या बापांचें पूर्वींच एकमेकांचे व्याही होऊन आपला स्नेह अधिक दाट करण्याचें ठरलें होतें. त्याप्रमाणें गुणवंतरावानें औपचारिक रीतीनें काशीकरितां मागणी घातली. मग योग्य मुहूर्त पाहून मोठ्या थाटानें विवाह-समारंभ साजरा करण्यांत आला. प्रत्यक्ष विजापूरच्या बादशहा-कडून वरास एक बगळ्यासारखी पांढरी शुभ्र अरबी घोडी आणि वधूस पोषाख व एक मौल्यवान् चंद्रहार याप्रमाणें अहेर आले. दोन्ही बाजूंच्या विहिणी जिवंत नव्हत्या तरी रुसण्याफुगण्याचीं कामें पाहुण्या बायांनीं सवापटीनें उत्तम वजाविलीं.

लग्नानंतर कांहीं दिवसांनीं काशीस सासरचें बोलावणें आलें व ती सासरीं रहाण्यास आली. पण तिच्यावांचून भीमरावास चैन पडेनासें झालें म्हणून तिच्या पाठोपाठ तोही आपल्या स्नेहीव्याह्याच्या घरीं रहाण्यास आला. नंतर जेव्हां जेव्हां काशी माहेरीं जाई, तेव्हां तेव्हां गुणवंतराव व यशवंत वजीरगडावर जात आणि जेव्हां

ती सासरीं येई तेव्हां भीमराव गोपाळगडावर येऊन राही. अशा प्रकारें हे व्याही व त्यांचीं मुलें एकाच कुटुंबांतील माणसांप्रमाणें त्या दोन किल्ल्यांवर आळीपाळीनें राहूं लागलीं.

'अति परिचय खोटा, मान राहत नाहीं,' या म्हणीच्या सत्याचा जरी व्यवहारांत वारंवार प्रत्यय येतो तरी आमच्या या दोन किल्ले-दार स्नेहीव्याह्यांच्या बाबतींत 'परिचयेन वर्धते स्नेह : सतां शुक्ले शशीयथा' या कव्युक्तीच्या खरेपणाचाच अनुभव येत असे. आणखी सातआठ वर्षें लोटून ते स्नेही अधिक म्हातारे झाले व तें चिमु-कलें जोडपें तारुण्यांत आलें. मराठ्यांच्या चालीप्रमाणें काशीस जरी पडद्यांत रहावें लागे, तरी बाप व सासरा यांच्याशीं ती लहान मुली-प्रमाणें मोकळी वागे व त्यांच्या देखत नवऱ्याशीं बोलण्यासही लाजत नसे. वारंवार हीं चौघें लोकलज्जेचा त्याग करून सोंगट्या खेळत व शिकारीसही जात. लोक अर्थातच म्हणत, "या पोरीला लहानपणा-पासून आई नाहीं आणि सासरीं शिस्त लावावयास सासू नाहीं; म्हणून तिला कांहीं मोळाच नाहीं. नुस्ता हुणगोबा करून ठेविला आहे!" परंतु हें अर्थात् मागें. सत्ताधाऱ्यांच्या तोंडावर बोलण्याची छाती कोणाला होती?

पुष्कळ वर्षें लोटलीं. यशवंतास विसावें वर्ष लागलें, काशीस सत-रावें लागलें व त्यांस मुलगी झाली. जरी मुलगी झाली तरी पहिलेंच अपत्य म्हणून त्यांस आनंद झाला. 'पहिली बेटी धनाची पेटी आणि पहिला बेटा कपाळकरंटा,' या म्हणीचा वारंवार उच्चार करून उभयं आजोबांनीं समाधान मानून घेतलें. काशीची ही पहिलीच खेप असल्यानें तिचें बाळंतपण माहेरीं झालें व बारशाच्या दिवशीं तिचें नांव कोणतें ठेवावें याबद्दल दोन म्हाताऱ्यांत बराच वादविवाद—

त्यांच्या आयुष्यांत हा पहिलाच वाद—होऊन अखेरीस तिचें ‘ चंद्रभागा ’ असें पावन नांव ठेविलें.

पुस्तकें व इतर विद्या ज्यांना मोहोरबंद केलेल्या तिजोऱ्यांतील द्रव्याप्रमाणें आहेत अशा त्या मराठ्या गड्यांस आपला काळ कंटाळवाणा जात असला पाहिजे असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे; परंतु असें वाटत असल्यास ती चूक आहे. त्यांनाही त्या काळचा काव्यशास्त्रविनोद होताच. त्यांचें काव्य म्हणजे हरिदासांच्या कीर्तनांतील कविता किंवा गोंधळ्यांचे लावण्या-पोवाडे, त्यांचा विनोद म्हणजे ललितें व तमाशे, आणि शास्त्र म्हणजे पुराणिक व साधू यांच्या मुखांतील जगाच्या क्षणभंगुरतेबद्दलची व मायावीपणाची चर्चा. बरींच वर्षें त्यांस लढाईवर जावें लागलें नाहीं तरी यांत त्यांचा काळ जाई. शिवाय धर्मकृत्यें, कुळाचार व यात्रा वर्षांतून शंभर दिवस तरी असतच.

हा सुखाचा काळ त्या संयुक्त कुटुंबास फारच सपाट्यानें गेल्यासारखा वाटला. कारण सुखी माणसांचा नावडता सहवास शक्य तितका कमी करण्याकरितां काळ त्यांच्याबरोबर जातांना पंखानीं उडत असतो. दुःखी, दीन, दुबळ्या माणसांचा सहवास त्यास अधिक आवडतो व त्यांच्याबरोबर मात्र तो मुंगीच्या पावलानें चालतो. एके दिवशीं सकाळीं वजीरगडावर प्रत्येक मनुष्य धांदलींत आहे असें दिसत होतें. परंतु त्या धांदलींत उत्साह नव्हता; खिन्नता पसरलेली होती. किल्लेदाराच्या वाड्यासमोर अलोट गर्दी जमली होती. गुणवंतराव उघडे बोडके तेथें उभे राहून आपल्या नुकत्याच स्वर्गस्थ झालेल्या व्याहीमित्राचा गुणानुवाद करीत मधून मधून येणारा एकादा अश्रु उपरण्यानें पुसून टाकीत होते.

यशवंताचें तोंड गोरेंमोरें झालें होतें व तो आपल्या शोकास आंतल्या आंत दडपून टाकण्याचा यत्न करीत होता. तो शूर असल्यामुळें त्यानें या शोकरूपी शत्रूवर ताबा चांगलाच बसविलेला दिसत होता. परंतु त्याच्या पत्नीचा आक्रांत गोषांतून मोठ्यानें बाहेर येऊन ऐकणारांचें हृदय विदारण करीत होता.

भीमरावांनीं इहलोकाचा त्याग केला होता. त्यांचा एक पुतण्या तेथें होता त्याच्या हातून गुणवंतरावांनीं अंत्यसंस्कार उरकले व दुसऱ्या दिवशीं मुलगा व सून यांस घेऊन ते गोपाळगडाकडे येण्यास निघाले. बिचाऱ्या काशीला माहेरचें कोणींच उरलें नाहीं. ज्या ठिकाणीं आपलें रम्य बालपण गेलें त्या वजीरगडला आपण कायमच्या अंतरणार या विचारानें तिचें अंतःकरण अगदीं उचंबळून आलें. तथापि जगाच्या रहाटीकडे पाहून समाधान मानून ती सासरीं कायमची रहाण्यास आली.

त्या रात्रीं त्या तिघांस झोंप येईना. भीमरावांच्या आठवणी करीत तीं तशीच अंथरुणांवर तळमळत पडलीं होतीं. यशवंतास मात्र भीमरावांविषयीं विशेष प्रेम नसल्यानें त्याचा जरा डोळा लागत होता- 'विशेष' म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, इतर पुरुष सासऱ्यावर जितका लोभ ठेवितात, तितका त्याचाही होता. भीमराव हे गुणवंतरावांचे जिवलग स्नेही व काशीचे वडील ( त्यांतून तिची आई लहानपणीं वारली असल्यानें 'आईबाप' म्हटल्यास अधिक शोभेल ) होते, त्यामुळें त्या दोघांना जितका शोक झाला तितका यशवंतास झाला नाहीं.

मध्यरात्रीच्या सुमारास एकाएकीं किल्ल्याच्या दरवाजाशीं शिंग वाजविल्याचा आवाज ऐकूं आला. त्याबरोबर त्यांचा शोक क्षणमात्र

अनुक्रम ....
विभाग वे. हि. नो. दिवस
पा. वा.

उतरून त्याची जागा नवीन बातमी काय आहे ती ऐकण्याच्या उत्सुकतेनें पटकाविली. यशवंत पडवडीनें जागा झाला बहुतकरून बादशहाकडून लढाईचें निमंत्रण आलें असावें या आशेनें त्याचे बाहू स्फुरण पावूं लागले. गुणवंतरावांस किंचित् ग्लानि येऊन आपल्या मित्राबद्दल कांहीं स्वप्न पडण्यास सुरुवात झाली होती. ते खडबडून जागे झाले व आपल्या खोलीच्या बाहेर आले.

थोडक्याच वेळांत ज्या जासुदानें आपल्या अवेळीं येण्यानें किल्ल्यांत एवढी खळबळ उडवून दिली होती तो किल्ल्यावरील एका इसमाबरोबर येऊन गुणवंतरावांपुढें उभा राहिला. गुणवंतरावांनीं त्याची विचारपूस करण्याच्या आंतच त्यानें त्यांच्या हातांत बादशहाकडील थैली दिली. "जा रे गोविंदा, मियाच्या खाण्यापिण्याची न् निजण्याची व्यवस्था कर." असा शिपायास हुकूम करून त्यांनीं थैली स्वामिभक्तीनें डोक्यास लाविली व मग बंद सोडून आंतील खलिता काढिला. खलित्यांत, "विजयनगरच्या काफर राजानें कांहीं अन्याय केल्यामुळें त्याच्याशीं लढाई करण्याचा शाहे-न्-शहांचा बेत ठरला आहे, म्हणून एक हजार शिपाई घेऊन कोप्पळ मुक्कामीं ताबडतोब हजर व्हावें," वगैरे मजकूर होता.

तरुण यशवंताचा शौर्याग्नि आळसाच्या राखेखालीं आजपर्यंत धुमसत राहिला होता, त्यास या खलित्यानें फुंकर घातली. युयुत्सुता, कीर्तिलालसा व राजनिष्ठा या तिन्ही भावना त्याच्या हृदयांत जागृत झाल्या आणि ज्याचें अन्न आपण खात आहों त्या विजापूरच्या बादशहाच्या शत्रूबरोबर लढणें हेंच आपलें कर्तव्य, तें बजावण्याची संधी न दवडण्याचा त्याचा निश्चय झाला.

दुसरा दिवस उजाडण्याच्या आंतच गोपाळगडावरील व जवळची

मिळून सुमारें आठनऊशें फौज कोप्पळच्या बाजूस म्हणजे गडाच्या आग्नेयीस रवाना झाली. त्या काळीं कोणत्याही राजकीय कामाचा निकाल असा तावडतोबीनें होत असे. हल्लींप्रमाणें दोन पैशांच्या क्षुल्लक बाबीकरितां तालुक्याच्या अधिकाऱ्यापासून जिल्ह्याधिकाऱ्याकडे, त्याच्याकडून विभाग, इलाखा व देश यांच्या अधिपतींपर्यंत प्रकरण ओळीनें जाऊन व उलट क्रमानें खालपर्यंत येऊन काळ व पैसा यांचा द्राविडी प्राणायामानें अपव्यय होत नसे. बादशाही हुकूम येऊन तीनचार तास लोटण्याच्या आंत सर्व जमवाजमव होऊन यशवंताच्या हाताखालीं फौज निघाली. ती आतां पहांटे गडावर उभें राहून पाहाणाराला मुंग्यांच्या रांगेसारखी अंधुक अंधुक दिसत होती व तिच्यांतील नौबतीचा व शिपायांच्या गाण्यावजावण्याचा आवाज मधून मधून वाऱ्याच्या झुळकेबरोबर ऐकूं येत होता.

गडावरील सर्व देखावा एकदम बदलला. घोड्यांच्या तबेल्यांतून येणारीं खिंकाळणीं व टापांचे आवाज हीं बंद झालीं. वाड्याभोंवतीं रिकामपणीं घिरट्या घालणारे रिकामटेकडे लोक दिसेनासे झाले. झाडून सारे तरुण शिपाई लढण्याकरितां रवाना झाल्यानें त्यांच्या बायका सासूची किंवा नणंदादिरांची नजर चुकवून अश्रू ढाळूं लागल्या. जिवंत चळवळीऐवजीं भीषण औदास्याचा पगडा गडावर बसला. हा बदललेला देखावा पाहाणाऱ्या अनोळखी इसमास एखाद्या यक्षिणीनें या किल्ल्यावरून जादूची कांडी तर फिरविली नाहीं ना, अशी शंका सहज आली असती.

कालच घडलेल्या कायमच्या पितृवियोगामुळें काशीचें अंतःकरण आधींच विव्हल झालें होतें, त्यांत आज पतिवियोगाची भर पडल्यानें ती अगदीं स्तंभित झाली. इतकी कीं, तिच्या डोळ्यांतून

आंसवें आलीं नाहींत कीं मुखांतून हुंदके आले नाहींत; ती एकाच ठिकाणीं नजर लावून निर्जीव पुतळीप्रमाणें स्तब्ध राहिली होती. तिच्या सासऱ्यानें तिला या तिच्या बुद्धिभ्रंशापासून जागी करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; परंतु ती जागी होईना. लहानपणापासून प्रियजनांचा वियोग कसा तो माहीत नसल्यानें, व एकाएकीं हे दोन मोठे प्रसंग गुजरल्यानें तिचें मन ठिकाणावर राहिलें नाहीं. ती आतां या अवस्थेंतून लौकर बाहेर पडते कीं नाहीं या शंकेंत भोंवतालची मंडळी पडली, तों पाळण्यांत निजलेली लहानगी चंद्री जागी झाली व बाळस्वभावानुसार रडूं लागली. तिच्या रडण्याचा आवाज काशीस ऐकूं जातांच तिच्या हृदयांतील अपत्यप्रेमाचा तंतु कंप पावला व एकाएकीं ती खडबडून जागी झाली. "आल्यें हं बाळ!" असें तिचे ओठ तिला न कळत बोलले व तिचे पाय तिला घेऊन पाळण्याकडे धांवले.

इकडे, विजापूरच्या बादशहाकडून अहेरादाखल आलेल्या पांढऱ्या अरबी घोडीवर स्वार होऊन सैन्याच्या अग्रभागीं चालणारा यशवंत आपल्याला गोपाळगडाकडे परत जोरानें ओढूं पहाणाऱ्या ओढाळ अंतःकरणास दृढ निश्चयाच्या दोरीनें खेंचीत खेंचीत कर्नाटकच्या मार्गानें जात होता. त्याचें चित्त अर्धें समरांगणावर व अर्धें घरीं असें व्यग्र झालें होतें. सुदैवानें त्याच्या चित्तांतील खिन्नता नाहींशी करण्यासारखी एक गोष्ट झाली. गोपाळगडापासून तीनचार कोसांवर रामपल्ली नांवाचें गांव आहे, तेथील पाटील बाळोबा त्यास भेटला. बाळोबाचें वय यशवंताच्या इतकेंच सुमारें होतें. त्याचा बाप व गुणवंतराव हे चुलतभाऊ असून यशवंतास मुलगा न झाल्यास अगर यशवंत मयत झाल्यास गोपाळगडची किल्लेदारी व गुणवंतरावाचें

इनामी उत्पन्न त्याच्याकडे अगर त्याच्या मुलांकडे येणार होतें. तथापि तो आपल्या पाटीलकीच्या उत्पन्नावर संतुष्ट असल्यानें यशवंताबद्दल घातकी विचार त्याच्या मनांत मुळींच आले नव्हते. तो निष्काळजी, शूर व फंदी होता. तो चुलतभाऊ असतांही यशवंत त्यास मित्राप्रमाणें समजे व काशीसही हे बाळूभाऊजी म्हणजे एक शौर्याचे व चांगुलपणाचे पुतळे वाटत.

" बरा भेटलास, बाळू ! " यशवंत त्यास हांक मारून म्हणाला, " गडाकडे जायला निघालास कीं काय ? "

" ओ हो येसू ! इतक्यांत तुम्ही कूच केलीत वाटतं ? बरोबरच आहे. तुझी ही लढाईवर निघण्याची पहिलीच खेप आहे. तेव्हां ही घाई रास्त आहे. यशस्वी होऊन परत ये बरं ! मला मात्र तलवार गाजविण्याची ही संधी मिळत नाहीं म्हणून वाईट वाटतें. "

" त्यांत काय आहे ? तरवार गाजविण्यापेक्षां जास्त जबाबदारीचें काम तुझ्यावर आहे. बाळोबा, आपल्या बादशहाच्या दुष्मनाशीं दोन हात करण्यासाठीं मी जात आहें. पण न जाणों पुनः मी आपल्या माणसांना "—इतकें बोलतां बोलतां यशवंतास हुंदका आला. तो पटक्याच्या समल्यानें डोळे पुसूं लागला. " जर कदाचित् माझें बरें वाईट झालें "—

" वेडा आहेस तूं, येसू ! असा धीर सचूं देणें तुझ्यासारख्या वीराला शोभत नाहीं. मी भवानी माईची शपथ घेऊन सांगतों कीं, माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी कोणालाही नानां (गुणवंतरावांच्या) च्या, काशीवहिनींच्या किंवा चंद्रीच्या केसालाही धक्का लावूं देणार नाहीं. तें जाऊं द्या ! तसें कांहीं होणारच

नाहीं! उगीच अभद्र कल्पना कशाला मनांत आणाव्या? चल आतां आमच्याकडे. जेवणखाण करून मग पुढें जा."

पायदळ फौज रामपल्लीच्या पुढें दोन कोस गेली व तेथें तिनें नदीच्या कांठीं तळ दिला. यशवंतानें व कांहीं स्वारांनीं रामपल्लीस मुक्काम केला व पुनः उजाडतांच त्यांनीं पायदळास गांठिलें.

• • •

## द्वंद्व

## २

थोड्या दिवसांनीं यशवंतराव आपल्या सैन्यानिशीं बादशाही फौजेच्या पिछाडीच्या तळावर जाऊन पोहोंचला. बादशाही फौज आग्नेय दिशेस विजयनगरच्या हिंदु राजावर स्वारी करण्यास निघाली होती. शिवाजीनें उत्पन्न केलेल्या नवचेतनांचा संचार अद्याप महाराष्ट्रांत झालेला नसल्यानें, धर्मबांधवांच्या सेवेपेक्षां स्वामिसेवा श्रेष्ठ आहे असें मराठ्या योद्ध्यांस वाटत असे व त्या वृत्तीस अनुसरून त्या राजावर कधीं चढाई करून मुसलमान बादशहाकडून वाहवा मिळवीन असें यशवंतरावास झालें होतें. कांहीं काळपर्यंत कृष्णा नदीच्या कांठानें फौज चालली व मग कृष्णाकांठ सोडून तुंगभद्रेच्या काळ्या भोर व मऊ खोऱ्यांतून चालली. वजीरगड, गोपाळगड व आसपासच्या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांचा नापीक व

कठोर प्रदेश यांशिवाय इतर प्रांत त्यानें अजून पाहिलेला नसल्यानें त्यास हा प्रवास फार मजेचा वाटत असे.

पुष्कळदां तो आपली फौज सोडून जाई आणि आपले पल्लव हालवून व खांद्या डोलवून आपलें स्वागत करणाऱ्या सागाच्या झाडांनीं गजबजलेल्या रानांत घोडा फेंकीत घाबरून पळणाऱ्या हरणांच्या मागें दौडे. तेव्हां रानांतील थट्टेखोर वायु त्याच्या पटक्याचा समला निशाणाप्रमाणें फडकावी आणि त्याच्या लांब अंगरख्याचा घोळ त्याबरोबर त्याची त्रेधा उडवी. लाल तोंडांचीं माकडें त्याला पहातांच झाडावर अधिक उंच चढून त्याच्या पुढें दांत विचकीत. एखादे वेळीं तो उंच जागीं घोडा थांबवून पलिकडील शेतांतून धांवणाऱ्या अगर संथपणें चरणाऱ्या हरणांच्या कळपाकडे पहात उभा राही. खऱ्या पारध्यांच्या ब्रीदास जागून त्यानें काळविटांखेरीज कोणत्याही हरिणावर तीर सोडला नाहीं. या शिकारीमुळें त्याची शरीरप्रकृति चांगली राहिली. शिवाय दिवस आनंदानें जाऊं लागल्यामुळें कुटुंबांतील माणसांचा वियोगही त्यास जाणवला नाहीं.

बादशाही फौजेची बिनी चारपांच दिवसांच्या पल्ल्यावर पुढें चालत होती. वाटेनें या फौजेस हिंदु व मुसलमान या दोन्ही धर्मांचे जहागीरदार व सरदार आपआपल्या फौजांसह येऊन मिळत होते. ते सर्व खानदानीच्या घराण्यांतले असल्यानें नामांकित गणिले जात; परंतु त्यांत केवळ स्वपराक्रमाच्या जोरावर कीर्ति मिळविलेला एकच सरदार होता. हा आपलें नांव कृष्णराव हावेरी ( किंवा मराठी पद्धतीप्रमाणें ' हावेरीकर ') असें सांगत असे. दुसऱ्या कोणासही याची पूर्वीची माहिती काडीमात्र नव्हती. हा पांचसहा वर्षांपूर्वी विजापूरच्या

बादशहाच्या पदरच्या दोन मुसलमान नबाबांच्या मध्यें भांडण जुंपलें असतां त्यांपैकीं एकाकडे बारगीर म्हणून राहिला आणि तेथें त्याचा पराक्रम बादशहाच्या नजरेस येऊन तो वाढत गेला व आतां त्याच्याकडे कितीशें स्वारांची मनसबदारी आली होती. तो तरुण असून त्याच्या तोंडावर अशी उग्रपणाची छटा दिसत असे कीं, म्हाताऱ्या व बोलघेवड्या लढवय्यांनाही त्यास त्याची पूर्वकथा विचारण्याची छाती होत नसे. एकदां त्याच्या एका सोबत्यानें उपहासपूर्वक, " तुझ्या घरादाराची हकीकत तरी काय आहे ? " असें त्यास विचारिलें.

" माझें नांव कृष्णराव हावेरी हें तुम्हांस माहीतच आहे. आतां घरादाराबद्दल म्हणाल तर त्यांत मला सांगण्यासारखें कांहीं वाटत नाहीं. तुम्हांला माझ्या कुलशीलाबद्दल कांहीं शंका आली असेल तर तिचें समाधान करण्याला ही माझी ' बिजली ' तरवार तयार आहे ! ज्या कोणाला आपल्या घराण्याच्या खानदानीचा गर्व असेल ते, म्हणजे तुमचा चांगलाच नक्षा उतरवितों ! " इतकें आवेशानें बोलून त्यानें मान फिरविली व आपला वाढता क्रोध आवरला. क्रोधाऐवजीं त्याच्या चेहऱ्यावर लज्जा पसरलेली दिसूं लागली. त्या वेळचें त्याचें रौद्र स्वरूप पाहिल्यावर पुनः त्यास घरादाराबद्दलचा प्रश्न कोणीं विचारण्याचें धाडस केलें नाहीं; तरी त्याची कीर्ति अंगच्या पराक्रमादि गुणांमुळें शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें वाढत चालली. त्याच्या बांधेसूद शरीरामुळें व तेजस्वी मुद्रेमुळें केवळ बाह्य स्वरूपावरून भुलून जाणाऱ्या माणसांवर त्याची चांगली छाप बसत असे. त्यास चितारकाम चांगलें येत असे, गातां येत असे, तबला वाजवितां येत असे व पोवाडे व लावण्या रचण्याची कला

त्यास साध्य झाली होती. यामुळें सकृद्दर्शनी तो सर्वांस हवासा वाटे; पण त्याचें विशेष सान्निध्य झाल्यावर त्याच्या स्वभावांत माधुर्य फारच कमी असल्याचें प्रत्येकाच्या प्रत्ययास येई. दुसऱ्या एखाद्या ल्ढवय्याचें गुणवर्णन कोणीं केलेलें त्याच्या कानीं पडतांच त्याचा चेहरा मत्सरानें काळानिळा व्हावयाचा व आपल्याच पक्षाच्या एखाद्या योद्ध्याचा शत्रूकडून पराभव झाल्याचें ऐकतांच तो आनंदानें चमकूं लागावयाचा, असें धुष्कळांच्या लक्षांत आलें होतें. त्यामुळें तो समोर असतांना त्याच्यां अंगच्या गुणांची जितकी वाहवा होत असे, तितकेच शिव्याशाप त्यानें पाठ फिरवितांच त्याच्या मत्सरी व दुष्ट स्वभावामुळें त्यास मिळत. कोणीं जर आपलें गुपित त्याच्याजवळ चुकून विश्वासानें सांगितलें, तर त्यास आपल्या अदूरदर्शीपणाबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी लौकरच येई.

बादशाही तळ कोप्पळच्या मैदानांत पडला होता. कोप्पळच्या किल्ल्यावरून दूर नजर फेकणारास, त्या हिरव्याचार मैदानावर ठोकलेले तंबू, गवत चरणाऱ्या पांढऱ्या गायींच्या कळपासारखे दिसूं लागले. त्या तंबूंवर फडकणाऱ्या मुसलमानांच्या हिरव्या निशाणांवरील अर्धचंद्राकृति लौकरच आपल्या मालकांच्या हातून विजयानगरच्या राज्याला मिळणार असलेल्या अर्धचंद्राची सूचना देत होती. हिंदु लोकांच्या टोळ्या मधून मधून मुसलमानी सैन्यावर हल्ले करीत; पण मुसलमान त्यांस परत हांकून देत व अशा वेळीं कृष्णराव हावेरीकडे यशाचा मोठा वांटा ठराविक असावयाचा.

दिवसभर निकराची लढाई झाल्यानंतर एके दिवशीं संध्याकाळीं बादशहानें पुढील तजविजीबद्दल मतें घेण्याकरितां मुख्य मुख्य सेना-

नायकांची सभा आपल्या तंबूंत भरविली होती. सभेचें काम गंभीरतेनें चालले असतां बाहेरून एक मोठा भीति व आश्चर्य यांनीं प्रेरित झालेला गोंगाट मंडळींच्या कानीं आला. तो ऐकून हिंदूंचा हल्लाबिल्ला आला कीं काय असें वाटून सर्वांची गडबड उडाली व कांहींजण चोपदारास चौकशी करून येण्याबद्दल हातानें सूचना करूं लागले. इतक्यांत एक हुजऱ्या बाहेरून घाबऱ्या घाबऱ्या आंत धांवत आला व बादशाहाच्या पायांवर लोळण घालून म्हणाला, "खाविंद! काफरांनीं दगा केला! कांहींतरी जादूटोणा त्यांच्याजवळ आहे. या कृष्णरावसाहेबांचं भूत त्यांच्या जिवंतपणींच समोरून येत आहे!" बादशहाच्या व इतरांच्या तोंडांवरील अश्रद्धेचीं व उपहासाचीं चिन्हें पाहून तो आणखी म्हणाला, "काय? आपल्याला खरं नाहीं वाटत? चलावं तर बाहेर आणि आपल्या डोळयांनीं खात्री करून घ्यावी."

हा काळ भोळसट समजुतींचा असल्यानें वरील बातमीबद्दल थोडी शंका व भीति मनांत धरून बादशहासकट सगळे जण तंबूबाहेर पडले. नेहमींप्रमाणें या भयदायक समयींही कृष्णराव सर्वांच्या पुढें होता. समोरून कांहीं घोडेस्वार येत होते व त्या सर्वांच्या आघाडीस जो तरुण स्वार पांढऱ्या घोडीवरून येत होता, तो खरोखर हुबेहूब कृष्णरावाचें प्रतिबिंब होता म्हटलें तरी चालेल. आरशांतलें प्रतिबिंब उलटें दिसतें; पण या प्रतिमेच्या अंगीं उलटेपणाचा देखील दोष नव्हता. त्या तरुण स्वाराच्या किंचित् मागें दुसरा एक पोक्त वयाचा स्वार होता. त्यानें समोर बादशहा दिसतांच तरुणाच्या कानांत, "हा पहा बादशहा! उतर आणखी कुरनिसात कर." असें सांगितलें. त्याप्रमाणें त्या तरुणानें चपलतेनें घोडीवरून उतरून बादश-

हास किंचित् वांकून कुरनिसात केली. तो अद्याप दरबारी शिष्टाचा-रांत मुरलेला नसल्यानें त्याच्या कुरनिसातींत जरा उद्धटपणा दिसला. पण बादशहानें त्याची पर्वा न करितां त्याच्या नमस्कृतीचा योग्य स्वीकार केला.

जो तो सैनिक एक निमिष कृष्णरावाकडे व एक निमिष या नवीन आलेल्या योद्ध्याकडे पाहून " काय हो हें विलक्षण साम्य ! जुळे भाऊसुद्धां इतके सारखे सांपडायचे नाहींत ! " असे उद्गार काढीत होता. स्वतः बादशहाही या साम्यानें थक्क होऊन गेला. आश्चर्याचा भर कमी झाल्यावर त्यानें त्याच्या बरोबरच्या पोक्त माणसास या तरुणाचें नांवगांव विचारिलें. " हुजूर, गोपाळगडच्या गुणवंतराव किल्लेदाराचा मुलगा यशवंतराव खाविंदांच्या सेवेला हजर झाला आहे. " असें त्यानें सांगितलें. खरोखर हा आपल्या ओळखीचा यशवंतराव आहे कीं ! पण या साम्यापासून उत्पन्न झालेल्या आश्चर्यानें त्याची ओळख लौकर पटली नाहीं ! असो.

गुणवंतरावाचें बादशहाजवळ बरेंच वजन असल्यानें त्यानें यशवंतराव व त्याचे मित्र यांची उत्तम बरदास्त ठेविण्याची व त्याच्या अनुयायांची शक्य तितकी चांगली सोय करण्याची आपल्या नोकरांस आज्ञा केली. आपल्या थकलेल्या घोड्यांची व शिपायांची नीट व्यवस्था लागलेली पाहून यशवंतरावानें स्नानपूजा आटोपली व मग स्वस्थपणें भोजन केलें. जेवणाच्या वेळीं त्याच्या पंगतीस कृष्णराव होता. तो त्याच्याकडे पाहून वारंवार कपाळास आठ्या घाली; पण नजरेस नजर मिळाली कीं खोटें हासूं आणी. यशवंतराव मात्र कौतुकानें त्याच्याकडे पाहून मधून मधून मनापासून हासत असे.

यशवंतरावानें जेवण झाल्यावर बापास लांबलचक पत्र लिहिलें.

त्या काळच्या रीतीप्रमाणें त्याच्या बायकोस लिहिणें वाचणें शिकविण्यांत आलें नव्हतें, तरी आपला बाप तिला सुनेच्या नात्यानें न वागवितां मुलीप्रमाणें वागवीत असल्यानें तिलाही तो पत्र वाचून दाखवील अशी त्याची खात्री होती. आपला प्रवास मौजेचा होऊन आपण सुखरूप पोहोंचलों व बादशहानें आपलें चांगलें स्वागत केलें, या गोष्टीचा थोडक्यांत उल्लेख करून बाकीचें पत्र, कृष्णराव नांवाच्या मनसबदाराच्या चेहऱ्याशीं आपलें विलक्षण सादृश्य असल्यानें लोक कसे आश्चर्य व भयचकित झाले, आपल्या अंतःकरणांत त्याला पाहून नवीन भावनांचा उद्गम कसा झाला व "आपल्याला जणुं काय हा आपला हरवलेला सख्खा भाऊच परत सांपडला आहे," असें कसें वाटलें, इत्यादि वर्णनानें भरलें होतें. ( गोपाळगडावर पांचसात दिवसांनीं हें पत्र पोंचल्यावर गुणवंतराव तें वाचीत असतां त्यांच्या चेहऱ्यावर भय व लज्जा ह्या मनोविकारांची स्पष्ट छाया उमटलेली पुष्कळांच्या—व त्या पुष्कळांत त्यांचा पुतण्या बाळोबाही होता—लक्षांत आलें; इतकेंच नाहीं, तर त्यानंतर गुणवंतराव चिंतायुक्त मुद्रेनें त्या पत्राचीं पुनः पुनः पारायणें करीत आहेत असेंही बाळोबानें पाहून ठेविलें. )

कृष्णरावाच्याशीं आपल्या स्वरूपाचें साम्य पाहून यशवंतरावाच्या निष्कपट भोळ्या अंतःकरणांत ज्याप्रमाणें आनंद, प्रेम व कुतूहल या कोमल मनोवृत्तींनीं खळबळ उडवून दिली, त्याप्रमाणें कृष्णरावाच्या मनांत उडाली काय ? छे ! मुळींच नाहीं. त्याच्या मनांतही खळबळ उडाली खरी; पण ती उडवून देणाऱ्या मनोवृत्ती मात्र अगदीं विजातीय होत्या. आपल्या इतका दिसण्यांत उमदा, आपल्या इतके विविध गुण अंगांत असणारा, यशाच्या वांटणींत आपला प्रतिस्पर्धी

होण्यालायक योद्धा पाहून त्याच्या मनाचा मत्सरानें भडका उडून गेला. त्याच्या तंबूसभोंवतीं पहारा करणाऱ्या संत्र्यांनीं तर सबंद रात्रींत घटकाभरही त्यास झोंप आली नाहीं असें छातीस हात लावून सांगितलें; परंतु सकाळ उजाडतांच आपलें नेहमींचें हास्य चेहऱ्यावर धारण करून स्वारीनें तंबू सोडला व आपल्या मत्सरविषयास भेटण्यास त्याच्या गोटाकडे प्रयाण केलें.

थोड्या दिवसांनीं त्यांची ओळख अतिशय दाट होऊन गेली. यशवंतरावाचा स्वभाव अतिशय भोळा. त्यांत बापाच्या ममताछत्राच्या सांवलींतून बाहेरील स्वार्थी जगाच्या तापांत तो पहिल्यानेंच आला होता. त्यामुळें कृष्णरावासारख्या कपटी मनुष्याच्या गोड भाषणानें त्याचें मन विरघळण्यास वेळ लागला नाहीं. कृष्णरावाचें आपल्यावर अकृत्रिम प्रेम आहे असें समजून तो आपल्या गुपित गोष्टीही त्यास सांगूं लागला. आपल्या व काशीच्या लहानपणापासूनच्या मैत्रीच्या, पुढें लग्न झाल्यावरच्या प्रेमाच्या व प्रेमकलहाच्या बारीकसारीक गोड आठवणी, आणि तिचीं आवडतीं गाणीं यांचे पाठदेखील तो आपल्या नवीन संवगड्यास देऊं लागला व नवीन संवगडीही मोठ्या उत्सुकतेनें त्यांचें ग्रहण करून तें आपल्या स्मरणपुटांत सांठवूं लागला. जेव्हां जेव्हां लढाई थांबलेली असे तेव्हां तेव्हां ही जोडी गाणीं गात, सोंगट्या किंवा गंजिफा खेळत किंवा आपल्या आयुष्यांतील गत गोष्टी सांगत—त्यांच्यापैकीं एकाच्या खऱ्या व दुसऱ्याच्या कल्पित असत—वेळ घालवीत असत. लढाईच्या वेळीं हे दोघे वीर विजयनगरच्या फौजेवर भीमार्जुनांप्रमाणें निकराचे हल्ले करतांना एकमेकांची पाठ सोडीत नसत. एकाचा पटका एका रंगाचा व दुसऱ्याचा निराळ्याचा; यांशिवाय त्यांना एकमेकांपासून वेगळे

ओळखण्याची खूण कांहींही नसे. यामुळें विजयनगरचे कित्येक भोळवट हा भुताटकीचा खेळ आहे असें समजून रणांगणावरून पळूनही जात.

एके दिवशीं दुपारीं यशवंतरावाच्या तंबूंत ते दोघे तक्याशीं टेंकून गप्पा मारीत बसले असतां यशवंतरावाचा जरा डोळा लागला. ही संधी पाहून कृष्णरावानें तंबूंतील जिनसा चांचपडण्यास सुरवात केली. त्यांत त्यास एका सुंदर स्त्रीची तसवीर सांपडली. यशवंतरावानें पूर्वी एकदां एका फिरंगी चितार्‍याकडून आपण बायकोची तसबीर बापास न कळत काढवून घेतल्याचें गुपित कृष्णरावास सांगितलें होतें, त्यावरून ही काशीबाईची तसबीर असली पाहिजे अशी त्याची खात्री झाली. तसबीर पाहून त्याचें भान हरपल्यासारखें झालें. तिच्याकडे तो सतृष्ण नजरेनें टक लावून पाहूं लागला. शकडों भामटे कुविचार त्याच्या काळ्याभोर पापी हृदयाच्या भयाण गुहेंत जमा होऊन त्यांनीं आपसांत यशवंताचा नाश करण्याचा कट रचिला. ताबडतोब गोपाळ-गडास जावें आणि आपणच यशवंतराव आहों असें भासवून तेथची संपत्ति, किल्लेदारी व त्यांहीपेक्षां अत्यंत मूल्यवान् ठेवा म्हणजे ज्या तसबिरीनें आपली स्थिति वेड्याच्या सारखी करून सोडली आहे त्या तसबिरीच्या रेखाविषयास आपलेंसें करावें असा त्यानें निश्चय केला.

या वेळेपासून आपल्या सावजाशीं तो अधिकच लाडीगोडीनें वागूं लागला. त्याच्याशीं मुद्दाम बोलणीं काढून त्याला आपल्या बायकोच्या प्रेमाच्या गुप्त गोष्टी, बापाची व इतर नात्यागोत्याच्या माणसांची व नोकराचाकरांची भरपूर माहिती, किल्ल्याच्या निरनिराळ्या भागांची व वाटांची माहिती, पूर्वीच्या आख्यायिका हीं सर्व त्यानें सांगावयास

लाविलीं आणि त्यांचा आपल्या कपटी स्मरणशील डोक्यांत संग्रह करून ठेविला.

तसेंच ती तसबीर त्यानें एकदां चोरून आपल्या तंबूत नेली व रातोरात जाग्रण करून तिची सुरेख नक्कल करून त्यांपैकीं एक तसवीर यशवंतरावाच्या तंबूंत मूळचे जागीं नेऊन ठेविली. एवढें काम झाल्यावर आतां यशवंतास ठार करून स्वतः त्याचा तोतया बनून जाणेंच काय तें शिल्लक राहिलें; तथापि यशवंताचा निकाल लावणें हें फारसें सोपें काम नव्हतें, कारण त्याच्या खुनाचा संशय आपल्या स्वतःवरच येणार अशी त्याची खात्री होती. तेव्हां योग्य संधी साधूनच तें काम उरकलें पाहिजे असें त्यानें ठरविलें.

लौकरच बादशहाच्या सैन्याची तुकडी विजयनगरकरांच्या फौजेवर हुलकावणीवजा हल्ला करण्यास चालून गेली. हा हल्ला करून या तुकडीनें हिंदु सैन्यास एका ठिकाणीं गुंतवावें व तेवढ्यांत दुसऱ्या तुकडीनें हिंदु राजधानीच्या आसपासच्या दोनचार गांवांस लुटून बेचिराख करावें असा बादशहाचा विचार होता. बादशाही सैन्याच्या ज्या तुकडीनें विजयनगरच्या सैन्यावर हल्ला केला तिलाच हिंदूंनीं वेढिलें व तिच्यांतील निम्याशिम्यांस कंठस्नान घातलें. तींतच यशवंतराव व कृष्णरावही होते. यशवंतरावास बऱ्याच जखमा झाल्या होत्या तरी तो आवेशानें आपली तरवार चालवून आपल्या "अन्नदात्या बादशहाच्या" शत्रूंस हात दाखवीत होता, इतक्यांत एकदम बऱ्याच जणांनीं त्यास वेढा घालून कैद केलें. तोंच कृष्णराव समोरून धांवत आला. बादशाही सैन्यांतील कोणीही इसम आसपास नाहीं, आपला पोषाख यशवंतरावाच्यासारखाच आहे, त्यामुळें यशवंतराव कृष्णरावास मारीत आहे की कृष्णराव यशवंतरावास,

हें समजण्यास कोणालाही–शत्रुसैन्यालाही–मार्ग नाहीं, अशी खात्री असल्यानें हीच संधी आपला नीच हेतु साध्य करण्यास खाशी आहे असें त्यास वाटत होतें.

यशवंतरावास त्याच्या नीचपणाची कल्पनाही नसल्यानें वाटलें कीं, आपला जिवलग सोबती आपल्या साहाय्यार्थ धांवून येत आहे, म्हणून त्यानें आपले हात उचलून त्यास खूण केली. ज्या शिपायांनीं यशवंतरावास गराडा घातला होता, त्यांस जरी या दोन वीरांमधील अद्भुत सादृश्याची ऐकून माहिती होती, तरी त्यांनीं प्रत्यक्ष दोघांस एकाच ठिकाणीं पाहिलें नसल्यानें ते विस्मित होऊन कृष्णरावाकडे पहाण्यांत गुंतले. कृष्णराव आवेशानें पुढें आला व आपल्या रक्षणाची वाट पहाणाऱ्या यशवंतरावाच्या डोक्यावर तरवारीनें प्रहार करूं लागला. हा विलक्षण व अनपेक्षित प्रकार पाहून ते शिपाई विशेषच आश्चर्यचकित झाले. हा कृष्णराव भ्रमांत तर नाहीं ना असें वाटून, “अरे कृष्णराव! मी तुझा स्नेही यशवंत–मला विसरलास का? मला काय वेड्यासारखा मारतोस?” असें यशवंतराव ओरडूं लागला. कृष्णरावाचा प्रतिकार करण्याची त्याला शुद्ध राहिली नाहीं. कृष्णरावानें तरवारीचा एक घाव यशवंतरावाच्या पटक्यावर घातला. पटक्याचे दोन तुकडे झाले; पण त्याच्या मध्यस्थपणानें डोक्याचें मात्र थोडेंसें रक्षण झालें असावें; कारण घावाचा जोर कमी झाल्यानें डोक्याचा भंग न होतां त्यास फक्त जखम झाली व तो बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला व आतां विजयनगरच्या सैनिकांकडून आपलें जें काय पारिपत्य होणार असेल तें होवो अशा निश्चयानें कृष्णरावानें आपलें अंग त्याच्या शेजारींच टाकून दिलें. इतक्यांत विजयनगरच्या

शिपायांनीं त्यांच्या भोंवतीं वेढा दिल्यानें पुढें काय झालें तें कळलें नाहीं.

बादशाही सैन्याचे एकदोन पळपुटे वीर परत आपल्या गोटांत आले, तेव्हां वरील चमत्कारिक हकीकत त्यांनीं सर्वांस निवेदन केली. त्या दोघां सांबत्यांचा बाकीचा वृत्तांत त्यांस माहीत झाला नाहीं व तो खोटाच जुळवून सांगण्याच्या भरीस ते पडले नाहींत.

• • •

## पुनर्मीलन

३

आपला युद्धाला गेलेला पति आज येईल, उद्यां येईल, अशी आशा करीत काशीनें बरेच महिने घालविले "मामाजींना तिकडून" फार दिवसांत पत्र आलें नाहीं असें पाहून ती चिंतायुक्त होई व तिचा प्रेमळ सासरा स्वतःच्या मनांत धुमसणारी काळजी तशीच दाबून "मुली, तो गुंतला असेल कामांत. त्याला घरीं कळवायला कशाचें फावणार?" असें बोलून तिचें दुःख शमन करण्याचा यत्न करी. शेवटीं कृष्णरावाच्या शस्त्रप्रहारानें झालेल्या घाताची बातमी गोपाळगडावर येऊन थडकली. ती प्रथम वदंता समजून त्या दोघांनीं आशेच्या तंतूचा आधार सोडला नाहीं; परंतु दोनतीन दिवसांतच बादशहाचें सांत्वनपर पत्र आलें, त्या वेळीं त्यांस जें अपरिमित दुःख

झालें त्याची कल्पना करणें कठीण आहे. तथापि यशवंतराव 'मेलाच' असेल अशी त्यांची खात्री अद्याप झाली नाहीं. कारण ज्यांचीं स्वरूपें सारखीं आहेत असे दोन योद्धे विजयनगरच्या राजाच्या कैदेंत आहेत अशी अविश्वसनीय बातमी त्यांच्या कानीं पडून त्यांच्या आशेला काडीचा आधार देत होती.

त्यांतून ' यशवंतरावच ' मेला असेल असें मानण्याला तरी काय पुरावा होता ? यशवंतरावानेंच त्या आपल्यासारख्या दिसणाऱ्या योद्धयाला मारलें नसेल म्हणून तरी कशावरून ?

सहा पावसाळे लोटले. उन्हाळ्यानें सुकवून टाकलेल्या सृष्टीला पुनरुज्जीवन देणारा प्रत्येक पावसाळा संपला कीं ती नवी सौभाग्य-संपन्न सृष्टि पाहून काशीबाईला स्वतःच्या हल्लीं डळमळीत असलेल्या सौभाग्याच्या पुनरुज्जीवनाची आशा उत्पन्न होई. लोकप्रवाद आपल्या सहस्र विसंवादी जिव्हांनीं परस्परविरोधी विधानें करून तिच्या अंतःकरणाची कालवाकालव उडवून टाकी. तिला आपल्या धड ना सुवासिनी, धड ना विधवा, अशा संशयित अवस्थेनें वेड देखील लागलें असतें; पण लहानग्या चंद्रभागेच्या बाललीलांनीं तिचें मन आकृष्ट होऊन पतिवियोग—( किंवा पतिनिधन—कोण जाणे ? ) दुःखाचा तिला मधून मधून विसर पडे म्हणून तिचें मन या वादळांतून निभावून गेलें.

कालरूपी पाथरवटाच्या टांकीनें म्हाताऱ्या गुणवंतरावाच्या गालावर हळू हळू सुरकुत्या खोदल्या. पुत्रशोकाच्या झऱ्यांत उगम पावलेले अश्रुबिंदू त्या सुरकुत्यांतून वाहूं लागले. तथापि नातीच्या कौतुकानें व आवडत्या सुनेच्या काळजीनें ते बिचारे स्वतःच्या दुःखावर आशेचें पांघरूण घालीत असत. चंद्रभागेची बाल्यावस्था

दुःखमय वातावरणांत जात होती. ज्या आईचें दूध ती पिई ती सदा अश्रु ढाळीत बसावयाची; आजोबांच्या खांद्यावर बागडावयाचें तर ते सदा उदासवाणे; यामुळें तिच्या खेळण्यांतही दुःखीपणाची छाया दिसून येई. तिच्या चेष्टा हूडपणाच्या नसून त्यांत इतर मुलींच्यापेक्षां उत्साह कमी दिसत असे. एकांतांत खेळण्याची अगर आपल्याशींच बोलत अगर गात बसण्याची तिला आवड होती.

गडाच्या व पायथ्यामधल्या साधारण अर्ध्या अंतरावर व्याघ्रेश्वरी अथवा वाघाईचें देऊळ एका भव्य पिंपळाखालीं होतें. ही स्वयंभू व जागृत देवता भक्तांच्या कामना पूर्ण करण्याबद्दल प्रसिद्ध होती. देऊळ लहानसेंच होतें व मंगळवार-शुक्रवार किंवा नवरात्राखेरीज इतर दिवशीं गुरव पूजा करून गेल्यावर तेथें काळें कुत्रेंसुद्धां फिरकत नसे. अलिकडे या देवळांत काशीबाई आपल्या मुलीस घेऊन येई व एका बुवानें सांगितलेल्या मंत्राचा जप करीत बसे. किल्ल्यावरील वाड्यांत बसून गड्यामोलकरणींचीं खोटीं सांत्वनें ऐकण्याचा तिला कंटाळा आला होता; कारण हीं माणसें तोंडावर तिचें सांत्वन करून मागाहून फिदीफिदी हसतात असें तिच्या नजरेस आलें होतें. तिचा चुलत दीर बाळोबा तिच्याशीं मोकळ्या मनानें गप्पागोष्टी करीत असे, तसाच तो गुणवंतरावाच्याही दुःखाला विरंगुळा पाडीत असे. परंतु वर सांगितलेली अनिष्ट बातमी ऐकल्यापासून लोभाजीरावानें त्याच्या मनांत ठाणें दिलें. त्याच्या मोकळ्या व शुद्ध असलेल्या मनावर संपत्ति, सत्ता, व किल्लेदारी यांचीं चित्रें उमटूं लागलीं; कारण यशवंतराव निपुत्रिक वारल्यास त्याची किल्लेदारी यासच मिळावयाची होती. बाळोबानें या नूतनोद्भूत मनोविकारास मुळांतच छाटून टाकण्याचा यत्न केला; परंतु त्याच्या मनास लहानपणापासून सुसंस्काराचें द्वार बसविलेलें

नसल्यानें पुनः पुनः तो मनोविकार त्याच्या दुर्विनीत चित्तांत चोराप्रमाणें प्रवेश करी. हळूहळू लोभानें त्याच्या मनावर पूर्ण पगडा बसविला व त्याच्या नीच स्नेह्यांसोबत्यांनीं त्याच्या मनांत कुविचार भरवून दिले. “ज्या अर्थी माझा चुलतभाऊ येसू मेला आहे; त्या अर्थी जी जिनगी कायदेशीर रीतीनें माझी होते, तिची इच्छा धरण्यांत कोणता गुन्हा आहे?”

या विचाराचें पर्यवसान पुढील दुरिच्छेंत साहजिकपणें झालें— “आणि जर हे वृद्ध काका माझ्या धनप्राप्तीच्या आड येत असले तर त्यांनीं लवकरच डोळे मिटावे अशी जर मला स्वाभाविक इच्छा झाली तर ती काय वावगी आहे? हो; त्यांचे सुखोपभोगाचे दिवस संपले आहेत; मी ऐन ज्वानींत आहें. मग त्यांनीं निष्कारण जगून माझें तारुण्य कां फुकट दवडावें!” पण म्हातारे गुणवंतराव जिवंत राहिले. आपल्या भुकेबंगाल पुतण्याच्या अमंगळ इच्छाशक्तीचा त्यांच्या शरीरावर म्हणण्यासारखा परिणाम झाला नाहीं; उलट बाळोबा मात्र खंगत चालला व वरील दुरिच्छेची वाढ पुढील कुविचारांत झाली, “ज्या अर्थी हा थेरडा स्वतः होऊन नाहींसा होत नाहीं, त्या अर्थी मींच त्याला इहलोकांतून हद्दपार केलें तर काय बिघडेल? दोन वर्षें आधींपासूनच याला स्वर्गसुखाचा अनुभव घ्यावयास मिळेल व पुत्रवियोगाचें दुःख तितकेंच कमी होईल. याला मारणें म्हणजे याच्यावर उपकार करणेंच होय.” अशा विचारसरणीनें वाटेल तें अधम कृत्य करण्याची त्याच्या मनाची तयारी झाली. इतके दिवस तो यशवंतरावास दिलेल्या वचनाप्रमाणें काशीवहिनीशीं प्रेमळपणानें वागत असे; परंतु अलिकडे त्याच्या वर्तनांत पूर्वींचा मनमोकळेपणा दिसूं येईनासा झाला.

यशवंत लढाईवर निघून गेला त्यास सहा वर्षे व त्याच्या संशयित मृत्यूची वार्ता येऊन पुष्कळ काळ होऊन गेला. गडावरील त्या हतभागी कुटुंबांत औदासीन्य पसरलें होतें, त्याची छाया गडकऱ्यां-वरही पडलेली दिसे पांथस्थ, वारकरी, हरिदास, चित्रकथी, वगैरे लोक वारंवार गडावर येत. त्यांची योग्य संभावना करण्यांत कसूर होत नसे. पूर्वीप्रमाणें तमाशे, गाण्यावजावण्याचे जलसे, खेळ, ललितें, यांच्या सारख्या निव्वळ करमणुकीच्या प्रकारांना मात्र छाटा मिळाला होता. तरी गुणी जनांचा गुणवंतरावाकडून सत्कार होत असे व निराश्रित स्त्रीपुरुषांना किल्लेदाराच्या घरच्या पडवींत प्रेमळ व सहानुभूतिपूर्वक आश्रय मिळतच असे.

एके दिवशीं दुपारीं काशीबाई नित्यनियमाप्रमाणें वात्राईच्या देवळांत बसून जप करीत होती. कांहीं वेळानें ज्या साधूनें तिला मंत्र दिला होता तो अंघोळखाणें आटोपून तेथें येतांच त्याच्याकडे पाहून डोळ्यांत आंसवें आणून ती म्हणाली, " बुवा ! आज तीन वार झाले, तुम्हीं दिलेल्या मंत्राचा एकशेंआठ जप न चुकतां मी दररोज करतें आहें. पण देवीची कृपा होत नाहीं ! "

बुवा उत्तरले, " बेटा, धीर नहीं छोडना. माझा मंत्र अचूक आहे. मनकी कामना पुरती केल्याबिगर कभी नहीं राहील. "

" चुकायचा नाहीं असं म्हणतां तर खात्रीनं सांगा पाहूं त्याचा प्रत्यय कधीं येईल तो. मला तर आतां तुमच्या नादीं उगीच लागलें असं वाटायला लागलं आहे. अशाच एका साधूंनीं–साधु कशाचा, भोंदूच तो–त्यांनीं माझ्या आईला मुलगा होईल म्हणून मंत्र दिला, तिला पैसे खर्चायला लावले अन् शेवटीं– "

" बस हुआ बाई ! " साधु घुश्शांत येऊन म्हणाला, " तुझा

माझ्यावर भरंवसा नाहीं तर एका घटकेच्या आंत तुला माझ्या योगाचा प्रभाव दावतों. असा स्वार्थसाधु नाहीं हा बुवा ! पर ज्या अर्थी तूं माझ्यावर गैरविश्वास दावती आहेस त्या अर्थी हेंही सांगून ठेवतों कीं, नवरा जवल असूनवी तीन वरस तुम्हां दोघांना बिलकूल सुख लागणार नाहीं. अच्छा, तूं आईमातेसमोर वैस मंत्राचा जप करीत, मीवी येथें ध्यान लावून वसतों. एक घटकेमंदी तुझा नवरा नाहीं भेटला तर बुवाचा समदा योगसाधन धुनीमंदी गेला."

बुवांनीं इतकें निक्षून सांगितल्यावर काशीची खात्री पटली व ती डोळे मिटून मंत्राचा जप करीत बसली. बुवाजींची स्वारीही चिलीम पेटवून तींतील धुरावाटे आपला आत्मा ब्रह्मांडीं नेत स्वस्थ वसली. इतक्यांत आकाशांत भराभर काळेकुट्ट ढग जमून कर्णभेदक गर्जना करूं लागले. दिवस असतांही तिन्हीसांजच्या वेळेप्रमाणें अंधुक अंधकाराचें आवरण सृष्टीवर पसरलें व त्यांत कडकडाट करीत विजा चमकूं लागल्या. तो भीषण देखावा पाहून किल्ल्याच्या पायथ्यावर निर्भयपणें इतका वेळ चरत असलेलीं गुरें धांवत येऊन देवळाच्या आश्रयानें उभीं राहिलीं. तथापि दुःखानें होरपळून गेलेल्या काशीबाईच्या अंतःकरणास लवमात्र भीति वाटली नाहीं. बुवांनींच हा चमत्कार घडवून आणला असेल असें वाटून तिनें आपला जप चालू ठेविला. हवा अधिक थंड झाल्यामुळें चिलमीचें सेवन दुप्पट प्रेमानें करण्याचा सपाटा लावला; परंतु या प्रखर सृष्टिकोपाचा त्यांच्या निधड्या छातीवर कांहींही परिणाम झाला नाहीं.

एकशेंआठ जप पूर्ण झाल्यावर देवीच्या चरणांवर मस्तक ठेवून तिचा प्रसाद मागितला व मग बुवांकडे येऊन त्यांस त्रिवार

नमस्कार केला; त्यांनीं अष्टपुत्रा सौभाग्यवती भव असा आशीर्वाद देऊन हातानेंच तिला जरा बसण्याची खूण केली. तोंच आकाशांतून कडकड कडकड आवाज करीत शेजारच्या उंबराच्या झाडावर वीज पडली व तें जुनें झाड धाडकन् खालीं पडलें. त्या दोन्ही आवाजांच्या व त्या विजेच्या चकचकाटाच्या हृदयभेदकत्वामुळें आधींच विरहकृश झालेली काशीची देहलता मूर्च्छित होऊन जमिनीवर पडली.

एक सवाष्ण बाई येऊन आपणास कुंकू लावून खणानारळांनीं आपली ओटी भरीत आहे असें तिला तोच तो विचार सारखा मनांत घोकत असल्यानें स्वप्न पडलें किंवा त्या काळच्या समजुतीप्रमाणें तिला दृष्टान्त झाला म्हटलें तरी चालेल. किंचित् काळानें आपलें डोकें उशीवर ठेवलें आहे. कपाळास कसला तरी गार स्पर्श लागत आहे व वाऱ्याची झुळुक येत आहे असा सुखकारक भास होऊन तिनें डोळे उघडले. तों एक काटकिळा, डोळे खोल गेलेला, हजामत वाढलेला पुरुष आपलें डोकें मांडीवर घेऊन बसला आहे असें दृष्टीस पडून ती चपापून उठूं लागली, तेव्हां त्या पुरुषानें तिचा हात धरून म्हटलें, “ अग, उठूं नको. भिण्याचं कारण नाहीं. मला ओळखलं नाहींस का ? ” काशीनें त्याजकडे अमळ निरखून पाहातांच तो यशवंतरावच आहे अशी तिची खात्री झाली व “ कोण, आपणच का असायचं ! ” असें पुटपुटत तिनें लाजून मान खालीं घातली. “ होय, होय, तोच मी तुझा दुर्दैवी यशवंत ”— म्हणत यशवंतरावानें—

पण या सहा वर्षांनीं भेटलेल्या जोडप्याच्या एकांतांतील गोष्टी मी कशाला दुसऱ्यांना सांगूं ?

• • •

विभाग मा. बा.
क्रमांक १५९ आत्मनिवेदन
ता. दि. १-४-५१
वाचनालय

## आत्मनिवेदन

क्रुद्ध झालेली सृष्टि शांत झाली. मेघगर्जनांच्या आवाजांचे प्रतिध्वनी अति दूरच्या पहाडांतूनच काय ते अस्पष्टपणें कानांवर पडूं लागले. वाऱ्याच्या मंद झुळुका येऊन त्यांच्या योगानें झाडांच्या पानांवर इतका वेळ सांचून राहिलेले पाण्याचे थेंब टपटप जमिनीवर पडूं लागले. बेडकांचे थवे आनंदित होऊन आपल्या लपण्याच्या थंड जागांतून बाहेर येऊन डरांव डरांव करूं लागले. बराच वेळ घरट्यांत कुचंबून राहिलेल्या पक्ष्यांनीं बाहेर येऊन आपापले शब्द काढण्यास सुरवात केली. शेतांतील पिकांवर, माळजागेंतील गवतावर, शेतकऱ्यांच्या तोंडावर तजेला आला. चोहोंकडे आनंदीआनंद दिसूं लागला.

त्याचप्रमाणें किल्लेदाराचा मुलगा परत आल्याबद्दल, कांहीं खाल्ल्या घरचे वांसे मोजणाऱ्या व विघ्नसंतोषी माणसांखेरीज गोपाळगडच्या इतर सर्व रहिवाश्यांस आनंद झाला. यशवंताला भेटण्याकरितां सर्व रहिवाश्यांचा मोठा जमाव दिवेलागणीच्या वेळीं गुणवंतरावांच्या घरापुढें जमला. पण गुणवंतरावांनीं पुढें येऊन सर्वांस हात जोडून विनंति केली कीं, “आतां येसूला प्रवासाचा शीण आला आहे म्हणून तो निजला आहे. त्याला भेटण्याकरितां सर्व मंडळींनीं सकाळीं येण्याचं करावं.” तेव्हां ते निराश होऊन घरोघर परतले.

यशवंतास रात्रीं झोंप लागलेली पाहून काशीबाई अंथरुणावरून उठली व आपल्याला माहीत असलेल्या सगळ्या देवांच्या गाण्यांनीं तिनें सर्व देवदेवींची कृतज्ञतापूर्वक प्रार्थना केली व नंतर देवदेवतां-पेक्षां पूज्य वाटणाऱ्या पतिदेवाला न्याहाळून पाहाण्यास तिनें यश-

वंताच्या चेहऱ्याकडे मान वांकविली. त्याच्या स्वरूपांत झालेला बदल आनंदाच्या पहिल्या झटक्यांत तिच्या ध्यानांत आला नव्हता. दीर्घ काळ दुःखाकष्टांत घालविल्यानें त्याच्या चेहऱ्यांत फारच फरक पडला होता यांत संशय नाहीं. परंतु त्याची आपल्या बायकोवरील माया मात्र कमी झालेली दिसत नव्हती. एवढें असल्यावर तिला आणखी काय पाहिजे होतें ? तथापि नवऱ्याला तोंडावर ओणवी होऊन बराच वेळ न्याहाळून पाहिल्यावर तिच्या मनांत एक तऱ्हेचा किंतु आला व तो तिला दूर सारवेना. त्याच्या डोळ्याखालीं नवीन उद्भवलेले वळ पाहून तिला कांहीं भीति वाटली नाहीं; परंतु झोंपेंतील त्याचें अस्वस्थ चलनवलन पाहून मात्र तिला विस्मय वाटूं लागला. आतां स्वगृहीं सुखरूपपणें पोहोंचल्यावर, जिवाभावाच्या माणसांच्या भेटी पडल्यावर त्याला स्वस्थ झोंप लागावी, ती न लागतां तो एकसारखा झोपेंत भीतियुक्त चेहरा करी व एखाद्या शत्रूस मारण्याकरितांच जणुं हात उगारी व पुनः सुस्कारा टाकून स्वस्थ पडे. हें पाहून तिनें आपल्या कोमल हातांनीं त्यास किंचित् हालवून म्हटलें, " हें काय बरं ? आतां कोणावर रागवायचं ? आपण गडावर घरीं परत नाहीं का यायचं झालं ? " परंतु हालविण्यानें पुरता जागा होऊन पलंगावरून उडी मारून तो, " हरामखोर ! भोग आपल्या कर्माचीं फळं. आतां तुझे दोन तुकडे करून टाकतों ! " असे उद्गार काढीत आवेशानें कल्पनानिर्मित तरवार परजीत परंतु नेत्रांतून अश्रुबिंदू ढाळीत तो आपल्या चकित झालेल्या बायकोपुढें उभा राहिला.

आदल्या दिवशींच्या वादळापुढेंही उडाली नसेल इतकी त्याच्या भयचकित व क्रुद्ध मुद्रेपुढें तिची गाळण उडाली. तोंच क्षुब्ध झालेल्या यशवंतानें आपले डोळे चोळले व समोर आपला शत्रु

उभा नसून आपली आवडती बायकोच आहे असें पाहून त्यानें तिची पाठ कुरवाळीत म्हटलें, " अग, भिऊं नकोस. अशी माझ्या मनाला वारंवार भ्रांति पडते. पण माझी तुझ्या वरची प्रीति कमी व्हायची नाहीं. मी लढाईवर जायच्या आधीं तूं माझी जितकी लाडकी होतीस त्यापेक्षां केसभरही कमी आतां नाहींस. ये, घाबरूं नको. "

या सांत्वनपर उद्गारांनीं काशीच्या मनांतील कुशंकेचा नायनाट होऊन गेला. कारण खऱ्या प्रेमाच्या अथांग समुद्रावर जरी संशयाचा फेस लाटेनें क्षणभर आला तरी तो नाहींसा होऊन जाण्यास कितीसा वेळ लागणार ? काशीनें आपल्या हृदयाची धडकी दाबून त्यास त्याच्या चमत्कारिक वर्तनाचें कारण विचारलें.

" जाऊं दे ग ते विचार. गेली ती गोष्ट; पण स्वप्नांत अशी ती पुनःपुनः येते. ती सांगून तुला दुःख मात्र होईल. " त्यानें उत्तर दिलें. इतक्यांत दाराशीं बापाच्या आवाजांतील, " येसू ! ऊठ बाबा, उन्हं दिसील पडलीं. तुझ्या समाचाराला ही मंडळी जमून वाहूळ वाट पहात आहे. चल. " असे शब्द त्याला ऐकूं आले. " आलों हं नाना पाव घटकेंत. " असें म्हणून उठत उठत बायकोस उद्देशून तो पुटपुटला, " आतां या लोकांची मला बरोबर आठवण कशी होणार देव जाणे ! हे लहानपणच्या ओळखीचे चेहरे मला आतां मुळींच ओळखूं येणार नाहींत. सुदैवानं तुझी, नानांची, आणखी या लाडक्या चंद्रीची आठवण या माझ्या अंतःकरणांत इतकी खोल रुजली आहे कीं, ती मात्र उमळून पडणं शक्य नाहीं. ही पहा तुझी तसबीर. इतक्या संकटांतून सुरक्षितपणें मीं आपल्या छातीशीं बाळगून ठेवली होती ! " असें म्हणून त्यानें बंडीच्या आंतल्या खिशांतून सर्दी व

घाम यांच्या सहा वर्षांच्या मान्यानें खराब होत चाललेली ती तसबीर काढिली व तिला दाखविली.

त्या तसबिरीकडे न्याहाळून पहात काशी कपाळास आठ्या घालीत उद्गारली, " तीच का ही तसबीर ? मला तर ही निराळी वाटती आहे ! ' कशावरून ' म्हटलं ? माझ्या तसबिरींत माझ्या हातांत गुलाबाचं फूल नव्हतं; पण हें पहा, या दोन बोटांच्या चिमटींत फूल दिसतं आहे ! "

" वेडी आहेस ! फूल नव्हतं तर काय तुझ्या बोटांतूनच तें उमललं का काय ? तुझीं बोटं गुलाबाच्या कळ्यांसारखीं दिसत असलीं तरी त्यांचीं कांहीं फुलं व्हावयाचीं नाहींत कांहीं ! पहिल्यांदा तुझ्या लक्षांत तें आलं नसेल झालं. आणखी माझं लक्ष या चित्रांतल्या चेहऱ्यावर इतकं खिळलेलं आहे कीं बोटांत फूल आहे का नाहीं कधीं म्यां पाहिलंच नाहीं. "

आपल्यावरील नवऱ्याच्या निश्चल प्रेमाचा हा पुरावा पाहून काशीच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. कारण त्या काळीं, लग्नाच्या पुष्कळ बायका करून शिवाय त्यांच्याव्यतिरिक्त हलक्या स्त्रियांवरही कृपादृष्टि ठेविण्याची खानदानीच्या श्रीमंतांची चाल असे. लग्नाच्या बायकोवर प्रेम ठेवणें हा स्त्रैणपणा नांवाचा दुर्गुण समजत असत. " ते म्हणाले, कोण आहे ? मी आहें; " इतकें संभाषण पतिपत्नींत झालें तरी त्यांत अभिमान बाळगण्याची पाळी पुष्कळ ' नावडत्या, ' बायकांवर येई; अर्थात् नवऱ्याचें आपल्यावरील एकनिष्ठ प्रेम पाहून काशीस अभिमान व आनंद वाटावा आणि तसबिरींतील फुलाबद्दलच्या शंकेचा विसर पडावा यांत नवल नाहीं. असो.

ती तसवीर पुनः वंडीच्या खिशांत कोंबून तो घाईघाईनें खोलीच्या बाहेर आला. गुणवंतराव त्याची वाट पहात बाहेरच येरझारा घालीत होते. त्यांनीं त्यास प्रातर्विधि आटोपून कपडे करून लौकर येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें डोकीस जरीचा पटका, अंगांत अंगरखा, पायावर र वार, अशीं वस्त्रें धारण करून काखेंत दुपेटयाची घडी मारून वाडयासमोरील अंगणांत येऊन त्यानें सर्वांस प्रेमानें व नम्रपणें मुजरा केला. खऱ्या आनंदास चौघडे-सनयांचें मंजुळ पण भाडोत्री वादन नको असतें. मनःपूर्वक स्वागतास वाद्यांच्या आवाजापेक्षां व पोटभरू कवि अगर शाहिरांनीं रचलेल्या अतिशयोक्तिपूर्ण कवनांपेक्षां मोकळ्या मनांनीं काढिलेले अडाणी पण प्रेमळ जनांचे अकृत्रिम जयजयकारच अधिक शोभा आणतात. गोपाळगडाच्या भिंतीकडयांवरून असले आवाज पडसादांनीं दुमदुमूं लागले. इतके दिवस गडाचे सांदीकोपरे देखील व्यापून बसलेला उदास भयाणपणा या आवाजांना भिऊन पळून गेला व उल्हासानें सर्व किल्ला भरून टाकिला. यशवंतराव सुख-रूपपणें परत आल्याची बातमी रातोरात आसपासच्या गांवांतून पसरली. झुंडीच्या झुंडी त्याच्या दर्शनासाठीं गडावर लोटल्या.

वारा, ऊन्ह, पाऊस व विजा यांच्या माऱ्याला शतकेंच्या शतकें उभ्या असलेल्या दिल्लीच्या लोहस्तंभाप्रमाणें डौलानें छाती पुढें करून यशवंतराव लोकांच्या थव्याच्या मध्यभागीं उभा राहिला. त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याचा वृद्ध पिता काळाशीं झुंजून झुंजून मोडकळीस आलेल्या किल्ल्याच्या भिंताडाप्रमाणें उभा होता. नवीन फुटलेल्या चांफेकळीप्रमाणें शोभणारी यशवंताची मुलगी चंद्रभागा आजोबांच्या मांडीशीं घसटून उभी होती व मागील बाजूच्या एका खिडकींतून काशी आपल्याला परत मिळालेल्या सौभाग्यनिधीकडे

प्रेमानें पाहात होती. कुटुंबाचें अधिक मनोवेधक चित्र कोणत्याही चित्रकारास काढितां आलें नसतें.

यशवंतराव सर्वांस सारख्या प्रेमानें व आदरानें भेटला. भेटतांना कोणाचेंही नांव त्यानें उच्चारिलें नाहीं. हा त्याच्या गर्हिवरण्याचा परिणाम असावा असें सर्वांस प्रथम वाटलें. सर्वांच्या भेटी झाल्यावर गुणवंतराव म्हणाले, "गडयांनो, येसू आतां फार दाटला आहे. त्याच्याच्यानं कोणाशीं बोलवत नाहीं याचा राग मनांत आणूं नका. 'खरं प्रेम मुकं असतं; लटकं प्रेम बोलकं असतं.' असं कोणत्याशा पदांत म्हटलं आहे तशांतलं आहे. आतां या आनंदाच्या वेळीं सर्वांनीं इथेंच मुक्काम करावा. जेवणाची तयारी इथेंच होईल. कोणाला घरीं जायचं असेल तर त्यांनीं येतांना आपल्या बायकापोरांना घेऊन परत यायलाच जावं. येसू आपली हकीगत दुपारीं सगळ्यांना सांगेल." पूर्वीच्या रीतीप्रमाणें दुपारच्या जेवणास उशीर होत होत मध्यान्हानंतर चार घटकांनीं पुरुषांचीं जेवणें आटोपलीं. जेवणानंतर पानसुपारी झाली. त्या वेळीं सर्वांचे डोळे यशवंताकडे लागून राहिले होते. यशवंत लढाईंतून नाहींसा कसा झाला, इतकीं वर्षें कोठें होता, परत कसा आला, वगैरे हकीगत ऐकण्याची सर्वांस उत्कंठा लागून राहिली होती व ती पूर्ण करून घेण्याकरितां ते त्यास विनंती करण्याच्या विचारांत होते. किल्ल्यावरील चिटणीस सर्वांच्या वतीनें उभा राहिला व त्यानें, "यशवंतराव, गरीबाची आठवण विसरलां नसालच!" अशी बोलण्यास सुरवात केली.

यशवंतानें त्याच्याकडे शून्य दृष्टीनें पाहिलें व परिचयाचें स्मित केलें. पण तें कृत्रिम होतें. चिटणिसास त्यानें खरोखरच ओळखलें

नाहीं. "अरे, हे आपले आप्पा चिटणीस!" गुणवंतरावांनीं सुचविलें. "हो, हो." असें कसेंबसें उत्तर देऊन तो गप्प बसला.

हें पाहून हा आपल्याला तरी ओळखतो का हें पहाण्यासाठीं ज्यानें त्याला लहानपणापासून अंगाखांद्यावर खेळविलें होतें तो धोंडू जमादार पुढें आला व त्यानें, "काय भाऊराव, वळखलं का जी मला?" असें विचारलें. त्याच्याहीकडे तशीच निर्विकार नजर फेकून यशवंतराव विचार करूं लागला. त्याचे कित्येक लहानपणाचे सोबती पुढें आले व त्यांनींही त्याची विचारपूस केली. परंतु त्यांपैकीं एकासही यशवंत ओळखूं शकला नाहीं. बिचाऱ्याचा चेहरा अगदीं ओशाळल्यागत झाला. सर्व जमलेल्या लोकांत कुजबुज सुरू झाली.

ती कुजबुज ऐकून यशवंत उभा राहिला, तेव्हां तो काय बोलतो हें ऐकण्यासाठीं सर्वजण शांत राहिले. तो बोलूं लागला, "गडे हो! आमच्या आनंदामुळें तुम्हांला आनंद झाला, आमच्या दुःखामुळें तुम्हांला दुःख झालें होतें. या आमच्यावरच्या तुमच्या पोट-तिडकीमुळें तुम्हीं आमच्यावर उपकारांचें ओझें करून ठेवलें आहे. पण तुमच्यांतल्या कांहीं जणांना मीं ओळखलें नाहीं याचें कारण उन्मत्तपणा नाहीं तर तें माझें दुर्दैव आहे. त्या दुर्दैवाची कहाणी ऐकण्याची तुमची इच्छा आहे, म्हणून सांगतों. लढाईत माझ्या डोक्यावर प्रहार झाला आणि मी बेशुद्ध होऊन पडलों येथपर्यंत सगळी माहिती तुम्हांला ऐकून माहीत झालेली असेलच. पुढें काय झालें तें सांगतों. मी बेशुद्ध झालों त्या वेळीं यमाच्या राज्यांत जाऊन पडलों आहें कीं काय असें मला वाटत होतें. भोंवतालीं हातपाय तुटलेले आणि मरणाच्या पंथाला लागलेले शिपाई पाणी पाणी करीत विव्हळत होते, आणि गुरांचा पाय पडून चिरडलेले किडे जसे वेदनेनें वळवळ

करतात तसे लोळत होते; तर कित्येक धडें व शिरेंही तशींच पडलेली दिसत होतीं. कोल्हीं, कुत्रीं, गिधाडें मिटक्या मारीत प्रेतांचे आणि निवारण करण्याचें त्राण न उरलेल्या जखमी शिपायांचे लचके तोडीत होतीं. मी अर्धवट गुंगींत होतों. तेव्हां मी मरेन असें मला वाटत होतें; पण कांहीं वेळानें मी पूर्ण बेशुद्ध झालों. जागा झाल्यावर मधांचा देखावा बदलल्यासारखा दिसला. सकाळची वेळ झाल्यामुळें कोल्हींचिल्हीं पळून गेलीं होतीं. भोंवतीं थंडगार धुकें पसरून तें आयतेंच जिवंत राहिलेल्या शिपायांची तहान कमी करीत होतें. माझ्या जखमा कोणीं तरी फडक्यानें बांधल्यामुळें व त्यांवर सकाळचा मंद वारा लागत असल्यानें दुःख कमी झालें होतें. कित्येक लोक तेथें पडलेल्या शिपायांच्या जखमा बांधण्याचें काम करीत होते. इतक्यांत विजयनगरचे शिपाई तेथें आले व त्यांनीं जिवंत असलेल्या सगळ्या जखमी शिपायांना उचलून आपल्या तळावर नेलें. त्यांतच माझीही रवानगी झाली.

" विजयनगरास गेल्यावर मी बरा झाल्यानंतर तेथल्या रामराजापुढें मला नेण्यांत आलें. रामराजानें माझें आणखी कोणत्याशा पुरुषाचें फार साम्य असल्याबद्दल आश्चर्य प्रगट केलें. परंतु मला त्याची फारशी आठवण नव्हती. मी लढाईंत मुसलमानांच्या बाजूनें लढलों याबद्दल रामराजानें माझी फार निंदा केली. पण त्या वेळीं मुसलमान हेच आपले अन्नदाते आहेत, त्यांचीच सेवा करणें हा आपला धर्म आहे, अशी माझी खोटी समजूत झालेली असल्यानें मीं त्यास भर सभेंत दुरुत्तरें केलीं. त्यासरशीं रागावून त्यानें मला बंदीशाळेंत जखडून टाकण्याचा हुकूम केला. बंदीशाळेंत असतांना त्यानें मला अनेकवार ' तूं आमच्या चाकरींत आपल्या बापासह येऊन दाखल होत

असलास तर तुझी सुटका करतों.' असे निरोप पाठविले. पण 'मी तुला मुळींच फितूर होणार नाहीं.' अशीं उत्तरें मीं पाठविलीं.

"त्या उत्तरांनीं चिडून जाऊन, 'या स्वधर्मीयांशीं लढणाऱ्या धर्मद्रोह्याच्या पायांत विड्या ठोका आणि याला उपाशीं ठेवा. एक वेळ उघड मुसलमान पत्करले; पण हे हिंदु राजाशीं मुसलमानांच्या वतीनें लढणारे हिंदु प्रथम कापून काढले पाहिजेत.' असे शब्द काढून राजानें माझ्या हातापायांत जड विड्या ठोकविल्या. माझ्या पाठीवरचे वण अजून स्पष्ट दिसतील. नको त्या यातनांची आठवण! पांच वर्षे त्या बंदीशाळेंत काढिलीं. कशीं काढलीं असतील तीं माझीं मलाच ठाऊक! त्या हालअपेष्टांचें वर्णन सांगून माझ्या आप्तेष्टांना दुःख देण्याची मला इच्छा नाहीं"–

असें म्हणून तो दुपेट्याच्या पदरास डोळे पुसूं लागला. गुणवंतरावांच्या डोळ्यांत आंसवें आलीं. खिडकींत बसलेली काशीबाई तर पदरांत तोंड झांकून स्फुंदूं लागली व इतर श्रोत्यांचे चेहरे सहानुभूतीनें खिन्न झालेले दिसले. किंचित् वेळानें घसा साफ करून यशवंतरावानें आपलें बोलणें पुनः सुरू केलें:—

"बंदीशाळेंत असतांनाच मुसलमान सुलतानांशीं विजयनगरची मोठी लढाई सुरू होणार अशी मला कुणकुण लागली. आमचे रखवालदार आमच्याशीं पुष्कळ गप्पागोष्टी करीत असत. पुढें लढाई सुरू झाल्याची बातमी लागली आणखी एक महिन्यानें सगळ्या मुसलमान सुलतानांनीं एक होऊन राक्षसतागडीस रामराजाचा पराभव करून त्याला ठार केल्याची बातमी लागली. त्याच्या दुसऱ्याच दिवशीं विजयनगरांत 'मुसलमान आले', 'मुसलमान आले,' अशी हूल उठली. जो तो आपलीं मुलेंबाळें, जडजवाहीर घेऊन शहरांतून पळ काढूं

लागला. बंदीशाळेवरचे रखवालदार पळाले. कैद्यांनीं ती संधी साधून एकमेकांची सुटका केली. माझीही त्या धांदलींत सुटका झाली. पण बिड्यांच्या वजनानें हातपाय इतके अधू झाले होते कीं माझ्याच्यानें गांव सोडवेना. म्हणून एका मालक पळून गेल्यामुळें रिकाम्या पडलेल्या घरांत मी जाऊन एकदोन सोबत्यांबरोबर राहिलों.

" सातआठ दिवसांनीं मुसलमानांच्या झुंडीच्या झुंडी विजय-नगरांत घुसल्या. जे थोडेबहुत लोक गांव न सोडतां त्यांतच राहिले होते, त्यांची त्यांनीं सरसकट क्रूरपणानें कत्तल उडविली. बायकांची अब्रू, मुलांच्या किंकाळ्या, म्हाताऱ्या कोताऱ्यांच्या विनवण्या, यांपैकीं एकाचीही पत्राज त्यांनीं ठेविली नाहीं. त्यांचे जुलम पाहून पुष्कळ बायकांनीं पटापट विहिरींत जीव देऊन आपली अब्रू बचावली. कत्तल पुरती झाल्यावर त्या राक्षसांनीं घरांदारांची लूट आरंभली. दागदागिने, जरीचे कपडे, सोन्याचांदीचीं भांडीं असले पदार्थ उंटांवर लादून नेत होते. देवांच्या मूर्तींचा विध्वंस, देवळांचा नाश " —

"हर हर ! परमेश्वरा, काय ही दशा ! " अशा अर्थाचे उद्गार सर्व श्रोत्यांच्या तोंडून निघाले.

" खरोखर मला त्या मुसलमानांचीं दुष्कृत्यें पाहून असें वाटलें कीं, आपण व्यर्थ त्या अधमांची सेवा करीत आहों ! आपल्या धर्माच्या बायका आणखी आपले देव यांची विटंबना करणाऱ्या या दुष्टांचें अन्न खाऊन हा पिंड पोसण्यापेक्षां विजयनगरच्या हिंदु राजाच्या सेवेंत मरण आलें असतें तर " —

स्वामिभक्त गुणवंतरावांस हे धर्माभिमानाचे उद्गार मुळींच पसंत पडले नाहींत. ते यशवंतरावास दाबीत म्हणाले, " जाऊं दे, येसू-

भिंतीला कान असतात. हें तुझं बोलणं बादशहाच्या कानीं पडलं तर आपल्या वतनावरच गदा यायची! सध्यां त्यांची सद्दी आहे. पुढं मागं निराळंच कांहीं होईल. पण या गडबडींत तुझी सुटका कशी झाली तें सांग वरं. ”

“ मी ज्या घरांत राहिलों होतों म्हणून सांगितलें त्यांत चारपांच मुसलमान शिरले आणखी आमच्यावर त्यांनीं तरवारी उपसल्या. तोंच त्यांतल्या एका शिपायानें मला ओळखलें. विजापूरच्या फौजेंतलाच तो होता. त्यानें बाकीच्या शिपायांना मी कोण आहें तें सांगितलें व त्यामुळें त्यांनीं मला व माझ्या सोबत्यांना त्रास दिला नाहीं. इतकेंच नाहीं, तर वाटखर्चीसाठीं रक्कम देऊन आम्हांला विजयनगरच्या बाहेर दोनतीन कोस पोंचविलें. तेथें आम्हीं त्या धांदलींत मोकळीं सुटलेलीं घोडीं घेतलीं आणखी परत निघालों. बाकीच्या सोबत्यांच्या घरची वाट फुटली तेथें त्यांनीं मला सोडलें आणि मी हळूहळू मुक्काम करीत गडाच्या पायथ्याशीं पेठेंत पोंचलों.

“ पेठेंत पोंचतांच कांहीं लोकांनीं मला ओळखलें; पण मीं मात्र कोणाला ओळखलें नाहीं. मांझ्या डोक्याच्या जबरदस्त जखमेनें मला माझ्या इष्टमित्रांचा विसर पडला आहे. असो. पेठेंत आमचे उपाध्ये व्यंकटाचार्य—त्यांनीं मला आपल्या घरीं नेलें, माझी शुश्रूषा केली. मी नानांना भेटायला अगदीं उत्सुक झालों होतों—”

“ नानांचें नांव कशाला मध्येंच? कोणाला भेटायला उत्सुक झाला होतास तें सगळ्यांना ठाऊक आहे!” गुणवंतराव थट्टेनें त्याच्याकडे एकदां व मग आपल्या सुनेकडे पहात म्हणाले. सासऱ्यानें केलेली थट्टा ऐकून काशीबाईचा चेहरा लाजेनें आरक्त झाला हें सांगावयास नकोच.

"पण आचार्यांनीं मला सांगितलें," तो पुढें सांगूं लागला, "हा महिना तुझा घातमास आहे तेव्हां वीस दिवसांनीं मुहूर्तानें तूं घरीं जा. म्हणून मी त्यांच्याच घरीं कांहीं दिवस राहून त्यांनीं सांगितलेल्या शुभ दिवशीं काल संध्याकाळीं गडावर येऊन सर्वांना भेटलों. याप्रमाणें माझी हकीकत आहे."

यशवंताचें बोलणें संपतांच व्यंकटाचार्यांचा मुलगा रंगाचार्य हा पुढें आला व म्हणाला, "यानं थोडीशी हकीकत सांगायची बाकी ठेवली आहे. कदाचित् ती सांगायला हा लाजला असेल. याच्या आकस्मिक येण्यानं नानांना आणखी काशीवहिनीला हर्षवायु विषवायु व्हायचा या भीतीनं बाबांनीं मला त्यांचीं मनं तयार करायला सांगितलं. म्हणून मी साधूचा वेष घेतला आणखी बाघाईच्या देवळांत धुनी मांडून बसलों. तिथें सकाळीं नाना अन् संध्याकाळीं काशी-वहिनी दर्शनाला येतात. त्या दोघांना मंत्र जपायला दिले आणखी काल संध्याकाळच्या मुहूर्तावर देवीच्या देवळांत नवराबायकोंची सहा वर्षांनंतरची भेट करून दिली."

"धंदाच आहे तुझा नवराबायकोंची भेट करून द्यायचा! पण तुला दक्षिणा काय रे मिळाली त्याबद्दल?" एकजणानें विचारलें.

"ही घे दक्षिणा." असें म्हणून गुणवंतरावांनीं आपल्या हातां-तलें कडें काढून रंगाचार्याला दिलें. पण त्या बक्षिसापेक्षां काशी-वहिनीनें आपल्याकडे जो कृतज्ञतापूर्वक दृष्टिक्षेप टाकला त्याची किंमत त्या तरुण ब्राह्मणाला अधिक वाटली.

●●●

## बाळोबाची खटपट ५

पानसुपारीचा समारंभ आटोपतांच किल्लेदाराच्या वाड्याचा चौक "गुणवंतराव महाराजकी जय, यशवंतरावकी जय," अशा आरोळ्यांनीं दणाणून गेला व गडकरी आणि गांवकरी लोक आपल्या दयाळू धन्याचा मुलगा परत दिल्याबद्दल देवीचे उपकार स्मरत घरोघर परत गेले. तथापि सर्व गोष्टींना अपवाद असावयाचेच. या नियमाप्रमाणें या सार्वत्रिक आनंदास अपवादभूत असें कांहीं मत्सरी व लोभी लोकांचें दुःख होतेंच. हे लोक म्हणजे बाळोबाचे बगलबच्चे होत. पुढें मागें गुणवंतरावाचा काळ झाला म्हणजे, बाळोबा गोपाळगडचा किल्लेदार आणि किल्लेदारीच्या अंगभूत असलेल्या जमिनींचा इनामदार होईल; मग आपली खूप चंगळ उडेल, अशा आशेनें या लोकांनीं त्याला मोठमोठ्या रकमा कर्जाऊ दिल्या होत्या.

पण आज या आशेचें यशवंताच्या सुखरूपपणें परत येण्यानें पाणी झालें. किल्लेदाराचा मुलगा परत आला, आतां बाळोबाला वारसा कसचा मिळतो आणि आपण त्याला कर्जाऊ दिलेल्या रकमा तरी कशाच्या परत मिळतात ! या भीतीनें त्या लोकांचें धाबें दणाणलें आणि ते गडावरून रामपल्लीस म्हणजे बाळोबाच्या गांवास त्याच्या घरीं गेले. बाळोबांची स्वारी त्या वेळीं मुरळ्यांचा तमाशा पाहण्यांत गुंग झाली होती व आपल्या उधळ्या हातांनीं कर्जाऊ घेतलेल्या पैशांचा वर्षाव समोरील बैठकीवर पाडीत होती. वर सांगितलेली सावकार मंडळी येतांना पाहतांच तो त्यांचें स्वागत करण्यास दोन्ही हात पसरून पुढें धांवला व म्हणाला, "या, दोस्त हो, या ! तुमच्या या हसतमुख चेहऱ्यांवरून तुम्हीं कांहीं तरी आनंददायक बातमी आणली

असली पाहिजे असं स्पष्ट दिसतं. गुणाजीकाकांचा ग्रंथ आटोपला; होय ना? वाः आतां मी गडाचा मालक होणार! मेरे प्यारे यारों, तुम्ही माझ्या अडचणीच्या वेळीं उपयोगी पडलां हे तुमचे उपकार हा बाळोबा कधींही विसरणार नाहीं. आतां काय मेजवान्या, नाच, गाणीं—फार काय मुसलमानांसारखी शराब प्यायलासुद्धां आपण सोडणार नाहीं!"

या त्याच्या बोलण्याला उत्तेजनकारक उत्तर कोणाकडूनही मिळालें नाहीं. सर्वांचे चेहरे खिन्नतेनें काळवंडले होते, ते पाहून त्याची खात्री झाली कीं, हे लोक कांहीं चांगलीशी बातमी घेऊन आले नाहींत. तेव्हां तो म्हणतो, "क़ां रे तुम्हीं अशीं खेटरासारखीं तोंडं करून आलां आहांत? म्हातारा मेला नाहीं एवढंच ना? काय आहे त्यांत? आज नाहीं तर उद्यां मरेल तो आपल्या कारट्याच्या काळजीनें झिजून झिजून!"

"तीच काळजी तर नाहींशी झाली ना आतां रावसाहेब! आतां म्हाताराला झिजायला काय झाला आहे?" कवडीचंद मारवाडी म्हणाला.

"काळजी नाहींशी झाली! म्हणजे तो येशा मेला अशी खात्री-लायक बातमी कळाली कीं काय? मग म्हातारा झिजून मरायचा नाहीं. एकदम धक्का बसून राम म्हणेल एका प्रहरांत"—

"अहो रावसाहेब, तसा नाहीं. काल रात्रीं तुमचा यशवंतराव किल्ल्यावर येऊन दाखल झाला!"

"काय म्हणतोस, तो येशा परत आला!" अत्यंत त्वेषाच्या व निराशेच्या भरांत बाळोबा उद्गारला. बराच वेळ कोणीं कांहीं बोललें नाहीं. त्याचे सावकार त्याच्याकडे अशा मुद्रेनें पहात होते कीं,

त्यांच्या तोंडून, “चोरा ! इतके दिवस थापा देऊन आम्हांला फसविलेंस, नाहीं ? ” असे शब्द निघत आहेत असें एखाद्या बहिऱ्या माणसास वाटलें असतें. शेवटीं ती शांतता बाळोबानें पुढील शब्दांनीं मोडिली. “अरे, कुठचा घेतलात ‘यशवंतराव’ न् काय ? यशवंत परत येणं शक्यच नाहीं !” इच्छेला विचारजननी असें म्हणतात तें खरें आहे. बाळोबाच्या मनानें यशवंत परत येऊं नये अशी प्रथम फक्त इच्छा केली होती; परंतु त्या इच्छेला आतां यशवंत स्वतः परत येणें शक्य नाहीं अशा विचाराच्या रूपाचें अपत्य झालें. तो म्हणाला, “त्याला ठार होतांना प्रत्यक्ष पाहिलेल्या लोकांचा पुरावा आहे ना ! हा जो आला आहे म्हणून सांगतां तो त्याचा तोतया असला पाहिजे—ज्या दुष्टांनीं त्याला ठार केलं आणि जो हुबेहूब त्याच्या सारखा दिसत असे म्हणतात तोच हा असला पाहिजे ! मी जंगजंग पछाडीन; पण या भुरट्या चोराला गोपाळगड पचूं देणार नाहीं, समजलांत ?”

या त्याच्या भाषणावर कित्येकांचा खरोखरच भरंवसा बसला व ज्यांचा मनापासून बसला नाहीं त्यांनाही हा, कांहींतरी खटपट करून, यशवंतराव या नांवानें तूर्त मोडत असलेल्या इसमास तोतया ठरवील अशी मनाची समजूत करून घेणें भाग पडलें. खुद्द बाळोबा मूळचा दुष्ट नव्हता; परंतु लोभ व दुर्व्यसनें यांची तृप्तता करण्यासाठीं गुणवंतरावाचा अंत व्हावा असें त्यानें चिंतलें व आतां तर त्याचा प्रिय आप्त यशवंत सुखरूप परत आला असतांही आनंदित न होतां उलट त्यास वाईट वाटूं लागलें. तें इतकें कीं आलेला मनुष्य यशवंत नाहींच अशी त्याच्या मनाची प्रामाणिक खात्री होऊं लागली.

इकडे गडावर पुन्हां सुखाचें राज्य सुरू झालें. आज पांचसहा वर्षे पसरलेल्या औदासिन्याच्या छटा मुळींच दिसत नसत असें नाहीं. दुर्दिन संपून पुनः प्राणिमात्रांच्या नित्य क्रिया सुरू झाल्या तरी एकाददुसरी वीज चमकल्याशिवाय, लांब अंतरावरून गडगडणाऱ्या ढगांचा गंभीर आवाज कानांवर पडल्याशिवाय, झाडांचीं पानें वाऱ्यानें हाललीं असतां त्यांवरून सांठून राहिलेले पावसाचे थेंब टपटप गळल्याशिवाय रहात नाहींत. त्यांप्रमाणेंच मानवी संसारांतील वादळ संपून सुखाचें साम्राज्य चालू झालें तरी दुःखाच्या काळांतील आठवणी झाल्याशिवाय व त्या आठवणींबरोबर डोळ्यांतून उष्ण आंसवें टिपकल्याशिवाय रहात नाहींत. गत दुःखाच्या या सुखकारक आठवणींना शब्दांचें रूप देऊन आपल्या आप्तेष्टांना त्या वांटून द्याव्या व त्यांच्या डोळ्यांतील सहानुभूतीच्या आंसवांनीं आपलें दुःख धुऊन टाकावें अशा मनुष्यमात्राच्या वहिवाटीस अनुसरून गुणवंतराव, यशवंतराव व त्यांची कांहीं निकटची मित्रमंडळी वाड्यांतील ओसरीवर बसून सुखदुःखाच्या गोष्टी बोलत होती.

"येसू, तुला आपला बाळोबा आठवतो का रे? तुझ्याबरोबर तो लहानपणीं खेळत असायचा. तुझ्यावर त्याची फार माया होती." गुणवंतराव म्हणाले.

"नाना, मीं एकदां सांगितलें ना कीं मला आपल्या कुटुंबांतल्या माणसांशिवाय कुणी आठवत नाहीं म्हणून. मग मला कां बरें असें विचारून हिणवितां? मला सगळ्या लोकांची ओळख पहिल्यानें करून घ्यायची आहे असें का होईना?" यशवंतरावानें बऱ्याचशा त्रासिक आवाजांत उत्तर दिलें.

"बरं जाऊं दे बाबा. तुझा पुनर्जन्म झाला असं आम्ही सम-

जतों अन् लहान बाळाप्रमाणें, 'हे कोण ? नाना. हे कोण ? आचार्य. हा कोण ? बाळोबा.' असं बोलायला शिकवतों." किल्लेदाराचे उपाध्याय व्यंकटाचार्य एक विडा तोंडांत कोंबीत म्हणाले, "पण गुलामा, आपल्या बायकोला मात्र विसरायचं विसरलास ! तें जाऊं द्या झालं, पण मला एक प्रश्न विचारायचा होता, जो तुझ्यासारखा माणूस दिसत होता आणि ज्यानं तुझ्या डोक्यावर घाव घातला तो तरी तुला आठवतो का नाहीं ?"

हा प्रश्न ऐकतांच यशवंतराव कावराबावरा झाला, मग त्याच्या चर्येवर रागाचीं चिन्हें दिसूं लागलीं, दांतओठ खात, "त्याची आठवण ! येऊं द्या त्या पाजी हरामखोराला माझ्या समोर म्हणजे मगच सांगेन त्याची मला आठवण आहे कीं नाहीं तें !" असे उद्‌गार त्यानें आवेशानें काढिले.

व्यंकटाचार्य किंचित् हासत व वांकड्या खोचदार नजरेनें गुणवंतरावांकडे पहात म्हणाले, "अरे बाबा, त्याच्यावर असा रागावूं नको ! तो तुझा—" इतकें बोलतांच गुणवंतरावांनीं इतरांस न कळत पण असा जोरानें आचार्यांच्या पाठीला चिमटा घेतला कीं, या वाक्याचा शेवट "ओय् बाप रे !" या किंचाळीनेंच झाला.

याप्रमाणें इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी चालू असतां खालून कांहीं गडबड झाल्याचा आवाज त्यांस ऐकूं आला. नीट कान देऊन ऐकतात तों तो आवाज जवळ जवळ येऊं लागला व त्यांत शिव्याशाप, तरवारींचा खणखणाट, पावलांचा दणदणाट अशा अनेक ध्वनींचें मिश्रण असल्याचें त्यांस समजून आलें. गप्पागोष्टी करणारांस लढण्याची नेहमींची संवय होती; पण हा हल्ला अगदीं अनपेक्षित रीतीनें आल्यामुळें त्यांच्यांत बरीच गडबड उडाली. जो तो हाताशीं

लागेल तें आयुध—काठी, अडकित्ता, पिकदाणी—-घट्ट धरून उठण्याची तयारी करूं लागला.

तत्क्षणी बाहेरून एक शिपाई आंत अला व, "नानासाब, बंड व्हतंय. आपलंच लोक आपल्यावर चालून येत्यात; आपलं म्हणून क्षिल्यांत येऊं दिलं पर त्येंच्या मनांत न्यारंच कांहीं दिसतंया," असे शब्द घाईघाईनें ओरडत म्हणाला. त्याच्या मागोमाग बाळोबा कित्येक अनुयायांसह आंत आला व यशवंतरावाकडे व त्याच्या बापाकडे रागीट नजरेनें पहात म्हणाला, "नाना, तुम्हीं हें काय मांडलं आहे ?"

"पानं मांडलीं आहेत जेवायला." गुणवंतराव त्याला वेडावीत म्हणाले, "या, तुम्हांला भूक लागली असली तर तुम्हीही बसा. (थांबून) मूर्खा, आपला दोस्त सहा वरसांनीं परत आला त्याला आनंदानं भेटून हें करायचं, तें टाकून त्याच्याशीं लढायच्या तयारीनं आलास का ? आतांच आम्ही तुझ्या या बदललेल्या वर्तनाबद्दल आश्चर्य करीतच होतों."

"नाना, तुम्हांला लागला आहे म्हातारचळ, म्हणून तुम्हीं या पाजी मनुष्याला घरांत आसरा दिलात. अहो, या हरामखोरानं आपल्या यशवंताला ठार केलं, आणखी या ठिकाणीं किल्लेदारीचा वारसा मिळवायला तोतया बनून आला आहे," असें बोलून व यशवंतरावाकडे वळून त्यानें आवेशानें दरडाविलें, "ए भामट्या, तूं तोतया आहेस. मुकाट्यानं स्वाधीन होतोस कीं नाहीं ?" या दरडावणीला यशवंतानें उत्तर दिलें नाहीं. पण उलट बाळोबांकडे अशा तीक्ष्ण व तेजस्वी डोळ्यांनीं पाहिलें कीं, तो जागच्या जागीं गारठून जाऊन कांहीं क्षण खालीं मान घालून उभा राहिला. परंतु त्याच्या

३११८ ता. ११ ... ९१-९१.

अनुयायांपैकीं एकजणानें कांहीं कानमंत्र देतांच अंगांत उसनें अवसान आणून तो पुढें म्हणाला, "अरे गृहस्था, मी स्पष्ट सांगतों, तूं कृष्णराव हावेरीकर आहेस, आणखी यशवंतरावाचा भर रणमैदानावर खून करून माझ्या काकांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन त्यांना फसवीत आहेस. इतकंच नाहीं पण नीचा, माझ्या साध्वी भावजयीला देखील ठकवायला तूं कमी केलं नाहींस!"

हे शब्द ऐकून यशवंतरावाचा चेहरा रागानें लाल झाला. त्यांतून त्याच्या पडीत स्मृतिमंदिराच्या एका कोन्यांत धुळीखालीं छपून राहिलेलें कृष्णराव हावेरीकर हें नांव बाळोबानें हुडकून त्याच्या पुढें केल्यामुळें त्याच्या मनांत खळबळ उडून गेली. गुणवंतरावाची चर्या लाजेनें जणुं काळी ठिक्कर पडली. ही गडबड ऐकून काशीबाई ओसरीस जोडून असलेल्या माजघराच्या दाराशीं उभी राहिली होती, ती बाळोबाचा आपल्यावरील हृदयभेदक आरोप ऐकतांच तेथूनच, "नका हो बाळूभावोजी, तुम्ही असं भलतंच बोलूं!" असें ओरडली.

"वहिनीबाई, तुम्ही असं म्हणणारच! नवरा मेल्यावर जर अनायासानं त्याच्यासारखा दुसरा घरीं चालून—"

हे बाळोबाचे शब्द ऐकतांच यशवंतास इतका संताप आला कीं, त्यानें बाळोबाचें बोलणें पुरतें होण्याच्या आंतच त्याच्यावर झडप घालून त्याच्या हातांतली तरवार हिसकावून घेतली व एक घाणेरडी शिवी हांसडून तिच्या मुठीनें त्याला एक सणसणीत ठोसा लगावला. ह्या रागरंगावरून बाळोबांनीं आतां येथें आपली डाळ शिजत नाहीं असें पाहून अनुयायांसह यःपलाय केलें. बाळोबा घरीं गेल्यावर पुनः त्याचे सावकार जमून पैशांकरितां काव काव करूं व तोतयाच्या विरुद्ध खटला मांडण्यास सांगूं लागले. त्यांच्या सल्ल्यानें

बाळोबानें विजापूरच्या दरबारांत गुणवंतराव तोतयास घरांत घेऊन माझे हक्क बुडवीत आहे असा खटला भरला.

विजापूरच्या बादशहानें एक मुसलमान मुनसफ खटला चालविण्याकरितां राजधानीहून रवाना केला. मुनसफानें प्रथम फिर्यादीचें सगळें म्हणणें ऐकून घेतलें. हल्लीं यशवंतराव म्हणवून घेणारा इसम कृष्णराव हावेरीकर आहे. या दोन इसमांच्या स्वरूपांतील साम्यानें एक वेळ बादशहासकट सर्व सैन्यास चकित करून सोडलें होतें. कृष्णरावाच्याच हातून खरा यशवंतराव मेलेला पुष्कळ जणांनीं पाहिलेला आहे. हाच जर यशवंतराव तर याला आपल्या आप्तेष्टांची आणि अंगाखांद्यावर खेळविलेल्या गड्यांचीं देखील नांवें कशीं आठवत नाहींत ? जुन्या गोष्टी तरी यास कोठें आठवत आहेत ? पूर्वी तो आनंदी वृत्तीचा होता तर आतां भ्रमिष्टासारखा कां वागतो ? अर्थात् हा तोतया आहे यांत संशय नाहीं. याप्रमाणें फिर्यादी पक्षाचें म्हणणें होतें.

यशवंतरावानें आपल्यावरील सगळे आरोप मुकाट्यानें ऐकून घेतले. पण स्वतःची तरफदारी 'होय' किंवा 'नाहीं' या एकेरी शब्दापेक्षां लांब वाक्यांनीं मुळींच केली नाहीं. या त्याच्या वर्तनाचें कारण त्याचा बाणेदारपणा नसून स्वतःचें बेंड फुटूं न देण्याची सावधगिरी हेंच आहे असें पुष्कळांचें मत पडलें. गुणवंतरावानें चेलभंडार उचलून हा आपला मुलगा येसू असल्याबद्दलची आपली पूर्ण खात्री असल्याचें सांगितलें व म्हटलें, "काजीसाहेब, माझं घराणं पिढीजाद खानदानीचं आणखी अस्सल पंचकुळींतलं. एकाद्या तोतयाला आणखी तेंही माझी सून घरांत असतांना, घरांत घेऊन मी बेचाळीस कुळं नरकांत लोटीन असं तुम्हांला वाटतं का ?"

काशीबाईचेंही तेंच म्हणणें, "हेच हो ते ! असे कां माझ्या अब्रूचे धिंडवडे काढतां ?" प्रत्यक्ष बाप व बायको कबूल करीत असतां 'हा खरा यशवंतराव नाहीं' असें प्रतिपादणारा बाळोबा आपमतलबीपणानें खोटा खटला दाखल करीत आहे असा निकाल देऊन मुनसफसाहेबांची स्वारी राजधानीस परत गेली.

वरील निर्णयानें बाळोबाच्या द्वेषाग्नीवर पाणी शिंपडलें न जातां उलट तेल शिंपडलें गेलें. आलेला मनुष्य यशवंतराव नाहीं असें सिद्ध करण्यासाठीं आपल्या दोस्तांच्या मदतीनें तो दुप्पट जोराची खटपट करूं लागला. गडावरील कित्येकांची आलेल्या यशवंताच्या तोतयेगिरीबद्दल आतां खरोखरच मनापासून खात्री झाली होती व ते त्याला मदत करूं लागले. त्याबरोबर गांवकुचाळक्या करणारांनाही हा विषय म्हणजे आपली परनिंदा ऐकविण्याची भूक शांत करण्याकरितां आयतीच चालून आलेली पंचपक्वान्नांची रास वाटून, तींत ते पदरचे झणझणीत मीठमसाले घालून व इतरांस आग्रह करकरून, तिचीं तार्टेच्या तार्टे वाढूं लागले. या प्रकारांत वर्ष–सव्वा वर्ष लोटलें.

• • •

# संशयाच्या जाळ्यांत ६

यशवंतराव परत आल्यानंतर सुमारें दीड वर्ष झालें असतां एका संध्याकाळीं दीपोत्सव व मंगल वाद्यांचा ध्वनि यांच्या योगें गड सुशोभित झालेला होता. काशीबाईला झालेल्या पुत्ररत्नाशिवाय या शोभेचें कारण दुसरें कोणतें असणार ? निदान यशवंत निपुत्रिक झाल्यास आपल्याला किल्लेदारी मिळेल अशी बाळोबाच्या मनांत जर थोडीबहुत आशा राहिली असेल तर तिचीही या दीपोत्सवांतल्या पणत्यांच्या ज्योतींनीं जाळून राख करून टाकिली. मुलाच्या बारशाच्या दिवशीं बाळोबाच्या बायकोनें बहुमूल्य बाळंतविडा आणला व बाळोबानें मुलाला बरींचशीं लेणीं देऊन गुणवंतरावांच्या कुटुंबाशीं तह केला. " मी इतके दिवस मूर्खपणा केला. " तो क्षमा मागण्याच्या आवाजांत म्हणाला, " पण हा येसू नसून कृष्णराव आहे असं खरंच मला वाटलं म्हणून हा सगळा आटापिटा केला. झालं तें झालं ! नाना, मला क्षमा करा, तुम्ही एकटेच मला वडील माणूस आहां. बाबांनीं मरतांना तुमच्याच पदरांत मला घातलं होतं. येसू, तुला तर माझ्या चांगुलपणाची आठवण् नाहींच."—

" मला आठवण नसली तरी नानांनीं मला पूर्वींची सगळी हकीकत सांगितली आहे. तुझी न् माझी लहानपणीं फारच गट्टी होती असें ते सांगत होते. "

" अरे, गट्टी म्हणजे काय सांगतोस ? अरे, तें चोरून घटप्रभेंत पोहायला जाणं काय, शेजारच्या गांवांतल्या बागांतून फळं चोरायला मिळून जाणं काय—छेः गेले ते बाळपणचे दिवस ! तीं विटीदांडू,

आवक क्र. ... विभाग ... नों. दि. ...

गोट्या, चेंडूच्या खेळांतलीं भांडणं सोडवितां सोडवितां नाना नू बाबांच्या नाकीं नव यायचे ! ”

गुणवंतराव मध्येंच म्हणाले, “ लहानपणीं यांच्याशीं लटकीं भांडणं करून माझ्याकडून निवाडा करून घेत होतास, तेंव्हां माझ्या स्वप्नांत तरी आलं का, कीं हा पोरगा पुढें माझ्याशींच खरं भांडण करून सरकारदरबार करील म्हणून ! ”

बाळोबा ओशाळल्यागत झाल्यासारखें करून म्हणाला, “जाऊं द्या, नाना. उगीच मेलेल्याला मारण्यांत काय अर्थ आहे ? मध्यें जो गोंधळ घातला तो नेहमींच्या बाळूनं नाहीं, तर कोणीं तरी त्याच्या अंगांत संचार करून त्यानेंच घातला असला पाहिजे. झाल्या गोष्टी विसरून जा, आणखी पुन्हां पहिल्यासारखीच माझ्यावर ममता करा इतकंच मागणं आहे. ” बाळोबाला खरोखरच पश्चात्ताप झाला आहे असें वाटून भोळ्या गुणवंतरावांनीं, सज्जन यशवंतरावानें व प्रेमळ काशीबाईनें त्याला क्षमा केली. त्याचा पूर्वीप्रमाणें घरोबा सुरू झाला.

काशीबाई प्रसूत होऊन एक महिन्यावर दिवस झाले होते. गुणवंतराव लेकाबरोबर शिकारीला गेले होते ते रात्र पडून गेल्यावर बऱ्याच वेळानें परत येणार होते, अशा दिवशीं सायंकाळच्या वेळीं काशीबाई व तिची मोलकरीण धोंडी अशा दोघीच बाळंतिणीच्या खोलींत होत्या. मुलाला गाढ झोंप लागलेली होती. त्यांस, “ वहिनी, तुझं अंगाला लावणं झालं का ? ” असे शब्द ऐकूं आले. काशीनें झालें असें उत्तर देऊन प्रश्नाचें कारण विचारिलें तेंव्हां, “ मला जरा तुझ्याशीं बोलायचं आहे. ” असे बाळोबाच्या आवाजांतील शब्द तिला ऐकूं आले. तिनें त्यास आंत येण्याची परवानगी दिली.

हळूच दार उघडून वाळोबा आंत आला व धोंडीस बाहेर जाण्यास खुणावूं लागला. पण काशीबाई म्हणाली, " धोंडे, जाऊं नकोस. भावोजी, ही असली तरी हरकत नाहीं. माझ्या विस्वासांतली आहे. शिवाय आपण दोघंच खोलींत बोलत राहणं चांगलं नाहीं दिसायचं. बोला तुम्हांला काय बोलायचं असेल तें. "

वाळोबा वुटमळल्यासारखें करून म्हणाला, " मी बोलतों; पण वहिनी, बोलायला सुरुवात कशी करूं हेंच मला उमगत नाहीं. "

" समजलं मला सारं. तुमची ती नेहमींची जिकीर असेल पैशा-बद्दलची ! पण कांहीं काळजी करूं नका वरं भावोजी ! मामंजी तर तुम्हांला मुलाप्रमाणं समजतात. तिकडे तर काय, पूर्वीची ओळख नाहींशी झाली आहे. पण तुमचं दोघांचं किती प्रेम होतं तें मीं सांगितल्यापासून मी वाळूला सख्ख्या भावासारखा मानीन असं म्हणायचं झालं आहे. "

" वहिनी, पुनः तोच विषय निघाला, क्षमा कर. येसू मला विसरेल असं कधींही व्हायचं नाहीं. येसू कालच इथें आला. आणखी त्याला तुझी एकदां भेट घ्यायची आहे. तुझी परवानगी असेल तर सांग; एका पळांत हजर करतों. "

काशीबाई उसळून ओरडली, " वस् करा भावोजी. पुनः आलं तुमचं मूळच्या पदावर ! तुमचे हे लबाडीचे व्यौहार वंद तरी कधीं व्हायचे ? "

" रागावूं नको वहिनी ! खऱ्या येसूला आतां इथें उभा करतों म्हणजे हा वाळोबा लबाड कीं तुझे मामंजी, याची शहानिशा एका क्षणांत होईल. " असें म्हणून तो समोरच्या भिंतीपाशीं गेला व तिच्यावर लटकावलेली एक मोठी थोरली ढाल त्यानें चाजूस केली.

ढाळीच्या पलिकडे भिंतींत लहानसें चोरदार होतें, तें त्यानें उघडतांच चट्कन उडी टाकून एक पुरुष खोलींत आला आणि काशीबाई व तिचें लहान मूल यांजकडे एकदां पाहून आपल्या दंडानें डोळे झांकीत उद्गारला, " देवा देवा! हें मी काय पाहातों आहें? मीं कोणता तुझा अपराध केला होता म्हणून माझ्या संसारांत (मुलाकडे बोट करून) ही माती कालवलीस?"

तो यशवंतासारखा हुबेहूब दिसणारा पुरुष येतांच त्याच्याकडे पाहून काशी भांबावून गेली होती. यशवंत लढाईस निघाला त्या वेळेस आठ वर्षें लोटून गेलीं होतीं. आठ वर्षांत त्याच्या चर्येंत स्वाभाविकपणें जितका फरक पडला असता तितकाच त्याच्या व या पुरुषाच्या चर्येंत पडलेला दिसत होता. दीड वर्षापूर्वीं आलेल्या यशवंतरावाच्या चेहऱ्यावर पंधरा वर्षांनीं टांकी दिली होती असें दिसत होतें आणि तो त्यानें तुरुंगांत काढलेल्या हालअपेष्टांचा परिणाम असावा असें वाटलें होतें. तथापि या पुरुषाच्या डोळ्यांच्या खालीं वळ उद्भवलेले नव्हते. याच्या डोळ्यांत युद्धपूर्व यशवंताच्या डोळ्यांतलेंच तेज विलसत होतें. तोच हासरा, पण करारी चेहरा; तेंच पीळदार शरीर — परंतु ज्या अर्थीं आपण प्रथम आलेल्या व आज दीड वर्ष किल्लयावर राहिलेल्या पुरुषास 'यशवंतराव' असें नांव दिलें आहे, त्या अर्थीं या नवीन आलेल्यास कथानकाच्या सोयीसाठीं तूर्त 'कृष्णराव' हें नांव देऊं. पुढें या नांवाची अदलाबदल करण्याचा प्रसंग आल्यास ती करतां येईल.

काशीबाई घाबरली होती. पण तशीच कांपत कांपत म्हणाली, " हें पहा महाराज, आपण माझ्या खोलींत चोरट्यासारखे शिरलांत.

त्याबद्दल मी तुम्हांला क्षमा करत्यें. पण आतां आलां तसे परत चालते व्हा; नाहीं तर " —

" नाहींतर काय करणार आहेस वहिनी ? ओरडाओरड करून चार माणसं गोळा केलींस तर त्यांत तुझीच ही होईल ! त्यापेक्षां येसू काय म्हणतो तें उगाच ऐकून घे म्हणजे झालं ! " बाळोबानें सांगितलें.

" बाळ्या, तूं लहानपणीं जसा बैल होतास तसाच अजून आहेस ! बावरलेल्या माणसाला धीर द्यायचा टाकून, टाकून बोलणें चांगलें नाहीं. बरें तूं जरा बाहेर जा पाहूं. ( तो गेल्यावर धोंडीकडे पाहून ) आणखी ही कोण ? तूं जरा बाहेर जातेस का ? " हें ऐकून धोंडी बाहेर जाण्यास निघाली; परंतु काशीनें, " धोंडे, जाऊं नकोस. परक्या पुरुषाबरोबर मला एकटीला ठेवून कुठें जातेस ? " असें म्हणून तिला थांबविलें.

" परक्या पुरुषाबरोबर ? " ' कृष्णराव ' उद्गारला, " काशी ! काय माझ्या नशिबाचा योग आहे ! प्रत्यक्ष आपल्या बायकोला मी परका झालों काय ? आठ वर्षें जिची मूर्ति मनांत जतन करून ठेविली आणखी जिची तसबीर मनाच्या–काळजाच्या जवळच्या बंडीच्या खिशांत बाळगली त्या बायकोला मी परका झालों ! " असें म्हणून त्यानें काशीची तसबीर बंडीच्या खिशांतून बाहेर काढिली व तिच्या पुढें टाकून म्हणाला, " ह्याच चित्रानें मला संकटांत धीर दिला. एक वेळ ब्राह्मण आपलें जानवें विसरेल; पण मी या चित्राला क्षणभर विसंबलों नाहीं. पण माझ्या एकनिष्ठपणाचें हें फळ शेवटीं मिळालें ! बघ, बघ माझ्या चिमणे ! "

" माझ्या चिमणे ! " हे एका वेळीं काशीबाईच्या कानांस

अमृताच्या धारेप्रमाणें सुख देणारे शब्द आतां शिशाच्या रसाप्रमाणें क्लेशदायक भासले. यशवंतराव लढाईपूर्वी पुष्कळदां या लाडक्या संबोधनानें तिला बोलत असे; परंतु आतां हें संबोधन तो विसरला असून कृष्णरावाच्या तोंडून तें बाहेर कसें बरें पडलें ? की हा कृष्णराव नसून आपला पतिच आहे अशी शंका तिला क्षणमात्र स्पर्श करून गेली.

" बघ, हीच ती तसबीर. एक फिरंगी चितारी गडावर आलेला होता; त्यानें सगळ्या पुरुषांच्या तसबिरी काडल्या, तेव्हां तुझीही तसबीर काढून घ्यावी असें माझ्या मनांत आलें. तथापि नानांना न कळत ती काडली पाहिजे असें वाटून मीं बाळोबाकडून त्याच्या घरीं तुला बोलावणें पाठविलें; त्याच वेळीं मी चितान्याला घेऊन तेथें गेलों आणखी ही तसबीर काढून घेतली. हीच ती तसबीर. पहा बरें खोटें असेल तर ! "

काशीनें ती तसबीर दिव्याच्या उजेडांत न्याहाळून पाहिली. यशवंतरावानें आपल्या पुनरागमनाच्या रात्रीं आपली म्हणून दाखविलेली तसबीर संशयास्पद होती. अस्सल तसबिरींत तिच्या प्रतिमेच्या बोटांत गुलाबाचें फूल नव्हतें पण त्या नकली चित्रांत तें कसें आलें अशी शंका आपण नवऱ्याला विचारली व ती त्यानें थट्टेवारी नेली होती हें सर्व तिला आठवलें. परंतु उसनें धैर्य आणून ती कृष्णरावास म्हणाली, " हीच ती मूळची तसबीर असं मी कबूल करत्यें; पण तुम्हीच ती तिकडच्या खिशांतून काढून घेतली नाहीं म्हणून कशावरून ? मामंजींना तिकडचीं पत्रं आलीं तेव्हां तुमचा न् ' त्यांचा ' फार स्नेह जमला आहे असं त्या पत्रांत होतं. त्या स्नेहाचा असा गैरफायदा तुम्ही घ्याल असं तिकडे काय माहीत ? "

" अग, तिकडे तिकडे काय म्हणतेस ? तुझं ' तिकडे ' ( आपल्याकडे बोट दाखवून ) इकडे आहे समजलीस ? बरें तो तसबिरीचा पुरावा जाऊं दे, " त्या पुराव्यानें पांच टक्के तरी कामगिरी बजाविली आहे असें जाणून ' कृष्णराव ' म्हणतो, " हा पहा, या दोरीवर ठेवलेला हिरवा शेला. विजापुरास साठमारी झाली तेव्हां मी घोडयावर बसून डागदारी केली. हत्तीनें माझ्या घोडयाची शेपटी सोंडेंत पकडली आणि मला पकडणार इतक्यांत मी शिताफीनें निसटून तटाच्या भिंतींत घुसलों. त्या धागधुगीच्या वेळीं तूंही पहायला होतीस. तूं तर भीतीनें जागच्या जागीं बेशुद्ध पडलीस ! माझ्या कामगिरीबद्दल शहाजाद्यानें मला तरवार आणखी हा शेला दिला. तरवार मीं आपल्या जवळ ठेविली आणि शेला तुझ्या अंगावर घातला. आहे का आठवण ? त्या बेशुद्धींतून जागी झालीस त्या वेळींच तें मानाचें बक्षिस मीं तुला प्रेमानें दिलें. आतां तरी खात्री झाली का ? "

काशीबाई पुतळीसारखी स्तब्ध राहून कृष्णरावाचें बोलणें ऐकत होती. तिनें बराच वेळ उत्तर दिलें नाहीं म्हणून भाबडी म्हातारी धोंडी मध्येंच बोलली, " आव पावणं, ही ग्वाष्ट समद्या दुनयेला म्हाइत हाये. बाळोबांनीं तुमास्नी सांगितली आसल. पर तूं जर येसवा हायेस तर सांग रं या धोंडीला वळखलंस का न्हाई त्यें ? काय बरं माझं नांव ? "

" अग म्हातारे, तुला ओळखणार नाहीं असें कसें होईल ? मी जाण्याच्या वेळीं तुझ्या डोक्यांतले केस जास्त काळे होते, तोंडावर इतक्या सुरकुत्या नव्हत्या, दांत सगळे शाबूत होते; पण एवढयामुळें मी तुला ओळखणार नाहीं असें कसें होईल ? धोंडे ! "

" वळाखलेंस खरं रे बाबा ! अरे लहानपणापास्नं म्यांच— "

" तर ? लहानपणापासून तूं मला फिरवलेंस, न्हाऊंमाखूं घातलेंस, आई आजारी असतांना पाजलेंस देखील, आणखी तुला न ओळखण्याइतका हा यशवंत कृतघ्न होईल का ? बरें, तें जाऊं दे काशी ! तुझें नांव घेतों धोंडीच्या देखत म्हणून रागावूं नकोस. नाहीं तरी आपण एकटीं असतांना तें पवित्र, लाडकें नांव घेऊन तुला नेहमीं हांक मारीतच होतों. गेले ते दिवस ! या जन्मांत पुनः येणार नाहींत. त्यांच्या एक एक गोड आठवणी करीतच शिल्लक राहिलेले आयुष्याचे दिवस मोजले पाहिजेत. आहाहा ! काय त्या गोड आठवणी ! काशी आपण उन्हाळ्यांत गच्चीवर चांदण्यांत बसलों होतों, मंद वारा वाहत होता, अष्टमीचा चंद्र ढगांच्या दोनतीन तुकड्यांशीं खेळत होता, तुला मी, ' तो पहा चंद्र ' असें म्हणतों व तूं वर पहातेस इतक्यांत तो ढगाआड लपला. आणखी मीं म्हटलें, " आपल्या आयुष्याचा चंद्र सुद्धां असा ढगांच्या आड लपणार नाहीं ना ? तेव्हां तूं चपापलीस आणखी इतक्यांत ढगांतून पुनः चंद्रानें डोकें काढतांच आपल्याला आनंद झाला. तें तुला आठवतें कीं नाहीं ? "

ही एकांतांतली खूण ' कृष्णरावा' च्या तोंडून ऐकतांच काशी इतकी थक्क झाली कीं तिच्यानें कांहींही उत्तर देववेना.

" सांग, आतां तरी सांग, मला ओळखलेंस कीं नाहीं ? का मुद्दामच डोळ्यांवर पापण्या ओढून घेऊन डोळेझांक करते आहेस ? झोंपीं गेलेल्याला जागें करितां येतें; पण झोंपेचें सोंग करणाराला जागें कसें करणार ? "

" तुम्ही कितीही साक्षीपुरावे दिले तरी माझ्या मनाची खात्री

होणार नाहीं." काशी उभी राहून एकदम आवेशानें म्हणाली, 'मी पतिव्रता आहें. माझें रक्षण करणारी माझी वाघाई माता मला कध्धीं अंतरणार नाहीं. माझी मनोमय साक्ष मला सांगते कीं, 'काशी, तूं शुद्ध आहेस. तूं साध्वी आहेस.' महाराज, मनाच्या साक्षीपुढें तुमचीं सोंगढोंगं काय चालणार !"

"निःसंशय तूं साध्वी आहेस. तुझ्या हातून जी चूक झालेली आहे, आणखी होत आहे, तीच चूक अहिल्येच्या हातून झाली होती. पण तिचें नांव पतिव्रतांच्या यादींत सामील नाहीं का झालें ? काशी, मनोमय साक्ष या खऱ्या जगांत काडीइतकी उपयोगी पडत नाहीं. आपल्या गडावर तो दगडया वेडा होता त्याला वाटत असे कीं, आपली बायको जिवंत आहे, मुलें जिवंत आहेत, सर्व कांहीं सुरळीत चाललें आहे. पण तीं सगळीं पुरांत वाहून मरून किती तरी वर्षें झालीं होतीं ! त्या दगडयाच्या मनोमय साक्षीनें तीं झालीं का जिवंत ?" कृष्णराव म्हणाला.

"मग अहिल्येला जसा ऋशीनीं श्राप देऊन दगड करून टाकलं तसा मला श्राप द्या, म्हणजे या संशयाच्या भोंवऱ्यांतून माझी सुटका तरी होईल. नको, नको ! मला चक्कर यायला लागली." असें म्हणून मटकन् बाजेवर बसल्या बसल्या दोन्ही हातांनीं तिनें आपलें कपाळ घट्ट दाबून धरिलें.

"तुला शाप ? छे छे ! तुला शाप देण्याइतकें या यशवंताचें अंतः-करण दगडी झालें नाहीं. तुला मी आशीर्वादच देणार ! मी कोण-त्याही तऱ्हेनें तुला दुखवीत नाहीं. मी आतां जातों. हाय रे दैवा ! मी शत्रूच्या तुरुंगांतून सुटलों, तेव्हां माझ्या काय आशा होत्या ! इथें आलों तेव्हां पहिल्यांदा बाळोबाची भेट घेतली आणखी त्याच्या-

कडून सगळा वृत्तांत कळल्यावर उंच कड्यावरून खोल दरींत फेकून दिल्यासारखें मला वाटलें. मी आलों होतों ही गोष्ट कोणालाही कळवूं नको. बरें का धोंडे, तुला देखील बजावून सांगतों. आमच्या घराण्याच्या अब्रूची काळजी बाळगली पाहिजे. जो हरामखोर इथें आला आहे त्याच्या नरडीचा घोट घ्यायला एरव्हीं मला जड वाटलें असतें काय ? पण काय करूं ? प्रकट होणें म्हणजे सगळ्यांची न् त्यांतल्या त्यांत माझ्या लाडक्या काशीची......जाऊं द्या. नकोच तो शब्द वापरणें. आतां मी मात्र आपल्या सुखाच्या आशातंतूंचा झालेला चोळामोळा जगाला दाखविण्यासाठीं केसांच्या जटा वाढवून, आणखी अंतः-करणाची झालेली राखरांगोळी दाखविण्यासाठीं अंगाला राख फासून बैरागी होऊन काशीविश्वेश्वराचें नामस्मरण करीत देशभर भटकणार ! त्या नांवांत काशीचें नांव आहे म्हणून तेंच नांव मी जपणार ! ”

“ तुम्ही वाटेल तें करा; पण मी मात्र मामंजीकडून आज रात्रींच या घोटाळ्याचा उलगडा करून घेत्यें, आणखी ” —स्फुंदण्यामुळें पुढचे शब्द तिनें अस्पष्टच, अडखळतच उच्चारले, “ तसंच कांहीं माझ्या हातून झालं असलं तर अफू खाऊन जीव देत्यें. पण तुम्ही फसवायला आलां असलांत तर मात्र तुमच्या जिवाला तुम्ही संभाळा अशी ताकीद देत्यें. ”

“ माझ्या जिवाला मी संभाळूं ? कशाकरतां संभाळूं ! या संसाराच्या उडालेल्या ठिकऱ्या पहायला ? तो पाजी कृष्णराव माझें सोंग घेऊन माझा संसार करीत असलेला पहायला ? त्यापेक्षां या जिवाच्या चिंधड्या उडालेल्या काय वाईट ? अरेरे ! काशी, नको तूं डोळ्यांतून पाणी काढूं. बायकांच्या डोळ्यांतून आंसवांचा एक थेंब वाहिला तरी शत्रूंच्या रक्ताचे पाट निधड्या मनानें वहावायाला लावणाऱ्या

चोराचीं मनें विरघळून जातात. त्यांतून तूं तर माझी---नको अशी डोळे वटारूस. एक वेळ माझी होतीस तेव्हां या हातानें किती किती वेळां तरी तुझीं आंसवें पुसलीं आहेत. मग आतां एकदां तीं मीं कां बरं पुसूं नयेत ? ” असें म्हणून तो दुपेटा हातांत घेऊन काशीच्या जवळ जाऊं लागला. पण ती एकदम उभी राहून त्याला थांबविण्याकरितां हात पुढें करून ओरडली, “ खबरदार एक पाऊल पुढें याल तर ! मीं तुमचं सगळं ऐकून घेतलं हीच माझी चूक झाली. तुम्ही कोणी असलां तरी माझ्या अंगाला हात लावाल तर ” —

“ वाः काशी ! रागावल्यामुळें तूं फारच सुरेख दिसते आहेस ! तूं पूर्वी माझ्यावर रागावत असस तेव्हां देखील आतांच्या इतकी शोभा दिसली नाहीं. ”

इतक्यांत खोलीचें दार खाडकन् उघडून वाळोबा आंत आला च म्हणाला, “ येसू, येसू, आतां तूं परत जा. ते पहा नाना न् तो भामटा परत येत आहेत. ”

“ बरं आहे.” ‘ कृष्णराव ’ म्हणाला, “ काशी, हीच या जन्मांत शेवटची भेट. तुझ्या हातून चुकीनें घडलेल्या पापाचें क्षालन व्हावें म्हणून मी वैरागी होऊन तीर्थयात्रा करणार. तुझा नवा संसार सुखाचा होवो ! आपली चंद्रभागा न् तुझा मुलगा चिरंजीव होवोत ! ” असें म्हणून त्यानें आल्या वाटेच्या दारांत प्रवेश केला आणि वाळोबानें दार बंद करून त्या मोठ्या थोरल्या ढालीनें झांकून टाकिलें.

तोंच खोलीच्या दाराशीं, “ धोंडे, मी येऊं ग आंत ? ” असे गुणवंतरावांचे शब्द ऐकून धोंडीनें त्यांस आंत येण्यास सांगितलें. गुणवंतराव आंत आले तेव्हां वाळोबा ढाल नीट बसवीत होता.

याला चोरदाराची माहिती झाली काय अशी शंका येऊन म्हाताऱ्यानें, "काय करतोस रे बाळू ?" असें विचारिलें.

"कांहीं नाहीं नाना. सहज ढाल पहात होतों. केवढी मोठी आहे हो ही नाना ! गेंड्याच्या कातड्याची दिसतीय्. कुठें पैदा केलीत ही नाना ?" बाळोबानें धूर्तपणानें विषय बदलला.

"ही मला बेदरच्या लढाईत मिळाली. खुद्द बादशहानं मला ही आपल्या हातांनीं भर दरबारांत दिली. बक्षिस देतांना दोन माणसांना ती उचलून धरावी लागली. पण मीं आपल्या ज्वानींत या ढालीला पेललं आहे. आतांच्या पिढींत दाखवा एक तरी माणूस ही ढाल घेऊन पट्टा खेळणारा ? – बरं पण मुली, कसं काय आहे तुझं न् आमच्या छोटेखानी किल्लेदाराचं ? ( ती रडत आहे असें पाहून ) अग, पण असं रडायला काय झालं ? चांगली सुखांत आहेस अन् हें असं रडणं कुठून आठवलं ? बरोबर ! तुला आपल्या बापाची आठवण झाली असेल. खरंच, माझा भीमराव आजचे सुखाचे दिवस पाहायला असता तर किती बेश झालं असतं ! पण त्याला काय उपाय ? धोंडे, कां ग ही रडती आहे ?"

धोंडीला संधी पाहिजेच होती. परंतु 'कृष्णरावा'च्या भेटीची बातमी इतक्यांत सगळ्या लोकांत फोडणें बरोबर नाहीं असें वाटून तिनें. आपल्या धन्याला म्हटलें, "वाईच बाजूला या नाना म्हंजे समदं सांगतें." त्यावरून गुणवंतराव तिला घेऊन खोलीच्या बाहेर आले व ओसरीवरच्या एका कोपऱ्यांत ती त्यांना सर्व हकीकत हलक्या आवाजांत सांगूं लागली.

दरम्यानच्या वेळांत 'यशवंतराव' उजव्या हातांत दोऱ्यानें बांधिलेलीं वाघनखें घेऊन बाळंतिणीच्या खोलींत शिरला व शिरतां

शिरतां हासत म्हणाला, "हीं पाहिलींस का नखं? आज मीं भाल्याच्या फेकीनें एक पट्टेचा वाघ मारला– चांगला दहा हात लांब भरला—आणखी त्याचीं नखें काढून आणलीं. आपल्या बाळाला ताईत करायला हवीं आहेत म्हणाली होतीस ना? म्हटल्या बरोबर वाघनखें हजर! मी देवाज्ञा देखील मोडून जिवंत राहिलों; पण राणीसाहेबांची आज्ञा मोडायचें धैर्य मला होत नाहीं. कसें काय बरें आहे ना?" अशी बडबड करीत तो काशीच्या जवळ जाऊं लागला. तोंच काशी ओरडून म्हणाली, "हां हां! थांबा. मला हात लावूं नका आणखी माझ्याशीं बोलूं नका."

"अबब! गरीब दासावर इतका राग कां?" असें म्हणत यशवंतराव जवळ जाऊन तिच्या खांद्यावर हात टाकणार तोंच तिनें त्याला एकदम ढकलून दिलें व म्हटलें, "व्हा लांब. माझे धिंडवडे केलेत येवढे पुरेसे झाले नाहींत का? मामंजी, या हो लौकर इकडे!"

तिची हांक ऐकून गुणवंतराव व धोंडी धांवत खोलीकडे आलीं. 'यशवंतरावा' स पाहतांच धोंडी रागानें बेफाम होऊन ओरडली, "अरे दुष्टा, नष्टा, पापिष्टा! कुठं रे फेडशील हीं पापं! मेल्यानीं माझ्या सोन्यासारख्या पोरीच्या आडक्षाचं मातेरं केलं! अरे क्रिष्णाया–"

ही ओरडाओरड ऐकून पुष्कळ मंडळी भोवतीं जमा झाली होती. तींत धोंडू जमादारही होता. तो उद्गारला, "तरी वाटलंच व्हतं मस्नी की ह्यो तो किस्नराव असंल. अव, येसबास्नी मी लहानपणीं इतकं हिंडीवफिरीवलं आन् त्यो मस्नी वळकणार नाहीं असं व्हईल तरी कसं?"

काशीबाईस हे सर्व उद्गार ऐकून आपल्याला धरणीमाता पोटांत

घेईल तर बरें असें वाटलें. ती कळवळून म्हणाली, " मामंजी, आतां माझी अब्रू बचावणं तुमच्या हातीं आहे. हे चंद्रीचे वडीलच आहेत असं मला वाटतं आहे; पण माझ्या वाटण्याचा काय उपयोग ? तुम्ही आतांच्या आत्तां माझी तशीच या सगळ्या मंडळींची खात्री पटवून माझं तोंड उजळ केलंत तरच मी जिवंत राहतें. नाहीं तर उद्यां सकाळला तुमची सून, तुमच्या जिवलग स्नेह्याची मुलगी, या तुमच्या बळवंतरावाची आई जिवंत रहावी असं वाटत असलं तर एकदां सगळ्यांची खात्री होऊं द्या. "

सर्व लोकांचे राग, तिरस्कार व सूड यांच्या लालभडक ज्याळा टाकणारे डोळे आपल्याकडे लागलेले पाहून ' यशवंतराव ' विरघळून गेला व बापास घट्ट मिठी मारून स्फुंदूं लागला. गुणवंतरावांनीं त्याला आपल्या सुरकुत्या पडलेल्या पण एक वेळ शत्रूंना रणांगणांत पाणी पाजलेल्या बाहूंच्या पाशांत कांहीं वेळ आवळून धरून डोळ्यांतून पुष्कळ पाणी वाहूं दिलें. नंतर त्यांच्या चेहऱ्यावरील दुःखाची छटा कमी कमी होत जाऊन त्यावर निश्चयाचें तेज दिसूं लागलें. कांहीं वेळानें त्यांनीं लेकाला बाहुपाशांतून मुक्त केलें व मंडळीकडे वळून ते बोलूं लागले.

ते म्हणाले, " गड्यांनो, हा परसंग कधीं ना कधीं येणार असं मला वाटतच होतं. येसू हा तोतया आहे असा आरोप कांहीं मतलबी लोकांनीं आणला; न्यायदरबारांत चौकशी होऊन येसूचं खरेपण शाबित झालं. परंतु आमच्या रिपूंच्या मनांत आम्हांला स्वस्थ बसूं द्यायचं नाहीं. येसूला तोतया ठरवून, माझ्या या लहानशा नातवाला लेकवळा ठरवून गड बळकावयाचा इरादा त्यांच्या मनांत आहे. गडाची काय मातब्बरी ? ज्याच्या हातांत धमक असेल तो वडिलो-

पार्जित जिनगीला अशी लाथाडून दुसरीकडे नशीब काढील ! म्हणून मीं इतके दिवस सांगितलं नव्हतं. माझ्या येसूच्या खरेपणाची समयांची शंका मीं अजून कां दूर केली नाहीं ? ती शंका दूर करण्यानं, माझ्या निर्मळ वर्तनाबद्दल सगळ्यांची जी खात्री झाली आहे ती नाहींशी होणार, या भीतीनं ! पण आतां या बळवंतरावाच्यासंबंधीं कोणालाही कसलीही शंका येऊं नये म्हणून, माझ्या येसूची अन् काशीची नाचक्की होऊं नये म्हणून माझं गुपित सांगून टाकलं पाहिजे. माझं काय पिकल्या पानाचं ? मी अभिमानानं गप्प राहून आजपावत माझ्या मुलाचा अन् सुनेचा अन्याव केला; पण उद्यां दुपारीं माझी हकीकत सांगून टाकून त्यांची या गिऱ्यांतून सुटका करीन. तेव्हां उद्यां सगळेजण दुपारीं दिवस जरा कलला म्हणजे जमा आणखी या गुणवंताची हकीकत ऐका म्हणजे सगळ्या घोटाळ्याचा उलगडा होईल. ”

• • •

## खून ! ७

गुणवंतरावांनीं ती सर्व रात्र कागदपत्रें नीट लावून घेण्यांत, गडाच्या व इनामी जमिनींच्या पांच सहा महिन्यांपुरत्या निरवानिरवींत व ‘ यशवंतरावा ’ शीं बातचीत करण्यांत घालविली. उद्यां दुपारीं आपलें रहस्य जगजाहीर करावयाचें व मग आपलें लाजरें

तोंड कांहीं दिवस लपविण्याकरितां काशीयात्रेस निघून जायचें. मग तेथून जिवंत परत आल्यास पुढचा विचार पुढें असा त्यांचा बेत होता. गुणवंतरावांचे उपाध्ये व परम मित्र व्यंकटाचार्य हे या वेळीं अंथरुणास खिळले असल्यानें या बेतांत त्यांचा सल्ला घेतां आली नाहीं.

सर्व लोकांस उद्यां दुपारची वेळ केव्हां येते व ज्याला आपण प्रतिसाधु समजत होतो त्या गुणाजी किल्लेदाराचें इंगित आपल्या कानीं केव्हां पडतें व आपण आपल्या गांवीं परत जाऊन तें इतर कुवार्ताभक्तांस सांगून त्यांचे कान केव्हां पुनीत करतों अशी उत्कंठा लागलेली होती. हें इंगित काय असावें याची रात्रभर व दुसऱ्या दिवशीं सकाळभर चर्चा चालू असून त्या इंगितासंबंधींच्या रूपरेषा कल्पनेच्या साह्यानें घरोघर रेखाटल्या गेल्या. बाळोबालाही ही बातमी होतीच व त्यानेंही रात्रींच आपल्या रामपल्ली गांवास जाऊन या वार्तेचा प्रसार केला.

दुसऱ्या दिवशीं सूर्योदयाबरोबर स्नान करून किल्लेदार नित्यनियमाप्रमाणें गडावरील मारुतीच्या देवळांत पूजा करण्यास गेले. पूजेच्या वेळीं दुसऱ्या कोणीं तेथें येऊन आपल्या ध्यानाचा भंग करूं नये म्हणून त्यांनीं नेहमींप्रमाणें त्या वेळीं देवळाजवळ फिरकण्याची सर्वांस मनाई केली होती. पूजेकरितां फुलें नेहमीं मिळावीं म्हणून जास्वंदी व कण्हेरीची लहानशी फुलबाग देवळाच्या भोवतीं केलेली होती. गुणवंतराव स्वतः फुलें तोडण्याचें काम करीत असत. सूर्योदय होऊन बराच वेळ झाला. सूर्याचा अरुण वर्ण नाहींसा होऊन तो तेजस्वी होत चालला. हळू हळू तो डोक्यावर आला. पण किल्लेदाराची पूजा संपली नाहीं. ठराविक वेळेच्या पुष्कळ आधीं आलेल्या

मंडळीला पहिल्यानें कंटाळा आला. मग त्या कंटाळ्याची जाग संशयानें व शेवटीं संशयाची जागा भीतीनें व्यापिली.

"चंद्रे, जा बा तूं देवळांत आन् नाना काय करताहेत इतका वेळ तें पहा," अप्पा चिटणीस चंद्रीला म्हणाले.

परंतु त्या जागेंत कोणीं गेल्यास आजोबा रागावतात म्हणून आपल्याला तेथें जाण्यास भय वाटतें असें तिनें उत्तर दिलें.

"दुसऱ्यांच्या वर रागावतात पण आपल्या लाडक्या नातीवर नाहीं ते तसे रागवायाचे. जा बाळ, बघून ये. आम्हांला सगळयांना काळजी लागून राहिली आहे." चिटणिसाचें बोलणें ऐकून चंद्राबाई हरवऱ्याच्या झाडावर चढल्या व "थांबा हं मी पहाती आजोबा अजून कां आले नाहींत तें," असें म्हणून ती फुलबागेंतून प्रथम देवळांत शिरली; परंतु तेथें आजोबा नाहींत असें पाहून तिनें त्यांस एक हांक मारली. त्या हांकेचें उत्तर न मिळाल्यानें ती देवळाच्या पलिकडील बाजूस जो फुलांचा ताटवा होता त्यांत शिरली; परंतु तिला त्यांत काय भयंकर देखावा दिसला कोण जाणे? तिनें आपल्या नाजुक कंठाला शक्य तितकी कर्कश किंकाळी फोडिली. ती बाहेर जमलेल्या लोकांस ऐकूं येतांच ते भयभीत होऊन फुलबागेंत घुसले व त्यांतल्या त्यांत जे पुढें आले त्यांना ताटव्यांत भयानें बेशुद्ध पडलेली चंद्री व पलिकडे रक्तानें न्हालेलें वृद्ध किल्लेदाराचें प्रेत दृष्टीस पडलें. त्या प्रेताकडे न्याहाळून पाहतां त्याचा खून झालेला स्पष्ट दिसत होता. त्याच्या छातीवर तीन जखमा दिसत होत्या. तथापि मृत मनुष्य जीवाकरतां धडपड केल्याशिवाय मेला नसावा; कारण ते पहा वटारलेले डोळे, दोनचार मोडक्या दांतांत आवळून धरलेले क्रूर ओठ, आवळलेल्या मुठी आणि मारामारींत

फाटलेलें धोतर, उपरणें. एका मुठींत तर खुनी इसमाची उपटलेली शेंडी दिसत आहे. वाहवा रे म्हाताऱ्या! इतक्या उतार वयांतही तूं वैऱ्याला आपलें पाणी दाखविलेंस ना?

सगळीकडे आरडाओरड झाली. ती ऐकून 'यशवंत' तेथें धांवत आला; काशीबाई त्याच्या पाठोपाठ धांवत आली व आपल्या बेशुद्ध पडलेल्या लेकीला मांडीवर घेऊन तिला पदरानें वारा घालूं व मेलेल्या सासऱ्याबद्दल आक्रांत करूं लागली. आपला सासरा आपल्याबद्दल उठलेल्या टवाळ बातम्या खरी हकीकत सांगून आजच बंद करणार होता, तों आपल्या फुटक्या नशिबानें हें काय भलतेंच घडवून आणिलें? चंद्रीच्या डोक्यावर पाणीबिणी शिंपडून तिला कांदा हुंगविल्यावर ती जरा सावध झाली. डोळे उघडून कावऱ्याबावऱ्या चर्येनें ती भोंवतीं बघूं लागली व दुःखी चेहरा धारण केलेला 'आपला बाप' नजरेस पडतांच तिनें मघांसारखीच आणखी किंकाळी फोडली, "अहो बाबा! कां हो आजोबाला मारून टाकलंत?" असे उद्गार काढून ती कुशीस वळली.

"अरे नारायणा! हिला वेड लागलें काय? चंद्रे, जागी हो. मला ओळखलेंस ना? देवा, माझ्या नानांला नेलेंस तें नेलेंस पण माझ्या पोरीला तरी राहूं दे!" 'यशवंतराव' रुदनस्वरानें उद्गारला.

पुन्हां पहिल्या कुशीस वळून व डोळे किलकिले करून तिनें त्याच्याकडे भीतत्रस्त मुद्रेनें पाहिलें व, "बाबा, आजोबांनीं काय हो करलं होतं तुमचं! त्यांला कां मारलंत!" असें म्हणून तिनें डोळे घट्ट मिटून धरले.

चंद्रीचे दुसऱ्या वेळचे उद्गार ऐकतांच काशीनें तिला पटकन

मांडीवरून जमिनीवर ठेविलें व कपाळ घट्ट दावून धरून तिरीमिरी आल्यासारखी खालीं पडली. पण या गर्दीत तिच्याकडे कोणीं विशेष लक्ष दिलें नाहीं.

"अहो हें कांहीं बेशुद्धींतलें किंवा वेडांतलें वरळणें नाहीं! लहान पोर ती भावडेपणानें खरी हकीकतच सांगत आहे. बरोबर! आज गुणवंतराव गुप्त गोष्ट सांगणार होते, ती सांगितल्यास आज आपलें बेंड फुटेल म्हणून, आपलें खरें स्वरूप उघडकीस येईल म्हणून याच स्वारीनें त्या बिचाऱ्या म्हाताऱ्याचा निकाल लाविला. आतां मात्र हा कृष्णराव हावेरीकरच आहे यांत तिळमात्र शंका कोणाला यावयास नको. अरे हरामखोरा! ढोंग्या! पकडा, पकडा त्या हलकटाला, नाहींतर पळून जाईल येथून. हत्तीच्या पायाशीं देऊन नाहींतर कडेलोट करून सात वेळां ठार केलें पाहिजे या बदमाषाला!" अशा अर्थाचे घोष यापेक्षां फार तीव्र भाषेंत सर्वांच्या तोंडून निघत राहिले.

कांहीं वेळ या विस्मयजनक प्रकारामुळें सर्वांचीं मनें क्षुब्ध झालीं व मग तीं स्थिर झाल्यावर सगळा प्रकार समजण्याची त्यांस जिज्ञासा उत्पन्न झाली. इकडे चंद्राही शुद्धीवर आली. तिला थोंडीनें जवळ घेऊन आंजारून गोंजारून तिची भीति पुष्कळ कमी केली. मग रंगाचार्यानें तिच्या पाठीवरून हात फिरवीत विचारिलें, "बाळे, भिऊं नको. खरं सांग, तूं इथें आलीस तेव्हां आजोबा काय करीत होते?"

"मी-मी देवळांत गेली ते तिथे आजोबा-आजोबा नव्हते म्हणून जाईच्या ताटव्यांत शिरली आणखी......" असें म्हणून ती 'यशवंतरावा' कडे पहात स्फुंदून मोठ्यानें रडूं लगली.

"तिस्नी खरं सांगाया या क्रिस्नरावाची भ्या वाटतीया जनू,

त्यास्नी वाइच नजरंआड करा मंजी सांगल समदं." जमावांतल्या एका शिष्टानें सल्ला दिली.

लगेच बाळोबानें पुढें होऊन एका नोकराकडून 'यशवंतरावा' स दृष्टीआड करवून त्याच्या मुसक्या बांधविल्या व चंद्रीला चुचकारून चुचकारून पुढील हकीगत सांगण्यास सांगितलें.

"मी ताटव्यांत शिरली तं आजोबांचं सगळं आंग रगतानीं भरलेलं आणखी ते कण्हत होते––" ती सांगूं लागली.

"किती वेळ कण्हत होते बाळ?" अप्पा चिटणिसांनीं विचारलें.

"फार–फार नाहीं. एक दोनदांच कण्हले आणखी माझ्याकडे बघले;" असें म्हणून ती घाबरलेली पोर पुन्हां रडूं लागली. पुनः तिला कुरवाळून पुढें बोलण्यास लावलें, "एकदा बघले अन् मग हातपाय जोरांदिशीं हापटून मुकाटचा राह्यले. मग हाल्ले दिखील नाहीं. तेव्हां कनी त्या बाबांनीं त्यांना लाथ मारली न् शिवी दिली. बाबिटले कुठले!"

"चंद्रे, नीट सांग. तुझ्या बाबांच्या हातांत त्या वेळीं काय होतं?" बाळोबानें विचारलें.

"त्यांची नेहेमींची यमाई तरवार होती."

"अंगावर ते काय पांघरले होते?"

"त्यांचं उपरणं नवं आणलेलं ते पांघरले होते. त्याचा एक काठ पिवळा आणखी दुसरा हिरवा–पण बाबांनीं आजोबांला मारून टाकलं हो!" असें आक्रोशून ती रडूं लागली. जरा थांबल्यावर, "बाबा तुझ्याशीं कांहीं बोलले का ग?" असें बाळोबानें विचारलें; तेव्हां तिनें उत्तर दिलें, "कांहीं बोलले नाहींत पण एकदा मोठ्ठयांदा

हसले आणखी माझ्यावर तरवार उगारली तेव्हां मी ओरडली न् एकदम पडली ! का हो बाबट्ल्यांनो, आजोबांना मारलंत ?" असें म्हणून तिनें आकांत मांडला.

"बस्स बस्स ! या हरामखोर तोतयाच्या पाजीपणाचा कळस झाला ! कशाला या पोरीला आणखी प्रश्न विचारून तिचे हाल करतां–?" "मारा, मारून टाका याला इथेंच ! नाना किल्लेदाराच्या प्रेताशेजारींच त्याचा मुडदा पाडा !" अशा तऱ्हेचे उद्गार तमासगिरांच्या तोंडून निघूं लागले; परंतु बाळोबानें, "याचा निकाल कायद्याप्रमाणेंच होऊं द्या; नाहीं तर आपल्याला शिक्षा होईल," असें सांगून सर्वांस शांत केलें; व अप्पा चिटणीस, रंगाचार्य आणखी तीन संभावित पाहुणे अशा पांच जणांना जागेची तपासणी करण्यास सांगितलें. जाईच्या जाळीखालीं चंद्रीनें वर्णन केलेलें गंगाजमनी उपरणें व यशवंताची यमाई तलवार सांपडली प्रेताजवळ गुणवंतरावाचीं व आणखी एका इसमाचीं पावलें बागेंतील चिकण मातींत स्पष्ट उमटलेलीं दिसत होतीं. तीं पाहून बाळोबानें अधिकार वाणीनें, "आणा त्या तोतयाला इकडे," असें फर्माविलें. त्याप्रमाणें 'यशवंतरावा'स तेथें आणिलें. त्याच्या पायानें आणखी एक पाऊल तेथें उमटविलें. व तें पाऊल व खुनी इसमाचें पाऊल यांची तुलना पंचांनीं केली. दोन्ही पावलें इतकीं जमलीं कीं, 'तोतया यशवंतराव' हाच खुनी असला पाहिजे असें पंचांचें मत पडलें.

लगेच बाळोबाच्या आज्ञेनें 'तोतया' च्या मुसक्या बांधण्यांत आल्या व त्यास गडावरील अंधारकोठडींत कैदी म्हणून बिड्या ठोकून ठेविण्यांत आलें. आपल्या भूत व भविष्य काळाचीं भेसूर चित्रें काळ्याभोर अंधाराच्या पडद्यावर अधिक काळ्या रंगानें काढण्यांत

त्या विचाऱ्याचा वेळ जाऊं लागला. अंधारकोठडी इतकी खोल होती कीं तींत रात्र व दिवस ओळखतां येण्याचीही मारामार होती व तिच्यापासून फक्त दोनशें कदमांवर दुपारची तोफ डागीत तीही आंतल्या अभागी कैद्यास ऐकूं येत नसे. दिवसांतून एकदां पहारेकरी दार उघडून त्यास अन्नपाणी देई, तेव्हांदेखील त्याच्या दृष्टीस प्रकाशाचा किरणही पडत नसे.

त्याच्याहीपेक्षां काशीबाईची स्थिति अनुकंपनीय झाली होती. कदाचित् तूर्त कोठडींत पडलेल्या इसमाचे हाल त्याच्या कुकर्माचें फळ असूं शकतील; पण त्या बिचारीनें काय अपराध केला होता कीं, तिला आपलें काळें तोंड जगाला दाखवूं नयेसें वाटावें ? ज्याला आपण नवरा म्हणून दीड वर्ष समजत होतों तो खुनी तोतया ठरला, आपलें तान्हुलें अनाचारापासून झालेलें कारटें ठरलें व आपण पतित व भ्रष्ट ठरलों. आपला पति सहा वर्षांच्या अज्ञातवासांतून परत आला व आपल्याला पुनः संसारसुखाचा लाभ झाला हे परमेश्वराचे उपकार आपण मानिले; पण त्या उपकारांचा असा वचपा त्यानें काढावा काय ? या दारुण कल्पनांनीं नांग्या मारमारून तिला उन्मत्त करून टाकिलें. ती जडमूढ झाली. आत्महत्या करण्याचें दूरच राहो पण देहधर्म उरकण्याचेंही तिला भान नाहींसें झालें. ' अहिल्या शिळा झाली, ' असें पुराणांतरीं रूपकात्मक वर्णन आहे, त्याचा अर्थ हाच असावा. चुकून झालेल्या पातकानें ती शिळेसारखी मूढ बनली व रामचंद्राच्या दर्शनानें व आशीर्वादानें तिची बुद्धि तिला पुनः प्राप्त झाली असावी. काशीलाही असा कोणी रामचंद्र भेटेल काय ?

●●●

## पितापुत्र आचार्य ८

गडाच्या पायथ्याशीं पेठ म्हणून वस्ती होती, तिला पेठ गोपाळ-गड म्हणत. गडावरील लोकांचा बाजार पेठेंत होत असे. या वस्तींतच किल्लेदार घराण्याचे पिढीजाद उपाध्ये व्यंकटाचार्य यांचें लहानसें घर होतें. घराभोंवतीं थोडी मोकळी जागा असून तींत झाडें लाविलीं होतीं. एका बाजूस गोठा असून त्यांत म्हैस बांधली होती व गोठया-समोर एक विहीर होती. या दोहोंच्या मधून घरांत जाण्यास वाट होती. घरांत शिरतांच प्रथम एक भुईसपाट ओसरी आणि तिला जोडून जोत्यावरची ओटी होती. या ओटीवर व्यंकटाचार्यांचें बसणें, निजणें, संध्या देणें हीं कामें होत.

ज्या दिवशीं गुणवंतरावांचा खून झाला, त्याच्या आधीं सात-आठ दिवस आचार्यांना ताप येण्यास सुरवात झालेली होती व ते गडावर गेलेही नव्हते. खुनाच्या दिवशीं तर त्यांची तब्येत विशेषच नरम झालेली होती. त्या दिवशीं संध्याकाळच्या वेळीं ते फार अस्वस्थ झाले. खुनाच्या बातमीनें सर्व पेठेंत गडबड उडाली व सर्व पुरुषमंडळी गडावर गेली. या वृद्ध रोग्याच्या समाचाराला जाण्यास कोणी उरला नव्हता. त्यामुळें आचार्य फार उदास झाले होते. त्यांत श्वास कोंडून त्यांचा जीव घाबरा होऊं लागला, तेव्हां ते सुनेला हांक मारूं लागले. ती म्हशीची धार काढण्यांत गुंतली असल्यानें तिला ऐकूं आलें नाहीं. पण धार संपवून पारडूं मोकळें सोडून ती सासऱ्याच्या अंगावरून घरांत जाऊं लागली तेव्हां त्यानें खुणेनें तिला थांबविलें. ती हातां-तील चरवी खालीं ठेवून पहाते तों सासरा घाबरलेला. म्हणून तिनें विचारलें, " काय होतं आहे ? मात्रा दिऊं का उगाळून ? "

विभाग पितापुत्र आचार्य

" कसली मातरा देतेस आतां—अरे चापा रे हि. पोटांतली कळ दाबीत म्हातारा बडबडला.

" सांगाल ती देतें. सूतशेखराची नाहीं तर हेमगर्भाची ताज्या दुधांत उगाळून देतें, " असें म्हणून तिनें घरात जाऊन सहाण व मात्रा आणिल्या आणि थोडी मात्रा उगाळून सासऱ्यास चाटविली. तिनें त्याला जरा बरें वाटलें आणि अडखळत प्रयासानें त्यानें पुढील प्रश्न केला, " रंगू दिसत नाहीं ग कालपासून ? "

" गडावर जायचं झालं आहे. "

" आणखी वैद्यबुवाही फिरकले नाहींत सकाळपासून. कुणींच कसं भेटायला आलं नाहीं ! का माझ्या दुखण्याला कंटाळले सगळे ? " म्हातारा गहिंवरून म्हणाला.

" तसं नाहीं पण गडावर कांहीं गडबड आहे म्हणून चरींचशीं पुरुषमाणसं सकाळींच गेलीं वर. राह्यलेलीं आत्तां तिसऱ्या प्रहरीं गेलीं. गडावर खूण झाला असं सखूमावशी म्हणत होत्या. "

" खूण का खून ? कोणाचा ग खून झाला ? " म्हाताऱ्यानें चमकून विचारलें.

" नाना किल्लेदारांचा म्हणे—पण तें पहा कोणसं आलंच बाहेर, " असें म्हणून चरवी उचलून ती निघून गेली. तोंच खिन्न पण क्षुब्ध चर्या धारण करणारे दोन गृहस्थ ओसरीवर पोंचले. त्यांपैकीं एक तरणाबांड आपल्या ओळखीचा रंगाचार्य हा होता व दुसरा म्हातारा पेठेंतला वैद्य तमण्णाचार्य हा होता.

" अरे रंगा, ही काय विचूक बोलते वेडी ? खून झाला म्हणते गडावर ! कांहीं तरी भलत्या बातम्या पसरतात ! " ऐकलेली बातमी

खोटी आहे असें उत्तर मुलाकडून मिळविण्याच्या आशेनें वृद्ध आचार्यांनीं प्रश्न केला.

नवागत पुरुषांचे गंभीर चेहरे कायम राहिले. तेव्हां निदान त्या वार्तेचा विशेषणात्मक भाग तरी खोटा ठरो या इच्छेनें त्यांनीं पुनः विचारिलें, "पण नानाचा नाहीं ना रे झाला ?"

तरीही दोघांच्या चेहऱ्यांत फरक पडला नाहीं. चार पळांनीं वैद्यबुवांनीं बोलण्यास सुरवात केली, "तरी आम्ही तुमच्या कर्ण-संपुटांत ही वार्ता एकाएकीं जाऊं नये अशा योजनेंत होतों; पण तें कांहीं जमलं नाहीं. असो. या वार्तेच्या योगानीं आपलं चित्त क्षुब्ध होऊं देऊं नका बरं आचार्य. कारण, 'चित्तक्षोभेण रुग्णस्य रोगस्तु द्विगुणो भवेत्'! असं चरकांत का कुठेंसं म्हटलं आहे."

"चुलींत टाका हो तुमचा तो चरक कीं एरंडाचं गुऱ्हाळ! शेवटीं नाना तू आघाडी मारलीस ना? मी थट्टेनीं म्हणायचा 'नाना, तूं माझ्या प्रेताला खांदा देऊं नकोस, मला विटाळ होईल.' तेव्हां तो म्हणायचा, 'माझ्या जाळायच्या वेळीं तूं वेदांतले मंत्र म्हटलेस तरच तुला माझा येसू दक्षणा देईल.' पण काय दैवयोग आहे पहा, नाना माझ्या प्रेताला खांदा द्यायला नाहीं न् त्याच्या प्रेताला अग्नि संस्कार द्यायच्या वेळीं मी मृत्युशय्येवर पडलेलों! तो भीमराव, तो गुणाजीनाना न् मी बाळपणापासनं सोबती; अरे गुलामांनो, माझ्या पुढें पळालांत काय! मी ब्राह्मणाचा पोरगा असलों तरी मला खेळण्याच्या कामांत कमी समजूं नका"! बोलत असतां आचार्यांचे चमकणारे डोळे, चाळवण्या दाखविणारीं बोटें व हासरा चेहरा पाहून आजचा रंग ठीक दिसत नाहीं असें वैद्यबुवांनीं ओळखिलें व त्यांनीं

रंगाचार्यास मात्रा उगाळण्यास सांगून आचार्यांशीं थोडें सांत्वनपर बोलून त्यांस उगें केलें.

आचार्य आणखी बडबड करून थकले व अंथरुणावर पडले. त्यांचा डोळा लागत आहे असें पाहून वैद्यबुवांनीं 'घरीं जाऊन स्नान (कारण ते नुकतेच किल्लेदाराचें प्रेत पोंचवून परत आले होते), संध्या व भोजन भराभर आटोपून परत येतों' असें वचन रंगाचार्यास दिलें व ते निघून गेले. रंगाचार्यही बायकोला रोग्याजवळ बसवून आपलीं नित्यकर्में उरकून पुनः बापाजवळ येऊन बसला.

सुमारें चार घटकांनीं व्यंकटाचार्यांनीं डोळे उघडले व रंगाचार्यास म्हटलें, "बाळ रंगू, सांग कोणी माझ्या नानाचा खून केला?"

"तें सगळंच आश्चर्यकारक आहे बाबा. यशवंतानं हा खून केला असावा, म्हणजे हल्लीं जो तोतया आपण यशवंत आहों म्हणून मिरवतो आहे त्याचं हें काम आहे."

"एकूण तो तोतया असं तुलादेखील वाटायला लागलं कारे?"

"मलाच काय, पण बाबा, खुद्द काशीवहिनीलासुद्धां तसं वाटायला लागलं. काल रात्रींच तिला तसा संशय आला आणखी ती या तोतयाला आपल्या अंगाला हात काय पण आपल्या खोलींत सुद्धां येऊं देईना. ती सासऱ्याला म्हणाली आत्तांच्या आत्तां सगळ्यांची हा येसूच आहे अशी खात्री करून द्या. सगळेच लोक, ती धोंडी न् धोंडू दिखील हा तोतया आहे असं म्हणायला लागले. नानांनीं आपण उद्यां (म्हणजे आज दुपारीं) खात्री करून देऊं असं कबूल केलं. त्याप्रमाणें दुपारच्या वेळीं लोक जमले. इकडे नाना मारुतीची पूजा करीत होते ते लवकर येईनात म्हणून चंद्रीला पाठिवलं फुलबागेंत त्यांचा शोध करायला तर तिची किंकाळी ऐकूं आली. म्हणून सगळे

लोक बागेंत घुसले न् पाहतात तर गुणवंतराव छातीस जखमा होऊन मरून पडलेले ! "

ही हकीकत येथपर्यंत येतांच रंगाचार्य अंगावर शहारे आल्यासारखें करून थांबला. त्याची बायको दाराआड उभी राहून ऐकत होती. तिच्या तोंडून " ई बाई ग ! " असे उद्गार ऐकूं आले व आचार्यांनीं डोळे एकदां घट्ट मिटून पुनः उघडले. डोळ्यांतील पाण्याचा सांठा संपल्यापासून त्यांचें दुःख याच मार्गानें व्यक्त होत असे.

" पण खून येसूनींच केला असं म्हणायला जागा काय ? " आचार्यांनीं कांहीं पळांनीं अडखळत विचारलें, तेव्हां रंगाचार्यानें चंद्रीचें भाषण, गंगाजमनी उपकरणें व तरवार जवळच सांपडणें आणि खुनी इसमाच्या व यशवंतरावाच्या पावलांचा आकार जमणें या पुराव्यांचा वृत्तांत सांगितला. " एकूण या थराला हें प्रकरण आलं ! मी नानाला तई सांगत होतों कबूल कअ—" इतकें बोलतां बोलतां म्हाताऱ्याला झीट आली. त्याला 'र' चा उच्चार करितां येईना. हें चिन्ह बरें नाहीं असें रंगाचार्यास कळून तो घाबरला. तोंच वैद्यबुवांची स्वारी काठी टेकीत खाकरत खाकरत थडकली व "काय रंगा, कांहीं आराम वाटतो आहे का आचार्यांना, ? " असें विचारती झाली.

रंगाचार्यानें कांहीं उत्तर दिलें नाहीं. पण त्याची उदास मुद्रा पाहून वैद्यबुवा तरकले व खालीं बसून रोग्याची नाडी पाहूं लागले. ती अत्यंत मंद झालेली होती. वैद्यबुवांनीं आपल्या बटवींतून एका डबींतील थोडें चूर्ण काढिलें व तें आल्याच्या रसांतून रोग्यास चाट-

विले. तेव्हां आचार्यांनीं डोळे उघडले व वैद्यबुवांचा, "कसें काय आचार्य, कांहीं आराम वाटतो आहे का?" असा प्रश्न ऐकला.

"आराम कसचा आतां? आतां राम म्हणायची पाळी आली आहे!" आचार्य तिरसटपणानें उत्तरले.

"हें पहा आचार्य, आम्हीं कांहीं तुम्हांला सांगायला हवं असं नाहीं पण 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' तुम्हांला कांहीं निरवानिरवीचं सांगायचं असलं तर सांगा. आत्तांच जाल असं नाहीं. आणखी वीस वर्षं काढूं शकाल, नातवंडांचीं लग्नंही पहाल पण आपलं स्नेही म्हणून सांगतों—"

"हें पहा तमण्णाचार्य! मी अगदीं तयार आहें. मला सगळं समजलं आहे. पण रंगा, आतां यशवंत कुठें आहे?"

"त्याला बाळोबानं कैदेंत टाकलं आहे; आणखी सगळ्यांच्या संमतीनं गडाचा हवाला आपल्याकडे घेतला आहे. या सगळ्या हकीगतीचा लखोटा विजापुरास सरकारांत पाठवून तोतया यशवंताची चौकशी करायला अंमलदार पाठवा किंवा आम्हांला राजधानींत बोलवा अशी मागणी करणार आहेत."

"अय्ययो! बिचारा यशवंत तोतया ठरला तर त्याला ठार करतील न् मग गुणवंतरावाचा वंश कमअस्सल ठरेल. रंगा, वैद्यबुवा, तुम्हांला काय वाटतं या बाबतींत?"

आपणाला प्रस्तुत यशवंतराव म्हणून मिरवणारा मनुष्य तोतया वाटतो अशीं दोघांनीं उत्तरें दिलीं.

"तुमचं म्हणणं चुकीचं आहे असं मी आतां दाखवून देतों. त्याशिवाय माझा प्राण सुखानीं जायचा नाहीं. रंगाचार्य! त्या फळी-

वर काळ्या फडक्यांत बांधलेलं दप्तर काढ—वैद्यबुवा, मला आणखी घटकाभर बोलतां येईल अशी..." इतक्या बोलण्याचे श्रम होऊन त्यांस थकवा आला. वैद्यबुवांनीं मघां दिलेलें चूर्ण पुनः आल्याच्या रसांत मिसळून आचार्यांस हळूहळू चाटविलें.

रंगाचार्यानें त्या फळीवरील दप्तर काढिलें, त्याच्या वरचा मळ झाडून टाकला व त्यांतील वह्या काढिल्या. त्यांपैकीं एक विवक्षित वही उघडून पहाण्यास त्याच्या बापानें खुणेनें सांगितल्यावरून त्यानें तसें केलें. या वहींत निरनिराळ्या व्यक्तींच्या तळहाताचे शिक्के उमटविलेले होते. त्यांच्या खालीं त्या व्यक्तींचीं नांवें, त्यांच्या बद्दलचीं भविष्यें, त्यांपैकीं कित्येकांच्या जन्मतिथ्या अशीं टिपणें केलेलीं होतीं.

" मी पूर्वी गोव्यास गेलों होतों, तिथल्या फिरंग्यांच्याकडून हे तळहाताचे न् बोटांचे शिक्के घेण्याची कला शिकलों. पहिल्या-पासून मला सामुद्रिकाचा नाद होताच त्यांत ही भर पडली. मग मी ओळखीच्या सगळ्याचे हातांचे ठसे घेतले. त्यांत यशवंताचाही ठसा आहे. वहीच्या साधारण मध्यभागीं गावेल. सोधून काढ बरं रंगा!" आचार्य अडखळत म्हणाले.

रंगाचार्यानें बरीचशी शोधाशोध करून तें पान काढलें. त्यावर एका दहा वर्षाच्या मुलाचा तळहाताचा ठसा असून त्याच्या खालीं " येसवंत गुणवंत " अशीं अक्षरें लिहिलेलीं होतीं. " हें पहा बाबा. पण हा तर दहा वर्षांच्या मुलाचा तळहात आहे!"

" पण तो ठसा घेऊन आज अठरा वर्षं झालीं. तें जाऊं द्या. आज अठरा वर्षं झालीं. येसूचं लग्न व्हायचं होतं, नाहींतर नुक्तंच झालं असेल. लग्न! यजमानाच्या घरचं लग्न मग उपाध्येबुवांची

चंगळ उडायची, नाहीं गुणवंतराव! आणखी उपाध्येबुवा काजीसाहेब बनले तर हाः हाः हाः हाः!" आचार्यांचें हें बरळणें व हासणें ऐकून वैद्यबुवांनीं त्यांस पुनः चूर्ण चाटवून शुद्धीवर आणलें व तें चाटवीत असतां, "अरे रंगा, हें यमप्रतोद चूर्ण यमाचं आगमन कित्येक घटकांनीं लांचिवतं. माझे गुरु अश्विनीकुमार अय्यर म्हणून आहेत त्यांचा मी पट्टशिष्य. म्हणून मलाच त्यांनीं हें शिकवलं आहे बरं आप्पा! 'यस्य कस्य तरोर्मूलं येन केनापि मिश्रितम्'। त्यांपैकीं नाहीं आमची विद्या. हे पहा तुझे बाबा शुद्धीवर आलेच!" अशी तोंडानें वटवट चालविली होती.

"काय! काय म्हनत होतास र-र-रंगा! लवकर विचार आतां मी फार वेळ जगत नाहीं."

"छे! बाबा तसं म्हणूं नका. पण या तळहातांच्या शिक्क्याच्या वहींत हा येसूच्या दहाव्या वर्षाचा शिक्का आहे. त्याचा काय उपयोग करूं!"

"अरे, यवढी साधी गोष्ट कशाला विचारतोस? खरा यशवंत ओळखायला या शिक्क्याचा उपयोग होईल."

"अहो, पण बाबा! त्याच्या हातावरच्या खुणा न् रेषा या इतक्या काळांत बदलल्या नसतील का?"

"नाहीं रे बाळ. मला बोलवत नाहीं पण त्या वहीचं पहिलं पान पहा म्हणजे समजेल. आम्मा ग, पोटांत कळ उठली, पाणी दे रे."

"बाबा, पण मुनसफांनीं, 'हें सगळं थोतांड आहे, आम्ही नाहीं

याच्यावर विश्वास ठेवीत, ' असं म्हटलं तर ? " रंगाचार्यानें पळींतून बापास पाणी पाजीत विचारलें.

" विजापुरास जा आ–आ–आणखी ताजबावडीजवळ अबदुल कानडा नांव विचार. त्याच्या वाड्यांत..." आचार्य डोळे मिटून जरा स्तब्ध राहिले. मग जुन्या द्वेषजनक स्मृतीनें संतप्त झाल्याप्रमाणें दांत ओठ खाऊन म्हणाले " रोषनबिबीची चौकशी कर. " पुन्हां ते जरा थांबले पण डोळे उघडीनात.

दोन पळें तशींच गेलीं तेव्हां रंगाचार्यानें विचारलें, " बाबा, रोषनबिबीला काय विचारूं ? "

" कोण रोषनबिबी ? अरेरे, नको तें यावनी नांव जिभेवर शेवटच्या क्षणाला. राम राम राम ! " चोवड्या आवाजांत अस्फुट शब्द निघाले.

" अहो वैद्यबुवा, तें यमप्रदोष द्या ना मामंजींला. ते पहा कसे डोळे करताहेत ! द्या हो, बरं करा हो मामंजींला ! " रंगाचार्यांची बायको ओरडली.

"आग रुक्मिणी, आतां औषधानं कांहीं व्हायचं नाहीं बरं." 'औषधं जान्हवीतोयम्–' निराळ्या अर्थानं. जा गंगा न् तुळशीपत्र घेऊन ये. रंगा, उगी बा ! ' जातस्य हि ध्रुवो मृत्यु–' । मग शोक करण्यांत काय अर्थ आहे ? ' न तेन प्रेताः पाल्यन्ते निरर्था परिदेवना ' । ( दाराकडे पाहून ) या मंडळी; आचार्यांची शेवटची भेट घ्या. "

• • •

## चौकशीस सुरवात ९

वरील प्रसंगास सुमारें पंधरा दिवस झाले. बापाची उत्तरक्रिया, बारावेंतेरावें आटोपून रंगाचार्य घोड्यावर बसून विजापुरास रोषनबिबीचा तपास करण्यास निघून गेला. गुणवंतरावांची क्रिया बाळोबानें केली. बाळोबानें विजापुरास सर्व हकीकतीचें पत्र लिहून पाठविलें होतें व त्यांत चालू प्रकरणाची रीतसर चौकशी करण्यासाठीं व्यवस्था खाविंदांनीं करावी असा अर्ज केलेला होता. त्याअन्वयें एक हिंदु व एक मुसलमान असे दोन मुनसफ आदिलशाहानें गोपाळगडीं पाठविलेले होते. या मुनसफांनीं गडावर पोंचल्यावर पांचचार दिवस विश्रांति घेतली व खुनानंतर एक महिन्यानें खटला चालविण्यासाठीं मुद्दाम उभारलेल्या मंडपांत एके दिवशीं सकाळीं चौकशीस प्रारंभ झाला.

मंडपांत एका बाजूस मध्यभागीं दोन उच्चासनांवर दोघे न्यायाधीश बसलेले होते. त्यांपैकीं हिंदु न्यायाधीश शेषाद्रि पंडित नांवाचा विद्वान् ब्राह्मण होता; आडव्या गंध वरून ओढलेल्या भस्माच्या पट्ट्याशिवाय त्याचें हिंदुत्व ओळण्याची दुसरी ठळक खूण नव्हती. त्याचा पोशाख नखशिखान्त दरबारी होता; परंतु हा धर्मशास्त्रांत अति निष्णात व न्याय देण्यांत निःपक्षपाती म्हणून प्रसिद्ध होता. शेजारचे काजीसाहेब हे बादशहाच्या एका बायकोचे भाऊ म्हणूनच त्यांची या उच्चासनावर स्थापना झालेली होती. परंतु पंडितजी म्हणतील त्याला हो देण्यानें यांची अब्रु निभून जात असे. मंडपांत खटला ऐकण्यास पुष्कळ गर्दी झाली होती. न्यायाधीशांसमोर एका तक्याशीं तूर्तचे हंगामी किल्लेदार बाळोबा विराजमान

झालेले होते व बिडचा ठोकलेला अभागी कैदी 'यशवंतराव' एका कोपऱ्यांत उभा केलेला होता.

अर्जदार वाळोबानें 'यशवंतरावा'च्या तोतयेगिरीचे पुरावे प्रथम सादर केले. 'यशवंतरावा'नें आपल्याला ओळखलें नाहीं असें म्हणणाऱ्या किल्ल्यावरील सर्व इसमांच्या साक्षी झाल्यावर त्याला या गोष्टीचा जाब विचारण्यांत आला. त्यानें आपल्या डोक्यावरील जखम दाखवून त्या जखमेमुळें आपली स्मरणशक्ति नष्ट झाली असें उत्तर दिलें. "बरोबर आहे, असं होणं शक्य आहे." काजीसाहेब उद्गारले.

"मला नाहीं वाटत डोक्याला जखम झाली तर स्मृतिनष्टता उद्भवेल म्हणून!" पंडितजी म्हणाले.

"हां, माझं पण म्हणणं तेंच आहे." काजीसाहेबांनीं त्यांस दुजोरलें.

"आतां साहेब, माझं म्हणणं ऐकण्याची मेहरबानी करा." वाळोबा उभा राहून व हात जोडून बोलूं लागला, "एकाद्या माणसाची आठवण नाहींशी झाली तर ती पुरती नाहींशी होईल. याची आठवण नाहींशी झाली म्हणावी तर सगळ्या गोष्टींची ओळख काय ती हा विसरला आहे; आगळी मुद्याच्या गोष्टींची ओळख मात्र ठेविली आहे! हा आपल्या किल्लेदारीला, आपल्या वारसहक्काला, आपल्या बायकोला कसा विसरला नाहीं? सरकार, हें सगळं ढोंग. या तोतयानं यशवंतरावाची किल्लेदारी उपटण्याकरतां त्याचं सोंग घेतलं आणखी तें उघडकीला येऊं नये म्हणून हें जखमेचं निमित्त शोधून काढलं आहे."

"काय रे तोतया! याच्यावर तुझं काय म्हणणं आहे?" पंडितजींनीं 'यशवंतरावा'स विचारलें; परंतु त्यानें उत्तर दिलें नाहीं, तेव्हां ते ओरडून पुनः म्हणाले, "ए कान फुटले का? बोलत कां नाहींस?"

"तुम्हीं हा प्रश्न तोतयाला विचारलात. जो तोतया असेल तो बोलेल." 'यशवंतराव' धिटाईनें बोलला.

"काय उर्मट आदमी आहे! पाठीवर दोन कोरडे ओढा म्हणजे दिसेल तोतया आहे कीं अस्सल आहे!" 'यशवंतरावास' धरून आणणाऱ्या शिपायांनीं काजीसाहेबांच्या हुकुमाप्रमाणें दोन कोरडे ओढले पण त्यानें हूं कीं चूं केलें नाहीं, तेव्हां पंडितजींनीं शिपायांस थांबविलें व म्हटलें, "याचं म्हणणं बरोबर आहे. आपण तोतये-गिरीचा आरोप याच्यावर सिद्ध केला नाहीं तोंपर्यंत याला तोतया म्हणणं म्हणजे जें सिद्ध करायचं आहे तें गृहीत धरल्यासारखं होईल. तेव्हां तूर्त याला आपण आरोपी किंवा कैदी असं नांव देऊं. आपली याला कबुली आहे ना काजीसाहेब?"

"अरे काय विचारतां पंडतजी? माझ्या दिलची बात तुम्हीं केलीत. मी पण हें म्हणणार इतक्यांत तुम्हींच बोलून टाकलंत!" काजीसाहेब म्हणाले.

"बरं आहे. आरोपी! या आक्षेपावर—म्हणजे आरोपावर तुझं काय उत्तर आहे?" पंडितजींनीं 'यशवंता'स विचारलें.

"सरकार, पूर्वीची आठवण नाहींशी झाली तरी तळीरामाच्या तळाशीं ज्या प्रेमळ आठवणी असतात त्या कशा नाहींशा होतील? आपल्याला खरचटलें तर वरचें कातडें मात्र जातें; परंतु आंतल्या

मासाला इजा होत नाहीं. मोठें वादळ झालें तर समुद्राच्या पाठीवर मोठी खळवळ उडून वरचें पाणी उसळतें आणखी समुद्राच्या पाठीवर इतस्ततः भटकणाऱ्या जहाजेंतारवांचा नायनाट होतो; पण समुद्र-देवतेनें पोटांत संभाळलेल्या जळचर जिवांचा नाश होत नाहीं "— 'यशवंत' बोलूं लागला.

'अरे वा रे मेरा बुलबुल ! तूं तर मला उमर खय्यामचा बापच दिसतो आहेस !" काजीसाहेबांनीं मध्येंच शेरा मारला.

"त्याचप्रमाणें," तो पुढें म्हणाला, "पुसट आठवणी नष्ट झाल्या; पण जिव्हाळ्याच्या आठवणी जशाच्या तशा राहिल्या. जन्म-दाता बाप, प्रिय पत्नी आणि एकुलतें एक अपत्य यांच्या आठवणी अंतःकरणाच्या काळ्या दगडावर खोदलेल्या पुसटल्या नाहींत, आणखी त्या तीन जिवलगांचें वास्तव्यस्थान असलेला गोपाळगड स्मरणांतून जाणें अशक्य झालें. त्या स्मृतीच्या जोरावरच मी विजयनगरापासून दोनशें कोसांवर घरीं येऊं शकलों. मनाचा दुबळेपणा आणि शरीराची अशक्तता यांचा परिणाम झाला नाहीं."

"याचं बोलणं मला पटतं; याचे आकार, इंगित, चेष्टादि भाव शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें संभावित गृहस्थाच्या भावांशीं विसंवादी नाहीत आणि याचं विधानही चूक दिसत नाहीं. तेव्हां विशेष बळकट असे पुरावे आणल्याशिवाय याच्यावर आरोप शाबीत होणार नाहीं. काय काजीसाहेब, आपल्याला काय वाटतं ?" पंडितजी म्हणाले.

"अरे कसा शाबीत होईल ? हें काय विचारतां पंडित ?" काजीसाहेबांनीं संमति दिली.

पंडितजींनीं काशीबाईची साक्ष घेण्याचें ठरविलें. थोड्याच वेळांत ती केस मोकळे सोडलेली, कपाळावर मळवट भरलेली व धुळीनें अतिशय भरलेलें लुगडें नेसलेली अभागी स्त्री न्यायासनासमोर दोन दासींनीं आणिली. परक्यांपुढें तोंडावर पदर घेण्याचें भानदेखील तिला राहिलें नव्हतें. पंडितजींकडे कांहीं वेळ टक लावून ती खदखदा हासली व " चाचा, केव्हां आलांत स्वर्गातून ? मामंजी गेले तुम्हांला भेटायला नि तुम्ही निसटून खालीं आलांत. इकडूनच ('यशवंतरावा' कडे बोट दाखवून ) मामंजींला पाठवायचं झालं असं चंद्री म्हणते. काय हो घरधनी, बरे खुशाल ? हे कंडीतोडे कशाला चढवले आहेत? माझ्या डोक्यावर सवत आणून नाचवायची आहे कीं काय ? ' सवतीसवतीचं भांडण। सावळ्यारामाचं कांडण ॥ ' अशांतली गत होईल बरं ! ( पंडितजींस ) बाबा, अहो तुम्ही तरी सांगा इकडे–"

" अरे अरे ! काय हिची दुर्दशा झाली आहे ! हिची कसली साक्ष घेऊं मी ? ज्या नराधमानं हिला वेड लावलं असेल त्याचे हालहाल करून कुत्र्यांकडून त्याला खाववलं पाहिजे. हिला बाजूला नेऊन बशीव बरं बया. " पंडितजींच्या आज्ञेप्रमाणें धोंडीनें तिला शांत करून बाजूला नेऊन बसविलें व तीही आपल्या पांघरण्याच्या शालीच्या सरळ व लांब पट्ट्या काढण्याच्या कामांत गर्क होऊन गेली.

" सरकार, माझ्या प्रिय वहिनीला वेड लावण्यापेक्षांही या अधमानं घोर गुन्हा केला आहे. आणखी तो म्हणजे प्रत्यक्ष आपल्या जन्मदात्या पित्याचा, माझ्या चुलत्याचा, गुणवंतरावांचा खून केला आहे. " बाळोबा म्हणाला.

" अर्जदार ! यानें आपल्या जन्मदात्याचा म्हणजे गुणवंतरावाचा खून केला आहे असें तुम्ही म्हणतां; याचा अर्थ हा मयत

किल्लेदाराचा पुत्र यशवंतच आहे असं कबूल केल्यासारखं झालं. ” पंडितजी म्हणाले.

“ हेः हेः पंडित महाराज, बोलण्यांत एकादे वेळीं चूक होती आहे; मनुष्य आहे ! पण या तोतयावर खुनाचा आरोप आहे आणि त्याकरितां माझा साक्षीदार म्हणजे माझ्या यशवंतरावाची मुलगी चंद्रभागा ही आहे. हिनं या तोतयाला प्रत्यक्ष खून करतांना पाहिलं आहे. ” असें म्हणून बाळोबानें चंद्रीला न्यायासनासमोर उभें केलें. ती विचारी पोर आपल्या हतभागी ‘ बापा ’ कडे, त्या दरबारी पोषाकांतल्या दोन न्यायमूर्तींकडे व सर्व जनसमाजाकडे पाहून घाबरली. परंतु पंडितजींनीं गंभीरपणें व काजीसाहेबांनीं थट्टेखोरपणानें बराच धीर दिल्यावर तिनें खुनाच्या वेळची सर्व हकीकत सांगितली. त्याचप्रमाणें खुनी इसम व ‘तोतया यशवंतराव’ यांच्या पावलांचा आकार कसा तंतोतंत जमत होता तें कित्येक साक्षीदारांनीं सांगितलें. तें ऐकून घेतल्यावर पंडितजींनीं ‘ यशवंतरावा’स सर्व प्रकारचा उलगडा करण्यास सांगितलें.

“ सरकार, या चमत्काराचा उलगडा मी तरी काय करूं ? खून ज्या वेळीं झाला त्या वेळीं मी आपल्या मित्राबरोबर बोलत बसलों होतों; पण तो तर आज पंधरा दिवस बाहेरगांवीं गेला आहे. माझें उपरणें आदल्या रात्रींच सांपडत नव्हतें; तरवारीची गरज न लागल्यानें ती हरवल्याचें माझ्या लक्षांत आलें नाहीं. माझ्या मुलीनं ओळखलें म्हणतां पण तिचा तो भ्रम असावा. पावलांसारखीं पावलें नसतात काय ? माझें सोंग घेऊन कोणीं दुष्टानें हा डाव साधला असावा असें मला वाटतें. याउपर देवाची मर्जी ! ” ‘ यशवंता ’नें उत्तर दिलें.

"आरोपीचं पुत्रत्व मयत गुणवंतरावांना मान्य होतं." पंडितजी बोलूं लागले, "आरोपी आणि मृत यांचा तंटाही झाला नव्हता; मग आरोपीनं गुणवंतरावांचा वध करण्याचं कारण तरी काय? तें सांपडल्याशिवाय त्याला दोषी ठरवण्याला माझं मन घेत नाहीं. कारण शास्त्रांत म्हटलं आहे, निमित्ताशिवाय मूर्खदेखील कार्याला प्रवृत्त होत नाहीं. 'प्रयोजनमनादृत्य न मन्दोऽपि प्रवर्तते।' काय काजीसाहेब, आपल्याला काय वाटतं?"

"अरे काय विचारतां पंडत! आमच्या कुराणांतबी असंच सांगितलं आहे ना? भूक लागल्याशिवाय कोणी भट्टी पेटवितो काय? आन् तल्लफ लागल्याशिवाय हुक्का पण कोण मागतो?" काजीसाहेबांच्या सूचित इच्छेप्रमाणें त्यांच्यापुढें हुक्का आणून ठेवण्यांत आला व ते त्याचे झुरके मधून मधून घेऊं लागले.

बाळोबा पंडितजींस उत्तर देण्यास उठले व आदल्यां रात्रीचें सासरासुनेचें भाषण, व रहस्य सांगून टाकण्याचें गुणवंतरावाचें वचन यांची हकीगत तिखटमीठ लावून सांगून त्यांनीं म्हटलें, "आतां आपलं गुपित हा म्हातारा सांगून टाकील या भीतीनें या तोतयानं गुणवंतरावांचा खून केला असला पाहिजे."

आरोपी हे शब्द ऐकून मध्येंच बोलला, "उलट नानांनीं तें रहस्य सांगून टाकून मला सगळ्यांच्या संशयी वृत्तींतून मुक्त करावें अशी भुणभुण मींच त्यांच्या मागें कित्येक दिवस लावली होती. मला तर वाटतें नाना माझें समर्थन करतील या भीतीनें अर्जदारानेंच हा खून मारेकऱ्यांकरवीं करविला असला पाहिजे; आणखी माझीं उपरणें व तरवार चोरून त्याला दिलीं असलीं पाहिजेत. मी

मेल्यास हाच जाणता वारस असल्यानें याला किल्लेदारी मिळण्याचा संभव होता व माझ्या तान्ह्या मुलाला मारवून तो द्विगुणित करतां आला असता. ”

“ काय उलटया काळजाचा पाजी आहे ! अरे मूर्खा, किल्लेदारीचा खरा वारसदार येसू जिवंत असतां ती मला मिळेल कशी ? त्याच्या-चसाठीं माझी खटपट आहे—हा बघ गाढवा, तुझा काका यशवंतराव इथें बसला आहे ! ” असे उद्गार काढून बाळोबानें शेजारीं तोंड गुरफटवून बराच वेळ प्रेक्षकाप्रमाणें बसलेल्या इसमाचा फेटा ओढून टाकला व त्याची नकली दाढीमिशीही उपटून टाकली. त्या इसमानें, “ अरे बाळया, नको मला ती किल्लेदारी, बरी आहे माझी फकिरी ! ” असें बोलत बाळोबाचा प्रतिकार केला. पण शेवटीं तो नकली वेष काढून टाकतांच स्वाभाविक वेषांत सभेंत तो उभा राहिला. त्याच्या-कडे पहातांच सर्व सभासदांनीं चकित होऊन, “ यशवंतराव ! येसू ! अरे, हाच आमचा येसवा ! ” इत्यादि प्रकाराचे आनंदाचे व आश्चर्याचे उद्गार काढिले.

हा नवीन इसम प्रवासास गेलेल्या यशवंताच्या अधिक सारखा दिसत होता. त्याच्यासारखा टवटवीत व उल्हसित चेहरा, तसेंच पिळदार शरीर व तीच प्रेमळ नजर. या व्यक्तीनें प्रथम म्हटलें, “ मी येथें थोड्या दिवसांपूर्वी आलों. आल्याच्या दुसऱ्याच दिवशीं माझ्या नानांचा या ( कैद्याकडे बोट दाखवून ) कृष्णरावानें खून केला. हा खटला गुप्त वेषांत ऐकण्याची माझी इच्छा होती. परंतु आमच्या बाळो-बानीं आमचा बेत शेवटाला नेऊं दिला नाहीं ! असो. हरीच्छा ! कसें काय अप्पा ? ठीक आहेत मुलेंबाळें ? ”

अप्पा चिटणिसांचा कंठ गहिंवरून आला. त्यांनीं या नव्या

व्यक्तीला घट्ट आलिंगन दिलें. दोघांच्या डोळ्यांतून आंसवें वाहूं लागलीं. त्यांच्याकडे पाहून इतर जणांच्या डोळ्यांतही आंसवें आलीं. न्यायाधीशद्वयही जरा विरघळले. कैदी 'यशवंतराव' मात्र हा देखावा पाहून चवताळला. किंचित् विचार केल्यासारखें करून आपले विड्या ठोकलेले हात उंच करून तो ओरडला, "अरेरे! आतां मला आठवूं लागलें. अरे कृष्ण्या, असला अमंगळ डाव साधायला तूं येथें आला आहेस काय?"

नवीन व्यक्ति उलट कैद्याकडे पाहून तिरस्कारानें म्हणाली, "वा रे कृष्णराव—आपले यशवंतरावसाहेब! चोर तर चोर आणखी वर शिरजोर! माझ्या भोळेपणाचा फायदा घेऊन तूं माझा तोतया बनून राहिलास; परंतु मीं प्रकट होऊन तुझें बेंड फोडलें नाहीं. आतां काय उपाय? माझ्या इच्छेविरुद्ध मला येथें भगवंतानें प्रकट केलें आणि तुझ्याबद्दलचा भ्रमाचा भोपळा फुटला! वाईट इतकेंच वाटतें, या बनावामुळें विचारी मा—अं हं—बिचारी काशी कीर्तीला मुकली."

पंडितजी तर त्या दोन व्यक्तींकडे आळीपाळीनें पाहण्यांत व त्यांच्या अलौकिक सादृश्याबद्दल कौतुक करण्यांत गढून गेले. काजीसाहेब जरा गुडगुड करून कैद्याकडे पहात व पुनः एक झुरका मारून नव्या व्यक्तीकडे पहात आपल्याशीं स्मित करीत होते. गडावरील पुरुषमंडळी नवीन व्यक्तीला भेटत होती व नवीन व्यक्ति प्रत्येकाला नांवानें ओळखून त्याच्याशीं कुशलसंवाद करीत होती. अशा प्रकारांत घटकाभर वेळ गेल्यावर पंडितजींनीं आपल्या चोपदारास व्यवस्था करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें, "खामोष! खामोष! बैठ जाव सब लोक!" असा त्यानें पुकारा केला. सर्व मंडळी खालीं

बसली. जे लोक अजून आपापसांत बोलत होते त्यांजकडे पंडित-जींनीं तीक्ष्ण नजरेनें रोखून पाहिलें तेव्हां सर्व गडबड शांत झाली.

"या खटल्याच्या निकालाला सर्वथैव अनुकूल असाच हा नवीन प्रसंग आलेला आहे." पंडितजी बोलूं लागले, "हा नवीन आलेला इसम स्वतःला यशवंतराव म्हणवीत आहे. कैद केलेला इसम तर त्या नांवानें येथें कित्येक वर्षें रहात होता. आतां खरा यशवंतराव कोणता हें काशीबाई सहज ओळखून काढील. तिची पहिल्यानें साक्ष घेऊं. बाई, ये जरा पुढें! तोंडावर पदर घेऊन ये आणखी या दोघांतला आपला पति कोणता तें ओळखून काढ बरें!" हे शेवटचे शब्द काशीस उद्देशून होते.

काशीनें हा वेळपावेतों आपल्या शेल्याचे शंभर बाहुल्यांना पुरतील इतके लहान लहान शेले तयार केले होते व दुसऱ्या कोणत्या चिरगुटाचा निकाल लावावयाचा याच्या काळजींत ती पडली होती. धोंडीनें तिचा हात धरून तिला न्यायासनासमोर नेलें. पंडितजीं-कडे पाहून, "काय बाबा?" असें तिनें विचारिलें.

पंडितजींनीं आपल्या आज्ञेची आवृत्ति केली.

"अगबाई! हें सयंवरच मांडलं आहे दमयंतीचं! दमयंतीला मिळवण्याकरतां इंद्रसूर्यांनीं नळाचंच रूप घेतलं आणखी तिला भिरांती पाडली, त्या वेळचं गाणं मला येतं आहे, ऐका हं, "देवांनीं तंव मावो केली। नळमूर्तींनीं सभा भरियली। मुख्यरूप त्यांमाजी कोणतें। कळेच ना तिजला॥ उभय जोडुनी मग ती पाणी। म्हणे स्वामी हो ऐका श्रवणीं। काया वाचा मनांत आणी। नळ वसे माझ्या॥ देवांचीं प्रकटियलीं चिन्हें। निमिखावांचुनी दिसती

नयनें । पाय न लागती धरणीलागी । उमजलें तिजला ॥ ' पाहूं वरं तुमचे पाय–" दोघां प्रतिस्पर्ध्यांच्या पायांकडे भ्रांत नजर टाकून ती म्हणाली, "इश्श! हें काय? दोघांचेही पाय जमिनीला लागले आहेत. आतां इथून पळून जावं हें बरं, नाहींतर पंचाईत व्हायची!" असें म्हणून ती सभागृहांतून विजेसारखी नाहींशी झाली.

"अरेरे! या बिचारीला साक्षीला आणून तिला त्रास द्यायला आपण कारणीभूत झालों!" पंडितजी काजीसाहेबांस म्हणाले.

"बिलकूल सच्ची बात. विनाकारण आपण भूत झालों!" काजीसाहेबांची पुष्टि मिळाली.

"आतां या खटल्याचा निकाल काशीबाईच्या साक्षीशिवाय केला पाहिजे. कैद्याला गडावरचीं माणसें तो दीड वर्षापूर्वी आला होता तेव्हां ओळखतां आलीं नाहींत; नवीन इसमास तीं पहिल्याच बैठकीला ओळखतां आलीं. हा नवीन इसमाच्या बाजूचा पुरावा आहे. पण काय रे पाव्हण्या! आणखी कोणी साक्षीदार तुझ्या बाजूचा आहे का इथें?"

"आहे तर! ती धोंडी दासी बसली आहे ना समोर तिथें? धोंडे, ये पुढें. (धोंडी न्यायासनासमोर येऊन उभी राहिल्यावर) मला तूं ओळखलेस ना?"

'अव येसबा, ह्ये काय इचारणं? तुमीच न्हवं का नानासायबांचा खून व्हायचा आदल्या रातीं काशीबाईच्या खोलींत आल्तां?" ती म्हणाली.

'बरं, मग त्या वेळीं काय काय झालं तें सरळ सांग पाहूं." पंडितजींनीं तिला आज्ञा केली.

धोंडीनें ' कृष्णरावा ' च्या व काशीबाइच्या भेटीचें वर्णन सरळपणें सर्व सांगितलें. त्यांत काशीची अस्सल तसवीर ' कृष्णरावा ' जवळच कशी निघाली व ती पाहून काशीबाई कशी भांबावून गेली, त्यानें एका शेल्याची बरोबर आठवण कशी दिली, एक खात्री करून देणारी खूण सांगून काशीला कसें चकित केलें, ती सर्व हकीकत न्यायाधीशांस सांगितली. आतां पुराव्याच्या नंतरचा निर्णायक उपाय जो मार त्याचा प्रयोग करण्याची बाकी राहिली. पूर्वींच्या काळांत या उपायाचा अवलंब उघडपणें करण्यांत येत असे व त्यास अनुसरून पंडितजींनीं कैद्याच्या पाठीवर फटके ओढण्याचा हुकूम केला. दोनचार खातांच कैदी कळवळून जाऊन, " बस् आतां पुरे ! मी आपला गुन्हा कबूल करतों. एकदांचे मला कड्यावरून लोटून मोकळे व्हा म्हणजे झालें. हे हाल माझ्यानें आतां सहन करवत नाहींत. "

" ठीक आहे. हा कबुली जबाब मिळाला. चला आतां याला कडेलोटाकडे घेऊन ! " बाळोबा उतावीळपणानें शिपायांस सांगूं लागला; परंतु न्यायाधीशांनीं त्याला डोळ्यांनीं दाबून शिपायांस आज्ञा देणें न देणें आपल्या हातीं आहे असें त्यास बजावलें व काय निकाल द्यावा याचा आपापसांत खल करण्यास सुरवात केली. नेहमीं-प्रमाणें हा खल एकतर्फी होता. तो संपतांच पंडितजींनीं खाकरून आपण बोलणार असल्याचें सुचविलें. नुक्तीच सुरू झालेली कुजबुज थांबली व सर्वांचे डोळे त्या न्यायासनावरील विधिप्रतिनिधीकडे उत्सुकतेनें लागले.

" सभाजन हो ! आरोपी कृष्णराव याजकडून आतांच आपण स्वापराधनिवेदन ऐकिलें आहे. हा अधमाधम अत्यंत कठोर शिक्षेला

पात्र आहे. यानें निरपराधी यशवंतरावाच्या पत्नीच्या सौभाग्यांत, पातिव्रत्यांत माती कालविली, वृद्ध किल्लेदाराचा खून केला आणखी सर्वांच्या डोळ्यांत धूळ फेकून या मित्रद्रोह्यानें दीड वर्ष किल्लेदारीचा उपभोग घेतला. असल्या नीच नराधमाचें पारिपत्य–”

नवीन आलेल्या व आतांच यशवंतराव म्हणून सर्वांनीं कबूल केलेल्या इसमानें मध्येंच न्यायाधीशांस विनंती केली, “सरकार, कितीं झालें तरी हा कांहीं काळ माझा प्रिय मित्र म्हणून वागत होता. दुर्दैवानें त्याला दुर्बुद्धि सुचली–त्याला क्षमा करून सोडून द्यावें, अशी मी याचना करितों.” हे दयेचे उद्‌गार ऐकून या इसमा-बद्दल सर्वांस कौतुक वाटलें व “वाहवा ! काय हें औदार्य ! गुणवंत-रावांच्या लेकास साजेसेंच आहे !” असे शब्द सभेंत अनेकांच्या तोंडून निघाले.

“नाहीं, नाहीं. चित्रगुप्त निष्ठुर असतो. याला देहांत शासनच मिळणार ”–पंडितजी बोलूं लागले.

“थांबा थांबा, सरकार. अजून निकाल देऊं नका. हा पहा मीं पुरावा आणलेला आहे त्यावरून आरोपी हाच खरा यशवंतराव आहे आणि हा नवीन इसमच तोतया आहे असं मी सिद्ध करतों,” रंगाचार्यांची स्वारी धापा टाकीत मंडपांत प्रवेश करून म्हणाली.

“वा ब्राह्मणबुवा ! वेळेवरच आलांत अगदीं ! पण तुमचं नांवगांव आणि पुरावा काय आहेत त्याचं थोडं दिग्दर्शन केलंत तर बरं होईल.” पंडितजी म्हणाले.

“माझं नांव रंगाचार्य. मी गुणवंतरावांचे उपाध्ये व्यंकटाचार्य यांचा मुलगा. कांहीं पुरावा गोळा करण्याकरितां मी विजापुरास

गेलों होतों (या वेळीं त्यानें नवीन इसमाकडे खोंचून पाहिलें) म्हणून मला उशीर लागला. पुरावा हा या वहीचा आहे." एका भल्या लठ्ठ वहीचीं पानें न्यायाधीशांस दाखवीत तो म्हणाला, "या वहींत कांहीं तळहातांचे ठसे माझ्या तीर्थरूपांनीं अठरा वर्षांपूर्वीं घेतलेले आहेत. हे पहा."

"ए बम्मन! ही पिराच्या पंज्यांची किताब काफराच्या हातांत कशी आली?" काजीसाहेबांनीं रागानें पृच्छा केली.

"तेंच मी सांगतों, काजीसाहेब! ही पिरांच्या पंज्यांची किताब नसून माझे वडील व्यंकटाचार्य यांनीं सामुद्रिकाचा अभ्यास करीत असतांना गडावरच्या मंडळींच्या हातांचे शिक्के घेतलेले या वहींत सांचवलेले आहेत. हे सुमारें अठरा वर्षांपूर्वीं घेतलेले आहेत आणखी या शिक्क्याच्या साह्यानें आपल्याला खरा यशवंतराव हुडकून काढतां येईल." रंगाचार्य बोलला.

पंडितजींनीं या पुराव्यावर बरेच आक्षेप घेतले. सामुद्रिक, ज्योतिष, दिव्य, असल्या तांत्रिक साधनांची मदत न्यायासनासमोर घेतां येत नाहीं. अठरा वर्षांपूर्वींचे शिक्के आतां काय उपयोगाचे? त्या वेळीं घेतलेल्या हस्तरेषा या अवधींत बदलल्या नसतील म्हणून कशावरून? शेवटीं, ही वही तरी खरी असें समजण्याला काय प्रमाण आहे? या आक्षेपांच्या समाधानार्थ रंगाचार्यानें सांगितलें, "आपल्याला सामुद्रिकाचं साह्य घ्यावयाचं नाहीं, फक्त शिक्क्यांचं घ्यायचं आहे. आतां ही वही खरी कशावरून आणि हस्तरेषा बदलत नाहींत काय, याचं उत्तर पहायला हातच्या कांकणाला आरसा नको आहे. चक्षुर्वै सत्यम्च्या न्यायानंच सरकाराला सिद्ध करून दाखवतों. आतां हा

2९५२२

पहा एक पंजा— याच्या खालीं बाळोबा पाटलांचं नांव आहे. आणखी बाळोबा, जरा आपला हात द्या पाहूं ! ”

रंगाचार्यानें बाळोबाच्या हाताला एका शिशींतला रंग लावला व त्याचा छाप आपण आणलेल्या कागदावर उमटविला. मग वहींतला छाप आणि आतां घेतलेला छाप यांची तुलना करण्यासाठीं ते दोन्ही छाप त्यानें पंडितजींपुढें ठेविले. त्यांनीं बारकाईनें पाहून म्हटलें, “ आहे खरं साम्य. फक्त आकारांत फरक; बाकी आकृति, रेषाबिषा अगदीं जशाच्या तशा ! बरं रंगाचार्य, आणखी कांहीं नमुने काढा पाहूं. ”

अप्पा चिटणीस, धोंडू जमादार, रुद्राप्पा दिवट्या, धोंडी, वगैरे अनेकांच्या हातांचे छाप त्या वहींत होते. त्या त्या माणसांचे हातांचे ठसे उमटवून रंगाचार्यानें आपलें म्हणणें सर्वांपुढें सिद्ध केलें व म्हटलें, “ आतां तरी न्यायाधीशसाहेब आणखी सर्व मंडळींची खात्री झालीच असेल कीं, हस्तरेषा आणखी अंगुलिरेषा हीं ओळख पटवण्याचीं निर्विवाद चिन्हें आहेत. पन्नास जणांच्या बाबतींत ही खात्री आपल्याला मीं पटवून दिली आहे. तर एकावन्नाव्या म्हणजे यशवंतरावाच्या बाबतींत ती पटणार नाहीं काय ? ”

“ अलबत पटेल. अवश्य पाहूं या. ” वगैरे संमतिदर्शक प्रत्युत्तरें मंडपांत निघालीं.

“ तर मग ( वहींतील विवक्षित पान काढून ) हा पहा यशवंतरावाच्या हाताचा शिक्का. या शिक्क्यांशीं ज्याच्या हाताचा ठसा जमेल तोच खरा यशवंतराव. ” असें म्हणून त्यानें ‘ यशवंतराव ’-पणाचा लोभ धरणाऱ्या दोन्ही इसमांच्या हातास रंग लावून त्यांचे

ठसे घेतले. मग प्रथम नवीन आलेल्या 'यशवंतरावा'च्या हाताचा ठसा आणि वहींतील ठसा हे त्यानें पंडितजींपुढें ठेविले. त्या दोहोंची तुलना करतां त्यांत फारच तफावत असल्याचें पंडितजींच्या नजरेस आलें. त्यांनीं इतरांस जवळ बोलावलें व त्यांसही तुलना करण्यास सांगितलें. सर्वांचें मत रेषा जमत नाहींत असेंच पडलें.

नवीन आलेला इसमच तोतया आहे अशी कुजबुज सुरू झाली, तोंच तो ओरडला, 'अहो, पण या कैद्याचा तरी हात जमतो आहे का पहा न् मग मला तोतया ठरवा!"

"बरोबर आहे." पंडितजी म्हणाले, "कैद्याच्या हाताचा ठसा आणा पाहूं आचार्य!" रंगाचार्यानें तोही ठसा त्यांच्या पुढें ठेविला. कांहीं वेळ न्याहाळून पाहून पंडितजी आंबट तोंड करून म्हणाले, "छेः! हाही हात जमत नाहीं. कांहीं नवीन रेषा यावर उमटलेल्या दिसतात."

"त्या रेषा कैद्याला श्रमाचं काम पडल्यानं किंवा खरचटल्यानं झाल्या असतील. तळहातावर हत्यारांचे वार लागल्यानंही असं होण्याचा संभव आहे." रंगाचार्यांनीं समजूत केली.

"तसंही असेल कदाचित्; पण एकंदरींत एवढंच दिसतं कीं, तुम्हीं हा पुरावा आणलात हा फारसा जमेला धरतां येत नाहीं. दोघांच्याही रेषा वहींतल्या ठशाच्या रेषांशीं जमत नाहींत म्हणून जमाखर्च सारखाच झाला. परंतु तुमच्या या श्रमाबद्दल थोडंसं पारितोषक देतों तें इतकंच कीं, कैद्याला आजच शासन करायचं तें तीन दिवस लांबणीवर टाकूं—काय काजीसाहेब, आपली संमति आहे ना?"

काजीसाहेबांचा आत्मा परिस्तानांत विहार करण्यास गेला होता.

" काजीसाहेबांची संमति आहेच, " पंडितजी पुढें म्हणाले, " या तीन दिवसांच्या अवधींत अन्य बळकट प्रमाण आलं तर ठीक आहे, नाहीं तर आजचा निकाल कायम समजून आजपासून चवथ्या दिवशीं मध्यान्हीं आरोपी कृष्णराव याचा कडेलोट करण्यांत येईल. बस्. सभा बरखा—"

" स्त होण्यापूर्वी माझी विनंती सरकारनं मान्य करावी. अर्जदारातर्फें आलेल्या यशवंतराव म्हणविणाऱ्या इसमावर पहारा ठेवून त्याला इकडे तिकडे फिरूं देऊं नये. नाहीं तर मी जो साक्षीदार आणवीत आहें त्याला येऊं न देण्याची खबरदारी हा इसम घेईल." रंगाचार्यांच्या या विनंतीप्रमाणें नवीन इसमाला दोन शिपायांनीं ताब्यांत घेतलें व त्याला नजरकैदेंत ठेवण्यांत आलें. बाळोबाशीं देखील बोलण्याची त्याला मनाई झाली. कैदी ' यशवंतरावा'ला पुनः तीन दिवसांकरितां अंधारकोठडींत रवाना केलें.

• • •

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय शाखा,
वा. क्र ... नों. दि.
वि

## रोषनबिबी, १०.

गडावरची कडेलोटाची जागा जात्या फार भयंकर होती. त्यांतून तिच्यावरून लोटून ज्यांस यमसदनास पाठविण्यांत आलेलें होतें अशा अपराधी व निरपराधी मनुष्यांच्या भुतांच्या दंतकथांच्या संसर्गानें ती

अधिकच भीषण वाटत असे. मध्यान्हीच्या चकचकीत उजेडांतही तिजकडे पहातांच पोटांत धडकी भरत असे. परंतु पोटांत भरलेल्या धडकीचा अनुभवही आपली स्वतःची कातडी शाबूत असण्याची खात्री असल्यास किती आल्हादकारक असतो हें अद्भुत नाटकें-कादंबऱ्यांपैकीं करुणात्मक प्रसंगांतील रसास्वाद करणारांस सांगावयास नको. चारशें वर्षांपूर्वी नाटकें होत नसल्यानें असले रोमहर्षकारक प्रसंग प्रत्यक्ष जगाच्या रंगभूमीवर पाहून आपल्या हृदयांतील पाशवी रुधिरतृष्णा लोकांस शमवावी लागे. ते पहा कडेलोटाकडे जाणारे दोन गृहस्थ काय बोलत आहेत ?

"काय हणमंत! कडेलोट पघायला निघालास न्हय ! मीबी तकडंच चाललों हाये. चला, संगंच जाऊं."

"चला राव. आज ईस वरसांत असली मजा पघाया गावली न्हवती. लईच मवाळ व्हता गुणवंतराव ! कडेलोटाची शिकशा कोणाला द्यायचाच न्हाई."

"पर नशिबाचा फेरा काय न्यारा हाये हणमू, जो माणूस वैऱ्यालाबी मारायचा न्हाई त्याच्या प्वारालाच कडेलोटावरून ढकलून द्याया ते मागं पुडं पघत न्हाई ! इचित्र न्याव हाय देवाचा ! बाकी हा तर त्याचा प्वारगा न्हवताच म्हना. पर काय रे पांचशें हात उंचीवरून माणूस पडला म्हंजे कशा त्याच्या ठिकऱ्या व्हतात तें पहाण्यावाणी असल, न्हाई ?"

"आरं त्ये काय इचारतोस ? मागं मी गोवळकोंड्यास व्हतों तवां, कडेलोट काय, न् हत्तीच्या पायाशीं काय, न् तोफेच्या त्वांडी काय ? किती तरी शिकशा पाह्यल्यात ! पर या ग्वापाळगडावर आल्या-

पासनं ही मजा पहायला गावली न्हवती इकत्या वरसांत, ती आज पघतों हाये ! ”

“ अरे पण हणम्या ! ती पहा गर्दी दिसाया लागली. आतां हातंच उभं राहावं लागेल ”—

कडेलोट एका सुळक्यावर होता व त्या सुळक्याखालीं पांचसातशें माणसांस उभें राहून ‘ मजा ’ पहातां येईल इतका पठार होता. त्यावर चिकार गर्दी होती. सुळक्याच्या माथ्यावर शिकस्त वीस माणसें उभीं रहातील एवढीच जागा होती व तेथून खालीं सरळ कडा गेलेला होता. कैदी ‘ यशवंतराव ’ यास दोऱ्यांनीं बांधून उभें केलेलें होतें. दोन न्यायाधीश, अर्जदार बाळोबा, अस्सल ठरलेला नवीन ‘ यशवंतराव, ’ आणखी एक दोन खाशीं माणसें व एक-दोन शिपाई इतकेच वर उभे होते. सुळका आणि आकाश यांच्या मध्यभागीं भक्ष्याच्या आशेनें घारी चिर्र्-र्र्-र्र् आवाज काढीत अंतराळांत घिरट्या घालीत होत्या व खालीं पायथ्याशीं असलेल्या झुडपांएवढ्या दिसणाऱ्या वडाच्या वृक्षांवर ठिपक्यांएवढीं दिसणारीं गिधाडें वरून येणाऱ्या अभागी इसमाची वाट पहात बसलीं होतीं.

“ कृष्णराव, तूं आपल्या अनंत दुष्कृत्यांचं फळ भोगण्याकरतां परलोकीं चालला आहेस. मरतांना तरी स्वखुषीनं अपराध कबूल कर म्हणजे थोड्या तरी यमयातना कमी होतील. ” पंडितजी म्हणाले.

“ पंडित महाराज ! देवाच्या घरचा न्याय संपला. मी हाल-अपेष्टा सोसून आतां एखाद्या निमकहरामाच्या मोतीनें मरून जात आहें, याबद्दल मला मुळींच वाईट वाटत नाहीं. परंतु माझी पत्नी दुराचरणी

करत आहे आणि आमच्या वंशाचा अंकुर वळवंतराव कमअस्सल मानला जात आहे याबद्दल माझें हृदय करपून चाललें आहे. अरे वाळ्या कृतघ्ना, तुला मीं आपली सगळी मालमत्ता देऊन टाकली असती; पण माझ्या संपत्तीबरोबर आमच्या घराण्याची इभ्रत— आमच्या अब्रूची राखरांगोळी करून तूं कोणत्या नरकाची भर करणार आहेस? हरामखोरा कृष्ण्या! आतां मला एकेक आठ- वण होऊं लागली. माझ्या प्रेमाच्या कानगोष्टीसुद्धां तुला विश्वासानें सांगितल्या—" कैदी बोलत होता.

"पुरे पुरे, कांगाव पुरे झाला. किल्लेदार या नात्यानें मी आतां तुझे डोळे बांधण्याचा हुकूम करतों. तुझ्यासारख्या कुत्र्याला पायानें लाथाडून कडेलोट करण्यासाठीं माझे पाय कसे वळवळ करीत आहेत."

कैद्याचे डोळे बांधून झाल्यावर नवीन 'यशवंतराव' म्हणाला, "आतां याला कडेला निजवा म्हणजे एक लाथ मारून याला खालीं पाताळांत धाडून देतों; म्हणजे या गिधाडांघारींची तरी चंगळ उडेल— हॅं, एक—दोन—"

इतक्यांत मागील बाजूनें "कासम, बस्स कर," असे शब्द त्याला ऐकूं आले. त्यानें दचकून मागें पाहिलें तों एक मुसलमान स्त्री व रंगाचार्य अशीं दोघें पायऱ्यांवरून चढून सुळक्यावर आलेलीं त्याला दिसलीं.

"पंडितजी, हा मीं आणला आहे साक्षीदार. याची साक्ष आधीं होऊं द्या मग निकाल करा." रंगाचार्य ओरडून म्हणाला.

नवीन 'यशवंतराव' कैद्याला ढकलून देणार तोंच पंडितजींनीं

त्याची मानगुटी धरली व त्याला थांबविलें. " तूं या बाईला ओळख-तोस कीं नाहीं ? " त्यांनीं विचारिलें.

नवीन 'यशवंतरावा' नें साफ नकार दिला, तेव्हां त्यांनीं पुनः विचारिलें, " तर मग तिनें कासम अशी हांक देतांच तूं दचकलासस ? "

" कासम अशीच काय पण दुसऱ्या कोणत्याही नांवानें तिनें हांक दिली असती तरी मी दचकलों असतों; कारण या उंच मुळक्यावर अशा वेळीं अनोळखी आवाज ऐकून कोण दचकणार नाहीं ? खुद्द न्यायाधीश साहेबांसही आपण दचकलों नाहीं अशी ग्वाही देतां येईल काय ? तें असो. या बाईला मी मुळींच ओळखत नाहीं" —

ती बाई मध्येंच म्हणाली, " कासम, खुद्द आईला देखील ओळखेनासा होण्याइतकी तुझी मजल गेली ना ? पण त्यांत तरी काय नवल ? बापाचा खून करणारा आईची ओळख विसरला नाहीं तर तें मात्र नवल आहे ! "

नवीन 'यशवंतराव' चवताळल्यासारखें करून म्हणाला, " कोणाला तूं कासम समजते आहेस ग बया ? हा ( कैद्याकडे बोट दाखवून ) तुझा कासम असेल. अरे हरामजाद्या ! हें नवीनच समजलें ! कृष्णराव हें नांवही एकंदरींत खोटें होतें तर—एकूण या मुसल-मानानें माझें घर सर्व प्रकारांनीं भ्रष्ट केलें काय ? "

" पुरे पुरे. आतां निर्णयाचं काम अधिकच सोपं झालं आहे. " पंडितजी म्हणाले, " यांतला मुसलमान कोण आणखी हिंदु कोण हें हुडकून काढणं फारच सोपं आहे. या दोघांच्या कानांना भोकं आहेत कीं नाहींत हें पहा म्हणजे झालं. " पंडितजींची ही तोड

ऐकतांच नवीन ' यशवंतरावा ' चें तोंड खाड्कन उतरलें. जवळच्या माणसांनीं पाहिलें व कैद्याच्या कानाच्या पाळ्यांस भोकें आहेत आणि दुसऱ्याच्या नाहींत अशी खात्री करून घेतली. कैदी ' यशवंतरावा ' चे बंद सोडून टाकण्याचा हुकूम झाल्यावरून त्याला बंधमुक्त करण्यांत आलें व आपणही आतां त्याला अवतरणचिन्हांतून मुक्त करूं या.

" आणखी या दोन लुच्च्यांना पकडून ठेवा. " पंडितजी, कृष्णराव ऊर्फ कासम आणि वाळोबा यांविषयीं म्हणाले.

" अम्मा, ऐन वेळीं येऊन तूं घाण केलीस ! कसा नामी सूड उगवत होतों मी...... " कासम त्या बाईस म्हणाला.

" बेटा, तुला मीं सूड उगवायला सांगितला पण तो तूं इतक्या थराला नेशील असं मला वाटलं नव्हतं. माझ्या पदरांत विधवापण बांधून, भावाला ठार करून, भावजयीचीही इज्जत घ्यायला तूं तयार झालास ! झालं तें झालं. आतां, आपल्या भाईची माफी माग. लाजूं नको. तोच उदारपण दाखवून तुझा गुन्हा पोटांत घालील. " कासमच्या आईनें त्यास उत्तर दिलें; परंतु त्या मानी पुरुषाला क्षमा मागण्याची लाज वाटत होती.

" अरे, पण ही सगळी भानगड तरी काय ? भाई कोण, भावजय कोण, माफी कसली, तें एकवार समजूं तर द्या. " काजीसाहेब आश्चर्यानें बोलतात.

" सरकार, ती लांबलचक हकीगत आहे पण ती समजली तरच त्यांत या घराण्याचं नि माझ्या मुलाचं कल्याण आहे म्हणून ती सगळी सांगत्यें, ऐका... " अशी प्रस्तावना करून तिनें आपला

वृत्तांत सांगण्यास आरंभ केला. ती सर्व कहाणी सांगतांना प्रत्येक वाक्याशीं ती अडखळली, कित्येक ठिकाणीं लाजली तर अनेक जागीं गहिंवरली, म्हणून हा वृत्तांत तिच्या शब्दांत न देतां सरळ रीतीनें कथन करितों.

गोपाळगडापासून सुमारें दहा कोसांवरील कोकटनूर नांवाचें खेडें आहे. उन्हाळ्यांतील एके दिवशीं तेथील विहिरीवर एक सोळा-सतरा वर्षें वयाची मुसलमान मुलगी पाणी भरीत असतां दोन शिपाईगडी घोड्यांवरून भरधांव चाल करीत आलेले विहिरीपाशीं थांबले. त्यांपैकीं एक मालक व दुसरा नोकर असे दिसत होते. ते हिंदू होते का मुसलमान हें समजण्याचें कांहीं चिन्ह दिसत नव्हतें; कारण ते घामानें इतके डवडवले होते कीं जरी त्यांच्या कपाळांस गंधें लावलेलीं असतीं तरी तीं साफ पुसटून जातीं. मालक घोडे-स्वारानें मुलीपाशीं येऊन म्हटलें, "बाई, दमलेल्या स्वाराला पाणी देतां काय?"

ती मुलगी लाजत लाजत म्हणाली, "होऽऽ! पाण्याला कोण नाहीं म्हणेल? पण मी आहें मुसलमान. तुम्हांला माझ्या हातचं चालत असेल तर देत्यें."

त्या दोन घोडेस्वारांनीं एकमेकांकडे पाहून स्मित करून डोळे मिचकावले. मग तो गोरटेला नोकरवजा स्वार हासत हासत उत्तरला, "बाई, असल्या सुरेख हातांची धनीन मुसलमान असली आणखी पाणी पिणारा ब्राह्मण असला तरी त्याला या हातांतलं पाणी गंगा-

जळापेक्षां मधुर वाटेल. मग आम्ही तर मुसलमान भाईच आहों. आण. आण पाणी. आम्ही दहा कोस दौड मारून आलों आहों. घ्या धनीसाहेब, आपण प्रथम घ्या."

ते दोघे स्वार पाणी प्याले. नंतर नोकरवजा स्वारानें स्वतः पोहऱ्यानें पाणी काढून दोन घोडयास पाजलें व त्यांच्या पाठीवरून थाप मारीत तो जरा उभा राहिला. दरम्यान धनी स्वारानें, या गांवांत वस्ती किती आहे, मुसलमानांचीं घरें किती आहेत, तुझें नांव काय, तुझें लग्न झालें आहे कीं नाहीं, घरीं कर्तेसवरते कोण आहेत, असे प्रश्न त्या मुलीला विचारले.

मुलीनें सांगितलें कीं, या गांवांत शंभर घरें आहेत, मुसलमानाचें एकच शिल्लक आहे. बाकीचे सर्व राजधानीस पोटामागें गेले. आपलें नांव रोषन आहे. लग्न झालें नाहीं व घरीं वडील भाऊ कर्ता आहे. त्याचें नांव अबदुल कानडा असें आहे. आपला बाप हिंदु होता पण पुढें तो बाटून मुसलमान झाला. आपल्या घरचे कित्येक रीतिरिवाज अद्याप पूर्वधर्माचे राहिले आहेत. तिचीं उत्तरें ऐकून स्वार खूष झाला व हातांतील कडें काढून तिच्या पुढ्यांत धरून म्हणाला, "बाई, ही घे बक्षीशी ऐन वेळीं आमचा आत्मा थंडगार केल्याबद्दल!"

परंतु रोषननें तें कडें घेण्याकरितां हात पुढें केला नाहीं. ती म्हणाली, "पाणी देण्याबद्दल बक्षीस कशाला हवं? अल्लाच्या दयेनं आम्हांला पोट भरण्याइतकं मिळतं आहे. भिस्त्याच्या कामावर कमाई करण्याची वेळ आली नाहीं!"

रोषनला रोष आलेला पाहून स्वार किंचित् हासून बोलतो, "रोषन! रागावूं नको. तुला हें कडं मी मजुरी म्हणून देत नाहीं; पण

आपली या गरीबाची आठवण म्हणून देतों. तुझ्या या नुरावरून तर मला वाटतं तूं एखाद्या उमरावाच्या महालांतील राणी होशील. पण या आपल्या भेटीची आठवण म्हणून ही खूण जवळ ठेव."

रोषननें ती खूण घेण्याकरितां हात पुढें केला; पण तिच्या हातांत तें न देतां स्वारानें तिचा हात आपल्या हातांत धरला व त्यांत तें कडें घातलें. तें सैल बसल्यानें त्यानें वळवून चट्दिशीं घट्ट केलें. पावसाच्या गारा मुठींत धरल्या म्हणजे जसा आल्हादकारक चटका बसतो तसें रोषनला वाटलें. लाजेनें ती अगदीं लाल होऊन गेली. स्वाराचा नोकर ओरडून म्हणाला, "धनीसाहेब; एकच कडं कां देतां? दुसऱ्या हातांतही घाला कीं!"

मालक स्वाराला त्याची ही सूचना पसंत पडली व त्यानें तिचा दुसरा हात पकडून त्यांत दुसरें कडें घातलें. मग तो जाण्यास निघाला. "माझी आठवण ठेव बरं, रोषन!" तो वजावूं लागला, तेव्हां तिनें त्यास नांव विचारलें. त्यावरोबर जरा दचकून त्यानें नोकराकडे पाहिलें. नोकर हासत म्हणाला, "धनीसाहेबांचं नांव गनी महंमद. पहा बाई, या सरदार लोकांना नांव देखील सांगायला नोकर लागतात!" ते दोघे स्वार घोडयांना टाचा मारून निघाले. मालक स्वार तर रस्त्याला वळण लागेपर्यंत वारंवार मागें वळून विहिरीकडे पहात चालला होता. ते दिसेनासे झाल्यावर रोषननें सुस्कारा टाकून घागर उचलली. ती तिला दुप्पट जड वाटूं लागली.

दुसऱ्या दिवशीं नोकर स्वार कोकटनुरांत येऊन रोषनचा भाऊ अबदुल कानडा याच्या घरीं दाखल झाला. आपलें नांव बंकटमिया असून आपण आपला धनी गनी महंमद याच्या वतीनें रोषनला

मागणी घालण्यास आलों आहों, गनीसाहेब हे आदिलशाहींतले असामदार असून तरुण व सुरेख आहेत, कालच त्यांनीं रोषनला विहिरीवर पाहिल्यापासून त्यांच्या मनांत ती भरली आहे, लग्न विशेष थाटानें न होतां गुपचुप झालें पाहिजे. कारण त्यांची पहिली बिबी फार कजाग; ती लग्नांत विघ्न आणील, लग्न झालें म्हणजे मग मात्र ती रोषनला बहिणीसारखी वागवील, इत्यादि गोष्टी सांगून त्यानें अवदुलचें मन वळविलें. तो गरीब मनुष्यही एका मोठ्या सरदाराशीं आपली सोयरीक घडून येणार म्हणून फार खूष झाला. लग्न लावण्याला गांवांत काजी नाहीं अशी त्यानें अडचण काढिली. परंतु बंकटमियानें ती दूर करण्याचा पत्कर घेतला.

आठ दिवसांतच लग्न लागलें. काजीचें काम स्वतः बंकटमियानें केलें. लग्न झाल्यावर दोनतीन दिवसांनीं गनी महंमद स्वारीवर निघून गेला, तो महिन्यानें परत आला. त्यानें दोनतीन दिवस राहून पुनः जाण्याची गोष्ट काढली, तेव्हां अवदुलनें, "बायकोला कधीं नेणार?" असें पुसलें. गनीनें उडवाउडवी केली व दोन मोहरा खर्चासाठीं त्याच्या हातावर ठेवून प्रयाण केलें. यानंतर गनी असाच मधून मधून सासुरवाडी येऊन राही, बायकोला नेण्याचें वायदेवारीं घालवी; पण खर्चाची तोशीस मात्र अवदुलला लावीत नसे.

एक वर्ष गेलें. रोषनला दिवस राहिले, तेव्हांपासून गनीचा चेहरा चिंताक्रांत दिसूं लागला. तो तिला नीट जबाब देईना इतकेंच नव्हे तर त्याच्या प्रीतीला ओहोटी आगल्याचें स्पष्ट दिसूं लागलें. तिला मुलगा झाला. त्याचें कौतुक वाटण्याऐवजीं त्याला तो शत्रूसारखा वाटूं लागला. परिणामीं गनीच्या भेटी अधिकाधिक कालांतरानें होत जाऊन एकदां तर सारख्या सहा महिन्यांत त्याचें दर्शन झालें

नाहीं. तो जिवंत आहे कीं एकाद्या युद्धांत कामास आला हें कळणें देखील दुरापास्त झालें.

एके दिवशीं अबदुल कानडा कांहीं कामानिमित्त गोपाळगडावर गेला होता, तो संध्याकाळीं तावातावानें परत घरीं आला व म्हणाला, " रोषन ! तुला अगदीं साफ बुडविलं त्या काफरानं ! "

" कोणत्या काफरानं, दादा ? दुपारच्या उन्हानं तुझं डोकं तर फिरलं नाहीं ना ? "

" दुपारच्या उन्हानं नाहीं पण मूर्खपणानं मात्र फिरलं होतं तें आतां उमजलं ! रोषन, तुझ्याशीं लग्न करणारा गनी महंमद म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून गोपाळगडचा किल्लेदार गुणवंतराव होता, आणखी काजी बनलेला वंकटमिया हा त्याचा उपाध्या व्यंकटाचार्य ! तुझं लग्न धर्मविरुद्ध ठरलं आणखी तूं गनी महंमदची बायको नसून त्या गुण्याची...... कोण म्हणून सांगूं मी ? "

" दादा, रागावूं नकोस असा त्यांच्यावर. ते माझ्यावर किती प्रेम करीत ! मी माझ्या बाळाला घेऊन माझ्या हक्काच्या गडावर जात्यें. तेथली किल्लेदारीण म्हणवून घेत्यें. " असें तिनें भावाला उत्तर दिलें व तें खरें करून दाखविण्यासाठीं ती भावाबरोबर मुलासह गडावर गेली. ती वर गेली, तेव्हां गुणवंतराव एका झोपाळ्यावर आपल्या लहान मुलाला घेऊन बसला होता व समोरच त्याची बायको मुलाला खेळवण्याकरितां हातवारे करीत उभी होती. रोषनच्या कडेवरचें मूल त्या मुलाच्या अगदीं हुबेहुब सारखें होतें. एकाला लपवावें व दुसरें काढून द्यावें—समजणार नाहीं.

रोषनला पाहून गुणवंतराव चपापला पण सावरून म्हणतो,

"कोण बाई तूं? इथें काय काम आहे?" रोषननें गुणवंतरावाच्या दुसऱ्या मांडीवर आपलें मूल ठेवलें. तें पाहून तो व त्याची बायको फार चकित झालीं. "काय बाई तरी देवाची करणी! किती हुबेहुब सारखा मुलगा आहे, जसा जावळा भाऊच!" ती उद्गारली.

"बाई, जावळा भाऊ नाहीं पण 'भाऊ' तर खराच!" रोषन म्हणाली, "महाराज, आपण मला खूप चुकवत होतां पण मीं आपल्याला हुडकून काढलंच कीं नाहीं?"

"म्हंजे? हा काय प्रकार आहे? म्हणे, 'मला तुझ्याशिवाय पिरीत नाहीं,' आणखी ही तर मेली मुसलमानीण!"

"ए बाई," किल्लेदार रोषनशीं बोलूं लागला, "तुझा मुलगा माझ्या येसूसारखा हुबेहुब दिसतो याचा गैरफायदा घेऊन माझ्याशीं लगट करतेस कीं काय? जा, या कारट्याला उचल इथून! काय तरी फाजील बाई आहे!"

"फाजील कोण? या अल्ला, पुरुषांनीं वाटेल ते धंदे करावे आणखी आमचे गळे कापावे नि फाजील, चवचाल, चावट आम्ही, आणखी हे मात्र पवित्र! महाराज! गनी महंमद बनून हीं कडीं कोणीं बरं माझ्या हातांत घातलीं?--"

"तें पहायला काय तुझ्यावर कोणीं मला रखवालदार नेमलं होतं कीं काय? जा, जा, चालती हो नाहीं तर धक्के मारून घालवून देईन. रडती आहेस कशाला इथें? जा, तो गनी महंमद का कोण तो शोधून काढ न् त्याच्या पुढें रड."

अबदुल इतका वेळ स्वस्थ होता, तो पुढें होऊन म्हणाला, "अहो,

किल्लेदारसाहेब, आपणच गनी महंमद. आपलाच हा मुलगा आहे. आणखी ही माझी वहीण आपली आवडती वायको रोषन ती हीच आहे. आतां नाकबूल कां करतां ?"

"हें कारटं माझं ?" त्या मुलाला उचलून जमिनीवर आपटून किल्लेदार ओरडला, "काय या लुच्च्यांचा डाव आहे समजला नाही ! मी इतका अब्रूदार माणूस, माझ्या तोंडाला काळं फासण्याचा यांचा वेत दिसतो आहे--"

त्या विचाऱ्या रडणाऱ्या मुलाला रोषननें उचललें व आपलें रडें दावून ती त्वेषानें म्हणली, "ठीक, ठीक ! ज्या लेकराला तूं आज फेकून दिलं आहेस त्याच लेकराकडून तुझं नि तुझ्या घरादाराचं वाटोळं करणार नाहीं तर नांवाची रोषनच नाहीं हें ध्यानांत ठेव. माझा गनी महंमद मेला नि तूं माझा दुष्मन् आहेस. चल, दादा, दुष्मनाच्या घरांत पळभरही राहूं नये !"

तीं दोघें आपल्या गांवीं जाऊन एक प्रहर होण्याच्या आंत वंकट-मिया बनलेला व्यंकटाचार्य हातांत एक होनांनीं भरलेली थैली घेऊन आला व धन्याच्या वतीनें क्षमेची मागणी करूं व थैली देऊं लागला; परंतु रोषननें ती दूर फेंकून देऊन व्यंकटाचार्याचा अपमान करून त्यास घराबाहेर घालविलें. थोड्या दिवसांनीं खेड्यांत धंदा नीट चालेना म्हणून अबदुलबरोबर रोषनही मुलासह विजापुरास निघून गेली. तेथेंही गुणवंतराव व व्यंकटाचार्य तपास करीत आले; परंतु लग्नाची वायको या नात्यानें मला घरांत घ्याल तरच मी येईन असें रोषननें स्पष्ट सांगितल्यामुळें ते परत गेले.

रोषनचा मुलगा कासम हा वयांत आल्यावर त्याला आपली

जन्मकथा कळली. आईबद्दल सूड उगविण्याचें त्यानें ठरविलें व तो आदिलशाही फौजेंत दाखल होऊन विजयनगरच्या स्वारीवर गेला असतां त्याची व यशवंतरावाची गांठ पडली.

• • •

## शेवटचा गोड घांस ११

वरील हकीकत रोषनबिबीनें सांगिल्यावर बाकीची क्रासमानें सांगितली. फौजेंत असतां भोळया यशवंताकडून त्याचीं सगळीं गुपितें आपण कशीं काढून घेतलीं, त्याच्या गोष्टी कशा ध्यानांत ठेवल्या, काशीबाईची तसबीर चोरून घेऊन तिची नक्कल यशवंतच्या खिशांत ठेवून अस्सल प्रत काशीस कशी दाखविली, गुप्त वाटांची माहिती मिळवून तिच्या मदतीनें काशीबाईच्या खोलींत कसा प्रवेश केला आणि आपण अस्सल ठरून किल्लेदारी मिळविल्यावर बक्षिशी देण्याचें कबूल करून घेतलें, तें सर्व त्यानें मोकळ्या मनानें सांगितलें.

बाळोबा बिचारा गळा काढून रडूं लागला, " येसू! मला माफी दे. मी कर्जांत बुडून या मार्गाला लागलों. पुन्हां असं करणार नाहीं"— यशवंतरावानें त्याला अभय दिलें.

" तसंच या तुझ्या सावत्र भावालाही अभय दे. यानं जो गुन्हा केला तो माझ्या चिथावणीवरनं केला, याबद्दल सजा कोणाला द्यायची

असेल तर मला द्यावी. सगळया अनर्थाचं मूळ मी आहें. ” रोषन-बिबी म्हणाली.

“ कोणालाच शिक्षा देण्याचें कारण नाहीं. माझ्या वडिलांनीं तुझा जो अन्याय केला त्यामुळेंच ही अनर्थपरंपरा कोसळली. आई ! माझी सख्खी आई गेल्यानंतर तुझी माहिती मला झाली असती तर खरोखर तुझ्याशीं मुलाप्रमाणें आणि कासमभाईशीं मी भावाप्रमाणें वागलों नसतों काय ? पण नानांच्या या संकोचामुळें हा प्रकार ओढवला ! न्यायाधीश महाराज, या माझ्या भावाला शिक्षा करूं नका ! त्यानं माझा अपराध केला आहे तेव्हां मीच त्याला क्षमा करतों. ” यशवंतराव म्हणाला.

“ अरे, पण चौकशीला आलों अन् कोणाला सजा नाहीं दिली तर आम्हांलाच नोकरींतून रजा देतील ना ! त्यापेक्षां एकाद्या माण-साला सजा देऊं लङ्सा पाहून–” काजीसाहेब म्हणाले. परंतु त्यांस पंडितजींनीं दाबलें.

इतक्यांत रंगाचार्यांच्या बायकोनें वेड्या काशीबाईला हात धरून तेथें आणलें. तिचे मोकळे केस, शून्य दृष्टि व दीन चर्या पाहून कासमला पश्चात्ताप झाला. त्यानें एकदम तिचे पाय धरले व म्हटलें, “ वहिनी ! या अपराध्याला क्षमा कर. तुझ्या नांवाचे धिंडवडे करण्याचा या अधमानें व्यूह रचला होता; परंतु सुदैवानें तो ढांस-ळला. मीच तो कृष्णराव तुझ्या खोलींत आलों होतों आणि हा तुझा पति यशवंतराव, माझा भाऊ; याला ओळख. ”

काशीबाई त्याला उठवीत म्हणाली, “ उठा, उठा, भावोजी. पण माझं बाळ कुठं आहे ? केव्हांचं त्याला मीं घेतलं नाहीं. ” धाकट्या

बळवंतरावास घेऊन एक दासी उभी होती तिनें चटकन पुढें होऊन तिच्या हातांत मूल दिलें. पुष्कळ दिवसपर्यंत तिच्या हृदयांत दुधाच्या रूपानें कोंडून राहिलेलें मातृप्रेम लहानगा बळवंतराव आपल्या पोंवळ्यासारख्या ओठांनीं शोषून घेऊं लागला. चंद्रीनेंही धांवत येऊन तिच्या पायास विळखा घातला.

यशवंतरावानें शिपायांपैकीं एकास आपलें आंगरखापागोटें आणावयास धाडलें व दुसऱ्याकरवीं दवंडीवाल्यास बोलावून आणिलें. दरम्यान बुळक्यावरून उतरून सर्व जण खालीं आले. कडेलोट पहाण्याकरितां जमलेल्यांस हें सर्व गौडबंगाल काय आहे हें मुळींच समजेना. परंतु दवंडीवाला तेथें आला. यशवंतरावाकडून त्यानें दवंडीची शिकवणी घेतली व ढोलकें पिटलें. त्याबरोबर सर्व लोक शांत झाले. दवंडीवाल्याकडे उत्सुकतेनें लागलेल्या त्यांच्या कानांवर पुढील शब्द पडले:—

"ऐका हो ऐका! सर्व लोकांना कळवण्यांत येतें कीं, सरकारी न्यायाधीशसाहेबांनीं असें ठरविलें आहे कीं, दीड वर्ष गडावर रहात असलेल्या यशवंतरावजींनाच सरकारनें खरे यशवंतराव ठरविलें आहे. तीन दिवसांमागें दरबारांत प्रकट झालेले आणि चुकीनें यशवंतराव मानले गेलेले गिरस्त हे किल्लेदारसाहेबांचे भाऊ आहेत. हेच कृष्णराव नांवानें विजापूरच्या फौजेंत होते. त्यांच्या अपराधाची त्यांना क्षमा करण्यांत आली आहे. आतां गडावरल्या सगळ्यांनीं यशवंतराव किल्लेदारांशीं इमान ठेवावें हो"! ढुम् ढुम् ढुम् ढुम्!

यशवंतराव, कासम, बाळोबा आणि रंगाचार्य हे चौघे बरोबरीनें वाडयाकडे निघाले. वाटेंत सर्वजण यशवंतरावास आनंदानें मुजरे

करीत होते व तो त्यांचा आदरानें स्वीकार करीत होता. त्यांच्यामागून दोन न्यायाधीश गंभीरपणें संथ पावलें टाकीत जात होते. त्यानंतर लहानग्या बळवंतरावास कडेवर घेतलेली रोशनबिबी, तिच्या पलिकडे वेडांतून पुरती सुटका झालेली काशीबाई व दोघींचे हात धरून त्यांच्या मधून जाणारी चंद्री अशा बायका चालल्या होत्या. गुणवंतरावाच्या या गंगाजमनी कुटुंबाकडे पाहून आश्चर्यचकित व आपल्या खऱ्या मालकाची ऐन वेळीं झालेली सुटका पाहून आनंदित झालेल्या प्रजाजनांनीं, " यशवंतरावकी जय "! अशा आरोळ्या ठोकल्या.

काशीबाईवरील संकट नाहींसें झालेलें पाहून तिचें माहेर जो वजीरगड किल्ला त्यासही हर्ष झाला व त्यानें आपल्या बुरजाबुरजावरून तो जयघोष प्रतिध्वनिरूपानें परत संदिष्ट केला.

विजापूर येथें सरदार कासमखान याचा विवाह मोठया कडाक्यानें साजरा होत होता विवाहाकरितां गोपाळगडची हिंदु पाहुणे मंडळीही गोळा झाली असून वाडयाचा एक स्वतंत्र भाग त्यांच्या दिमतीस दिला होता. संध्याकाळीं चांदण्यांत वाडयाच्या धाब्यावर ही सर्व पाहुणेमंडळी गप्पा मारीत बसली होती. रोशनबिबी व कासमखानही तेथें आलीं होतीं. पूर्वीच्या निरनिराळ्या प्रसंगांच्या आठवणी, स्पष्टीकरणें, इत्यादि प्रकारचे संलाप चालले होते. बोलतां बोलतां रंगाचार्यानें घेतलेल्या वैराग्याच्या वेषाचा विषय निघाला. त्या वेळीं काशीबाईनें विचारिलें, " पण रंगूभावजी, तुम्ही मला सांगितलं

कीं ' तिकडे ' जवळ असून तीन वरसं आम्हांला सुख लागायचं नाहीं, ते कशावरनं सांगितलं ? ”

“ तें मला बाबांनीं येसूचा हात पाहून त्याच्यावरून सांगितलं होतं. त्यांतल्या त्यांत सुदैव कीं तीन वर्षांच्या आंतच तुमचं ग्रहण सुटलं. ” रंगाचार्यानें उत्तर केलें व रोशनबिबीकडे पाहून म्हटलें, “ बरं पण काकी, तुमच्या सूनबाई—”

“ म्हणजे ? आमच्या सूनबाई त्या तुमच्या नाहींत वाटतं कोणी ? ”

“ आमच्या ‘वहिनी’ ! मी म्हणणारच होतों तसं; पण तुम्हांला कुठला दम निघायला ? आमच्या वहिनींना आणा कीं जरा पहायला. लग्नगर्दीत त्या आम्हांला नीटशा दिसल्याच नाहींत ! ” रंगाचार्यांच्या विनंतीप्रमाणें रोशनबिबी घरांत जाऊन थोड्याच वेळांत सुनेस घेऊन आली. नवरी मुलगी सर्वांस सलाम करून उभी राहिली. तिचें लावण्य अवर्णनीय होतें. तें पाहून रंगाचार्य कासमखानास म्हणाला, “ कासमभाई ! तुझी न् आमच्या आयेषा वहिनीची आधीं गांठ पडली असती तर हा सगळा अनर्थ टळला असता ! ”

अनुक्रम 28.4.22
विभाग
क्रमांक
वाचनालय
IRBK-0103118
IRBK-0103118

# आमचीं प्रकाशित पुस्तकें

**श्री. वि. स. खांडेकर.**

नवा प्रातःकाल (दु. आ.) २॥
पूजन (दु. आ.) ३
पहिल्यावहिल्या २।
गोफ आणि गोफण ३

**श्री. वि. वि. बोकील.**

बेबीचा भाऊ (दु. आ.) ३
साडेतीन शहाणे ३
चिमखडे २॥
वसंत ३
भाऊ भाऊ २॥
बेबी २
गारा आणि धारा ३

**श्री. कवठेकर.**

नाद-निनाद १॥
चांदण्यांतील सावल्या ३
शालन ३
मंदा २

**श्री. ना. धों. ताम्हनकर.**

मामा (दु. आ.) २॥
विद्यामंदिरांत ॥।
आमचे हे ३
सावटांतलं रोप २

**श्री. अनंत काणेकर.**

घरकुल १।
काळी मेहुणी १॥।

**साने गुरुजी.**

अमोल गोष्टी (दु. आ.) १॥
कुरल

**श्री. चिं. वि. जोशी.**

संचार २॥
ओसाडवाडीचे देव २
एरंडाचें गुऱ्हाळ (ति. आ.) ३॥
सोळा आणे २॥
संशयाचें जाळें २॥

**श्री. ना. ह. आपटे.**

मी वाट पाहीन! २॥
एकटी ५

**श्री. य. गो. जोशी.**

साहित्यिकांची सफर १॥
जाईजुई ३

**श्री. गोपीनाथ तळवलकर.**

अनुराधा २
आशियाचे धर्मदीप (ति. आ.) २

**श्री. ग. त्र्यं. माडखोलकर.**

जीवनसाहित्य २॥
भंगलेलें देऊळ (ति. आ.) ३

**श्री. र. गो. सरदेसाई.**

स्वानि १॥

**श्री. 'धनंजय'**

कलावंतांचे सहवासांत ३

**श्री. श्री. बा. चिरडे.**

भंगलेली मूर्ति २

**सौ. शांता नाशिककर.**

नीलेचा दिलरुबा २

**श्री. दत्त उद्धव वैद्य.**

मोगरीचा गजरा १॥

**श्री. प्रभाकर पाध्ये.**

प्रकाशांतील व्यक्ति १॥

**आचार्य कालेलकर.**

जीवन आणि समाज १॥

**श्री. शा. नी. ओक.**

धोत्र्याचे कळे २।

**श्री. जे. एल्. रानडे.**

गोड ललकाऱ्या १॥

**श्री. जी. एस्. पाटणकर.**

मधुर चीजं १।

**श्री. त्र्यं. र. देवगिरीकर.**

घटना परिषद् २॥

चिरस्मृति २॥

**श्री. भा. कृ. केळकर.**

सुभाष ३॥

**श्री. रा. वि. पाटणकर.**

आपलं राष्ट्रीय सरकार १।

**' मनमोहन '**

युगायुगाचे सहप्रवासी २

**श्री. रा. वि. फडतरे.**

तिसरी झेप ३

**' रमातनय '**

ज्ञान आणि विज्ञान १

**' रामतनय '**

प्रमिलाबेन ४

**श्री. रमाकांत वेलदे.**

भूक ४

**श्री. नांदापूरकर**

मायबोलाची कहाणी १॥

**सौ. शांता शेळके**

वर्षा २॥

**सौ. मालतीबाई दांडेकर.**

आकर्षक संसार ( दु. आ. ) ३

**श्री. का. न. केळकर.**

शमीपूजन ५

**श्री. अरविंद गोखले.**

जन्मखुणा २॥

**श्री. ना. सी. फडके.**

अंजलि ६

**श्री. कुलकर्णी**

नागरनीति ४

**श्री. नणदीकर.**

सोव्हिएत बालकथा ०॥।०

**श्री. ग. वि. अकोलकर.**

रशियांतील विद्यामंदिर ३॥

**श्री. ल. नी. छापेकर.**

उसना मेवा ०॥≈

**आचार्य अत्रे.**

अत्रे उवाच २

**डॉ. सहस्रबुद्धे.**

डोळ्यांचें आरोग्य ०।≈

**श्री. ह. भा. वाघोलीकर.**

गुप्त खजिना २

**श्री. पु. भा. भावे.**

सतरावें वर्ष ३